सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर गुरूवार, २७ फेब्रुवारी २०२५ ⏮ वर्ष दुसरे ⏮ अंक ३३३ ⏮ पाने : ८ ⏮ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## नांदेडात युवकाची हत्या

**नांदेड,दि. २६ फेब्रुवारी :** शहरातील गणेशनगर भागात आज दि. २६ फेब्रुवारी सकाळी ८ च्या सुमारास एका तरुणाचा तीक्ष्ण हत्याराने वार करुन निघृणपणे खून केल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे नांदेड शहरात खळबळ उडाली आहे.



शहरातील खोब्रागडे नगर येथील अमोल भुजबळ उर्फ एमजे (वय ३०) हा युवक आज बुधवारी सकाळी ८ च्या सुमारास गणेशनगर येथील एका दुकानावर साहित्य खरेदी करीत असताना पाठीमागून दुचाकीवर आलेल्या दोन आरोपींनी अमोल भूकबळ याच्यावर तीक्ष्ण हत्याराने वार केले. जीव वाचविण्यासाठी तो जखमी अवस्थेत पळत जात गणेशनगर वाय पॉईंटजवळ जमिनीवर कोसळला. आरोपींनी त्याचा पाठलाग करुन पुन्हा वार केले. या हल्लयात अमोल भुजबळ हा जागीच मरण पावला. घटनेची माहिती मिळताच अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, पोलीस उपअधीक्षक सुशीलकुमार नायक, स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरिक्षक उदय खंडेराय यांच्यासह शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी व कर्मचारी दाखल झाले. त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा करुन प्रेत शवविच्छेदनासाठी विष्णुपुरी येथील शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले आहे. हल्लेखोर हे सीसीटीव्ही फुटेजमध्ये कैद झाले असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. या प्रकरणी शिवाजी नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## २०२६ पासून बदलणार CBSE बोर्ड परीक्षेची सिस्टीम
# वर्षातून दोन वेळा होणार १०वीची परीक्षा

मुंबई: वर्ष २०२६ पासून सीबीएसई बोर्डाच्या दहावीच्या परीक्षेमध्ये मोठा बदल पाहायला मिळणार आहे. बोर्डाने या बदलाबाबत निर्णय घेतला आहे. केंद्रीय माध्यमिक शिक्षा मंडळाने एक मोठा निर्णय घेतला आहे. यानुसार २०२६ पासून १०वीची बोर्डाची परीक्षा वर्षात दोन वेळा आयोजित केली जाईल. या बदलाचे मुख्य कारण विद्यार्थ्यांना आपली तयारी चांगली करण्यासाठी तसेच परीक्षेत चांगली कामगिरी करण्याची आणखी एक संधी मिळणार आहे.




**सध्या अशी होतेय परीक्षा**

सध्या १०वी आणि १२वीच्या बोर्ड परीक्षा दरवर्षी फेब्रुवारी आणि मार्चदरम्यान आयोजित केल्या जातात. कोरोना महामारीमुळे सीबीएसईने एक विशेष उपायच्या रूपात परीक्षांना दोन सत्रामध्ये विभाजित केले होते. दरम्यान, स्थिती सामान्य होताच बोर्डाने पुढच्याच वर्षापासून आपली जुनी सिस्टीम सुरू केली.

**कशी असेल नवी परीक्षा सिस्टीम?**

सीबीएसईनुसार १०वी परीक्षेचा पहिला टप्पा फेब्रुवारी-मार्चमध्ये असेल तर दुसरा टप्पा मेमध्ये आयोजित केला जाईल. विद्यार्थ्यांना दोन्ही परीक्षांमध्ये बसण्याची संधी मिळेल. मात्र हे गरजेचे नसेल. जर एखाद्या विद्यार्थ्याला पहिल्या परीक्षेत अपेक्षित यश मिळाले नाही तर ते दुसरी परीक्षा देऊ शकतात. रिपोर्ट्सनुसार १०वी बोर्डाच्या परीक्षेचा पहिला टप्पा १७ फेब्रुवारी ते सहा मार्च २०२६ पर्यंत असेल. दुसरा टप्पा ५ मे ते २० मे २०२६ पर्यंत आयोजित असेल.

**विद्यार्थ्यांना कसा होणार फायदा?**

विद्यार्थ्यांना एका वर्षात दोन वेळा परीक्षा देण्याची संधी मिळेल. जर पहिल्या परीक्षेत चांगली कामगिरी झाली नसेल तर त्यांच्या मानसिक आरोग्य आणि त्यांच्या शिकण्याच्या प्रक्रियेला लक्षात घेतले जाईल. तसेच या बदलामुळे परीक्षेची भीती कमी होईल आणि विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी अधिक संधी मिळेल.

## सिल्लोड तालुक्यातील १०४ संगणक परिचालकांना मानधन देण्यास टाळाटाळ

सिल्लोड : सिल्लोड तालुक्यातील १०४ ग्रामपंचायत अंतर्गत १०४ संगणक परिचालक कार्यरत असून,त्यांना मागील ऑक्टोबर महिन्यापासून मानधन न मिळाल्याची धक्कादायक बाब निदर्शनास आली आहे.दहा हजार प्रति माह तुटपुंज्या मानधनावर कार्यरत असलेल्या संगणक परिचालकांना उपासमारीला सामोरे जाण्याची स्थिती निर्माण झाली असून ;त्यांची व्यथा कोणीही ऐकून घ्यायला तयार नाही.

शासनाने सदरील कामासाठी एक नवीन कंत्राटदार कंपनी नियुक्त केली आहे. या कंपनी अंतर्गत ग्रा. पं. स्तरावर कार्यरत संगणक परिचालकांना १५ व्या वित्त आयोगातील प्रशासकीय खर्चासाठी राखीव १० टक्के निधीतून मानधन देण्यात येते. ग्रामपंचायत वित्त आयोगातून संगणक परिचालक यांचे वार्षिक मानधन प्रति महिना १२ हजार रुपयेप्रमाणे घेण्यात येते. यापैकी फक्त १० हजार रुपये मानधन प्रत्यक्षात दिले जाते. केंद्राकडून ग्रा.पं.ला वित्त आयोगाचा निधी प्राप्त झाल्यावर संबंधित ग्रा. पं. त्यांच्याकडे असलेल्या संगणक परिचालकांच्या मानधनाचा तेवढा निधी जिल्हा स्तरावर आरटीजीएस पद्धतीने वळती करते. त्यानंतर जिल्ह्याकडून सदर निधी राज्य शासनाकडे आणि राज्य शासनाकडून हा निधी संबंधित कंपनीकडे कर्मचाऱ्यांच्या मानधनासाठी वळता करण्यात येतो. यातून कंपनी या संगणक परिचालकांचे मानधन अदा करत असते.

तुटपुंज्या मानधनावर ऑपरेटरना प्रचंड धडपड करुन कुटुंबीयांचा उदरनिर्वाह भागवावा लागतो आहे.ऑनलाइनच्या माध्यमातून ग्रामपंचायतचे कामकाज करत असताना ग्रामस्थांना विविध प्रकारचे दाखले देणे, पत्रव्यवहार करणे, प्रस्ताव तयार करणे, लाडकी बहीण योजना, पी.एम. किसान योजना, प्रधानमंत्री आवास योजना, माझी वसुंधरा अभियान राबवणे, आयुष्यमान कार्ड, शेतकरी आयडी, विविध शासकीय योजना गावगाड्यातील तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचवण्याचे काम करीत असतात. अनेकदा या तरुणांना वेबसाईट दिवसा चालत नसल्याने रात्रभर बसून शासकीय योजनांची ऑनलाइन माहिती भरण्याचे काम करावे लागते. मात्र त्यांना ऑक्टोबर महिन्यापासून मानधन मिळाले नाही. यामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे अवघड झाले आहे. अनेकांवर उपासमारीची वेळ आली आहे.

संबंधित कंपनीकडे मानधनासाठी आवश्यक रक्कम शासनाने वळती करुन ही संगणक परिचालकांचे मानधन अदा होत नसल्याने संगणक परिचालकांमध्ये नाराजीचा सूर आहे.. पं. मध्ये आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्पांतर्गत कार्यरत संगणक परिचालक मानधनासाठी आंदोलनाच्या तयारीत असल्याचे ही माहिती 'नवराष्ट्र ' ला मिळाली आहे.जर संगणक परिचालकांचे आंदोलन झाले तर त्याचा विपरीत परिणाम गावगाड्यांच्या ऑनलाइन योजनेच्या कामांवर होईल करीता शासनाने वेळीच दखल घेणे गरजेचे आहे.

**रेलटेल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया व आयटीआयएल या दोन्ही कंपन्यांनी आरजीएसए पुणे यांच्याकडे थकीत मानधनाचे इनव्हाईस दिलेच नाहीत,त्यामुळे निधी उपलब्ध असताना सुद्धा मानधन मिळत नाही. शासनाने सदरील कंपन्यांची नियुक्ती मागील ६ महिन्यापासून करून सुद्धा या कंपन्यांनी कोणतेही तांत्रिक सहाय्य केले नाही,कोणतेही सॉफ्टवेअर पुरवले नाही त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना गावात ऑनलाईन सेवा देण्यासाठी सुद्धा संगणक परिचालकांना व ग्रामपंचायतीना अडचण येत आहे.**

**ह्या आठवड्यात जर मानधन मिळाले नाही तर राज्य संघटनेच्या आदेशा नुसार सिल्लोड तालुक्याच्या ग्रामपंचायतींचे ऑनलाईन कामकाज बंद करणार.**

**- सद्दाम हुसैन मुलतानी**
**- तालुकाध्यक्ष-संगणक परिचालक कर्मचारी संघटना**

## किरीट सोमय्या यांची सिल्लोडला उपविभागीय अधिकारी कार्यालयासह पोलिस ठाण्याला दिली भेट

प्रतिनिधी । सिल्लोड

भारतीय जनता पार्टीचे माजी खासदार किरीट सोमय्या यांनी मंगळवारी सिल्लोडला उपविभागीय अधिकारी कार्यालयासह पोलिस ठाण्याला भेट दिली. राज्यभरात मोठ्या प्रमाणात बांगलादेशी घुसखोर असल्याचा त्यांचा दावा आहे. त्यासंदर्भातच त्यांनी मंगळवारी पोलिस अधिकाऱ्यांशी चर्चा केली. केवळ आधारकार्डच्या आधारावर ४०६ बोगस जन्म दाखल्यांचे वाटप झाल्याचा आरोपही माजी खासदार सौमय्या यांनी केला आहे.



ते म्हणाले की, नोव्हेंबर २०२३ पासून जन्म प्रमाणपत्र देण्याचा अधिकार तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांचेकडे आला. तेव्हापासून आतापर्यंत राज्यात २ लाख २३ हजार नागरिकांना जन्म प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.यात ४०, ५०, ६० व ७० वर्ष वय असलेल्या नागरिकांचा समावेश आहे. यामुळे राज्यभरात मोठ्या प्रमाणात बांगलादेशी, रोहिंगे अथवा पाकिस्तानी नागरिकांना जन्माचे दाखले दिल्या गेले असल्याचा गंभीर आरोप सोमय्या यांनी केला आहे. या नागरिकांची कागदपत्रे तपासण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेकडे स्पेशल फॉरेन्सिक ऑडिटर देण्याची मागणी करण्यात येणार असल्याचे सोमय्या यांनी सांगितले.

किरीट सोमय्या हे मंगळवार एक तास अगोदर दुपारी बारा वाजताच उपविभागीय अधिकारी कार्यालयात आले.तेथे त्यांनी उपविभागीय अधिकारी लतिफ पठाण यांच्यासोबत तासभर चर्चा केली. यानंतर त्यांनी भाजप शहराध्यक्ष कमलेश कटारिया यांच्याकडे जेवण केले. दुपारी अडीच ते साडेतीनपर्यंत त्यांनी सिल्लोड शहर पोलिस ठाण्यात उपविभागीय अधिकारी डॉ. दिनेशकुमार कोल्हे, शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शेषराव उदार यांच्यासोबत चर्चा करून त्यांनी संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यासाठी तहसीलदार यांची तक्रार घ्यावी, त्यांनी न दिल्यास त्यांच्यासह संबंधित अधिकारी व खोटे जन्म प्रमाणपत्र मिळवणाऱ्या नागरिकांवर माझ्या तक्रार अर्जानुसार गुन्हा दाखल करावा असे सांगितले. या वेळी भाजप नेते सुरेश बनकर, ज्ञानेश्वर मोठे, अशोक गरुड, सुनील मिरकर, मनोज मोरेलू, नारायण बडक आदी पदाधिकारी होते.

**-अधिकाऱ्यांनी प्रतिसाद दिला नाही**

उपविभागीय अधिकारी लतीफ पठाण यांना सदरील जन्म प्रमाणपत्राच्या संदर्भात विचारणा करण्यासाठी फोन केला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही

**-ही कागदपत्रे हवीत**

सदरील जन्म प्रमाणपत्र काढण्यासाठी आधार कार्ड, टीसी.,रेशन कार्ड, शपथपत्र, ग्रामीण भागातील असल्यास ग्रामसेवकाकडून प्रमाणपत्र, शहरी भागातील असल्यास मुख्याधिकारी यांच्या स्वाक्षरीचे जन्म नोंद प्रमाणपत्र, वृत्तपत्रात जाहीर प्रगटन आधी कागदपत्रांची पूर्तता करावी लागते.

**-संबंधित अधिकाऱ्यांनी केली टाळाटाळ**

किरीट सोमय्यायांनी उपस्थित केलेल्या जन्म प्रमाणपत्राच्या संदर्भातील माहितीबाबत विचारणा करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांशी पत्रकारांनी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संबंधित अधिकारी हे चक्क पत्रकारांना टाळताना दिसत आहे. यामुळे या प्रकरणातील गांभीर्य.




72198 21111 | BAJAJ SECURE • AMC • ROAD SIDE ASSISTANCE

*Terms and conditions apply. *Ex-showroom price for Pulsar 125 variants. Bajaj Auto reserves the right to withdraw any or all offers without prior notice. Stunts have been performed by experts, under professional supervision, in a controlled and enclosed environment, in isolation from general public or public roads. Do not attempt to replicate these stunts and always follow traffic and safety rules. AMC available on specific models and in specific states. Check with Bajaj dealer for more details. Road Side Assistance is provided by third parties and is subject to their terms and conditions.

**Authorized Dealers for Bajaj Auto Ltd**. Aurangabad • Adalat Road PAGARIYA BAJAJ 02406659937 • AkashPusad PAGARIYA BAJAJ 7709366111 • Harsul Point PAGARIYA BAJAJ 7709366111 • Waluj PAGARIYA BAJAJ 6616734 Bhokardan Road Sillod ASHOK BAJAJ 8380001965 • Shendra ASHOK BAJAJ 8380025694 • Buldhana ASHOK BAJAJ • Jamkhed Navale Bajaj 9130609999 8929643158• Jalna AMBRISH BAJAJ 8605466906• Ahmednagar Kinetic Chowk Chhatrapati Bajaj 9175142881, • Ahmednagar Savedi Naka Chhatrapati Bajaj 8087203861 • Kopargaon Shirode Bajaj 9921009952, • Rahuri Shirode Bajaj 9921009953 • Shrirampur Shirode Bajaj 9270468998 • Sangamner MALPANI BAJAJ 9850112036, 02425-2225031 • **Authorised Service Centre:** Paithan 9850823363, Bidkin 9881341213, Vaijapur 9422854982, Lasur 7276183895, Gangapur 9423940806, Shivoor 9850709785, Mahalgaon 9284755116, Soygaon 8956111154, Phulambri 7588075675, Karmad 9881159432, , Pishore 9130646246 Bhokardan 9923485831, Georai 8698568509, Majalgaon 9422380842, Kaij 9423715751, Ambajogai 9607091874, Patoda 9423471895, Ashti 7840900444, Ambad 9834910719, Rajur 8275333360, ,Walsawangi 8275855491, Partur 9112649438 , Ausa 8149542017 Murud 9860351229, Chakur 9049746161, Renapur 9881951011, Omerga 9890521818, Paranda 9421212280, Kinwat 9527257525, Mukhed 9579194868 , Umri 8149815921, Narsi 9860069635 Bhokar 9423139732, Mahur 96089073034 ,Malegaon 9403746580,Vasmat 9890173708, Sengaon 9762427999, Jawala Bazar 9890989138, Pathri 9860907003, Palam 9763385151, Selu 7499441540, Gangakhed 9421859114, Ranisawargaon 8668727630. Khamgaon 9921479013, Rashin 9975704778, Mirajgaon 7774826060 Akole 9881939099, Alephata 7507571715, Ashwi 8888201059, Ghargaon 9970302801,Manchar 9890014697, Narayangaon 9850112036, Sakur 9422146709, Talegaon Dighe 9970886986, Nighoj 9850224992, Kotul 9921583946, Ottur 8007000790, Shevgaon 9067893709, Loni 7709387085, Ghodegaon 7588030777, Sonai 7588603005, Newasa 9527554555, Kukana 7588079959.

## संक्षिप्त वृत्त...

### सेलूत आज माकपचे राज्य अधिवेशन

**सेलू,/प्रतिनिधी :** मार्क्सवादी कम्युनिष्ट पक्षाचे २४ वे राज्य अधिवेशन सेलूत २७, २८ फेबुवारी व १ मार्च रोजी होणार असून या तीन दिवशीय अधिवेशनानिमित्ताने मार्क्सवादी कम्युनिष्ट पक्षाचे पॉलिट ब्यूरोचे केंद्रीय समन्वयक कॉ. प्रकाश कारत हे उपस्थित राहणार .

सेलू येथील साई नाट्यगृहात हे तीन दिवशीय अधिवेशन २७,२८ फेब्रुवारी, १ मार्च या कालावधीत होणार . अधिवेशनाचे उद्घाटन २७ फेबुवारी रोजी सकाळी ११ वाजता केंद्रीय समन्वयक कॉम्रेड प्रकाश कारत यांच्याहस्ते होणार . यावेळी विशेष अतिथी म्हणून माजी खासदार तथा प.बंगाल पॉलिट ब्यूरोचे सदस्य कॉम्रेड निलोत्पल बसु, पॉलिट ब्यूरो सदस्य अशोक ढवळे व स्वागताध्यक्ष प्रा. भाई यू. आर. थोंबाळ तथा अधिवशेनाचे अध्यक्ष म्हणून पक्षाचे राज्य सचिव कॉम्रेड डॉ. उदय नारकर यांची उपस्थिती असणार . या ३ दिवसीय अधिवेशनात राज्यातील ३१ जिल्ह्यातील सुमारे ४५० निवडक प्रतिनिधी सहभागी होणार .

अधिवेशनात राज्यातील सद्य राजकीय, सामाजिक, परिस्थिती, धर्मांधता, जातीय विद्वेष, केंद्र व राज्य सरकारचे जनता विरोधी धोरण, तसेच दलित, आदिवासी, मुस्लिम, महिला शेतकरी, शेतमजूर, कामगार, विद्यार्थी, युवक, व्यापारी, छोटे उद्योजक यांच्या प्रश्नांवर सखोल चर्चा करून पुढील काळातील आंदोलनाची हाक देण्यात येणार .

या अधिवेशनाच्या यशस्वीतेसाठी कॉम्रेड रामेश्वर पौळ, रामकृष्ण शेरे पाटील, दत्तुसिंग ठाकूर, उद्धव पौळ, दिपक लिपणे, रामराजे महाडिक, नसिर शेख, अशोक बुरखुंडे, सुभाष शहाणे, इंदुमती महाडिक, राजू दक्ष यांच्यासह अन्य कार्यकर्ते परिश्रम घेत .

### बिदर-हजरत निजामुद्दीन विशेष रेल्वेची एक फेरी

**परभणी,/प्रतिनिधी :** प्रवाशांची गर्दी लक्षात घेवून दक्षिण मध्य रेल्वेने बिदर ते हजरत निझामुद्दीन दरम्यान विशेष गाडीची एक फेरी पूर्ण करण्याचे ठरविले . ही विशेष गाडी विकाराबाद, सिकंदराबाद, निझामाबाद, मुदखेड, नांदेड, पूर्णा, हिंगोली, वाशीम, अकोला मार्गे धावणार .

गाडी क्रमांक ०७२२३ बिदर ते हजरत निजामुद्दीन ही विशेष गाडी बिदर येथून बुधवारी (दि.२६) सकाळी ६ वाजता सुटेल आणि झहीराबाद, विकाराबाद, लीम्गाम्पल्ली, सिकंदराबाद, मेडचल, आकनापेट, कामारेद्दी, निझामाबाद, बासर, धर्माबाद, मुदखेड, नांदेड, पूर्णा, हिंगोली, वाशीम, अकोला, मलकापूर, बर्हाणपूर, खांडवा, इटारसी, भोपाल, संत हिर्दाराम नगर, सेहोर, उज्जैन, नागडा, कोटा, मथुरा, पालवाल मार्गे हजरत निजामुद्दीन येथे गुरुवारी रात्री १०.४० वाजता पोहोचेल. तर गाडी क्रमांक ०७२२४ हजरत निजामुद्दीन ते बिदर ही विशेष गाडी हजरत निजामुद्दीन येथून शनिवारी( दि. १ मार्च) सकाळी ७.४५ वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गानेच सोमवारी पहाटे ४ वाजता बिदर येथे पोहोचेल. या गाडीत द्वितीय शय्या, वातानुकुलीत असे एकूण २४ डब्बे असतील, अशी माहिती दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड येथील जनसंपर्क विभागाने दिली.

### आधार संमती आणि ना हरकत प्रमाणपत्र सादर करावे

कापूस, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना आवाहन : २८ फेब्रुवारी पर्यंत मुदत

**परभणी,/प्रतिनिधी :** कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना खरीप २०२३ हंगामातील अर्थसहाय्य योजनेचा लाभ घेण्यासाठी आधार संमती व ना हरकत प्रमाणपत्र सादर करण्याची अंतिम मुदत २८ फेब्रुवारी २०२५ असल्याचे कृषि विभागाने जाहीर केले .

योजनेंतर्गत शेतकऱ्यांना प्रति हेक्टर रु. ५०००/- या प्रमाणे, कमाल २ हेक्टरपर्यंत अर्थसहाय्य मिळणार . यासाठी खरीप २०२३ मध्ये ई-पिक पाहणी केलेले तसेच ७/१२ उताऱ्यावर कापूस किंवा सोयाबीन पिकाची नोंद असलेले शेतकरी पात्र ठरणार . शेतकऱ्यांनी ... या पोर्टलवर जाऊन आपल्या नावाची खात्री करावी किंवा संबंधित कृषि सहाय्यकांशी संपर्क साधावा. तसेच, ई-पिक पाहणी न केलेल्या शेतकऱ्यांनी तलाठी व वनपट्टेदार शेतकऱ्यांनी तहसील/जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

योजनेचा लाभ घेण्यासाठी वैयक्तिक खातेदारांनी आधार संमती, तर सामाईक खातेदारांनी आधार संमतीसह ना हरकत प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य . ना हरकत प्रमाणपत्राचा नमुना कृषी सहायक यांच्याकडे उपलब्ध . अधिक माहितीसाठी तालुका कृषि अधिकारी किंवा कृषि सहाय्यकांशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी केले .

### ज्ञानसाधना'च्या दोन विद्यार्थ्यांची विज्ञान वारीसाठी निवड

**परभणी,/प्रतिनिधी :** ज्ञानसाधना प्रतिष्ठानच्या विद्यार्थिनी रितिका दीपकराव कदम व ऋतुजा गजानन सामाले यांची परभणी ॲस्ट्रॉनॉमिकल सोसायटीच्या वतीने विज्ञान दिनानिमित्त आयोजित केलेल्या विज्ञान वारीसाठी निवड करण्यात आली . या विद्यार्थ्यांना रविवारी मान्यवरांच्या हस्ते निवडीचे प्रमाणपत्र देण्यात आले.

सोलापूर तरुण भारत

दैनिक वेबसाईट सोशल मिडिया

छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी

खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/

९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# मनपाचा ६७८ कोटींचा अर्थसंकल्प मंजूर

## कोणतीही करवाढ नाही : ९ कोटी ४५ लाख १२ हजार शिल्लक

### कोणतीही करवाढ नाही : ९ कोटी ४५ लाख ९२ हजार शिल्लक

**मोहन धारासूरकर**

**परभणी ,/प्रतिनिधीः-** २०२५-२०२६ या आर्थिक वर्षासाठीचा ९ कोटी ४५ लाख रुपये शिलकेच्या व ६७९ कोटी ११ लाख ७८ हजार रुपये खर्चाच्या अर्थसंकल्पास महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पीय बैठकीतून मान्यता बहाल करण्यात आली.

येथील बी. रघुनाथ सभागृहात मनपाचे प्रशासक तथा आयुक्त धैर्यशिल जाधव यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी सायंकाळी ४ वाजेच्या सुमारास अर्थसंकल्पीय बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीतून आयुक्त जाधव यांनी आगामी आर्थिक वर्षासाठीचा शिलकी अर्थसंकल्प सादर . आगामी वर्षात एकूण ६७८ कोटी ५७ लाख १० हजार रुपये जमा होतील व ६७९ कोटी ११ लाख ७८ हजार रुपयांचा खर्च होईल, असा अंदाज वर्तविण्यात आला. ९ कोटी ४५ लाख ९२ हजार रुपये शिलकेच्या अर्थसंकल्पास मान्यता बहाल करण्यात आली. , या अर्थसंकल्पात कोणतीही करवाढ नाही, अशी माहिती महापालिकेच्या सूत्रांनी दिली.

#### मनपाद्वारे उत्पन्न वाढीचा संकल्प...

या अर्थसंकल्पीय बैठकीत महानगरपालिकेची आर्थिक स्थिती भक्कम व्हावी, या दृष्टीने संकल्प व्यक्त करण्यात आला. विशेषतः उत्पन्न वाढीसाठी मालमत्तांच्या भाडेपट्टीतून उत्पन्नासह दैनंदिन बाजार वसूली, साप्ताहिक बाजार वसूली महापालिकेद्वारेच करावयाचा संकल्प सोडण्यात आला. वैद्यकीय परिपूर्ती फंड निर्मितीचा व त्याद्वारे कर्मचाऱ्यांना आवश्यक वैद्यकीय प्रतिकृती द्यावयाचा संकल्प सोडण्यात आला.

#### ई-बससेवेचाही संकल्प...

या अर्थसंकल्पीय बैठकीतून शहरांतर्गत वाहतूक सुरळीत व्हावी या दृष्टीन ई-बससेवा सुरु करण्याचाही संकल्प सोडण्यात आला. त्यासाठी महापालिकेद्वारे ई-बस खरेदी संदर्भातही गांभीर्याने विचारमंथन सुरु आहे, अशी माहिती देण्यात आली.




### महाशिवरात्री दिनी महादेव मूर्ती प्रतिष्ठापना उत्साह

**ज्ञानोबा कदम**

गंगाखेड :- गंगाखेड तालुक्यातील सुनेगाव (सायाळा) येथील कृष्णा सुर्यवंशी व त्याच्या तरुण सहकाऱ्यांनी एकत्र येऊन दि. २६ फेब्रुवारी बुधवार रोजी महाशिवरात्री दिनी इंद्रायणी स्मृति उद्यानामध्ये भव्य अशी महादेवाची मूर्ती बसवण्यात आली, यावेळी स्वामीजींच्या हस्ते मूर्तीची विधिवत पूजा करण्यात आली. यावेळी गावातील बहुसंख्य तरुण उपस्थित . हा कार्यक्रम यशस्वीतेसाठी गावातील तरुणांनी परिश्रम घेतले.



### लायन्सतर्फे मोफत कॅन्सर स्क्रिनिंग शिबीर

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील लायन्स क्लबच्या वतीने शुक्रवार २८ फेबुवारी रोजी मोफत कॅन्सर स्क्रिनिंग (निदान) व उपचार सल्ला शिबीर आयोजित करण्यात आले . डॉ. साने चौकातील डॉ. सालेहा कौसर हॉस्पिटल मध्ये हे शिबीर सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत होणार असून या शिबीरात डॉ. श्रीमती सालेहा कौसर, डॉ. राहुल राठोड, डॉ. मनोज मोरे हे तज्ञ डॉक्टर्स तपासणी करणार . यावेळी या शिबीराचा संबंधितांनी लाभ घ्यावा, असे आवाहन लायन्स क्लबचे अध्यक्ष पंडीत बरदाळे, सचिव माधव मंडगे व कोषाध्यक्ष सतीश चौधरी यांनी केले .प्रशासनाने अतिशय काटेकोरपणे नियोजन केले .

### दुर्गेश परुळकर यांचा व्याख्यानास प्रतिसाद

**परभणी,/प्रतिनिधी :** स्वातंत्र्यवीर सावरकर आत्मार्पण दिनानिमित्त बुधवार २६ फेबुवारी रोजी प्रसिध्द लेखक जाज्वल्य राष्ट्रभक्त अन् हिंदुत्ववादी वक्ते दुर्गेश परुळकर यांचे परभणीत व्याख्यान होणार .

स्वातंत्र्यवीर सावरकर साहित्य अभ्यास मंडळ व कै. विठ्ठलराव धानोरकर स्मृती सावरकर व्याख्यानमाला यांच्या संयुक्त विद्यमाने रंगनाथ नगरातील वैष्णवी मंगल कार्यालयाच्या सभागृहात सायंकाळी ५ वाजता परुळकर यांचे 'महाकवी सावरकर' या विषयावर हे व्याख्यान होणार . कवयित्री प्रा. सौ. संजीवनी खोत या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असणार असून सर्व सावरकर प्रेमींनी कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाद धानोरकर, उपाध्यक्ष सर्वश्री सुभाष कुलकर्णी प्रविण सराफ व कार्याध्यक्ष डॉ. दीवारक कुलकर्णी मांडाखळीकर यांनी केले .



**परभणी- महाशिवरात्रीनिमित्त भाविक भक्तांना फराळाचे वाटप माजी नगरसेवक गणेश देशमुख, यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी गजानन नागरे, संजय गुळगुळे, आबा ढोले, विशाल भराड, सचिन आडे दिसत आहेत.**

## परभणीत ७ मार्चपासून मराठवाडा विभागीय कृषी महोत्सव

### स्टेडिअम मैदानावर संस्कृती, साहित्य व प्रदर्शन : चर्चासत्र व मेळावे

**परभणी ,/प्रतिनिधी-** श्री स्वामी समर्थ अध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्र (दिंडोरी प्रणित) च्या वतीने ७ ते १० मार्च दरम्यान परभणीतील प्रियदर्शनी इंदिरा गांधी स्टेडिअम मैदानावर मराठवाडा विभागीय कृषी महोत्सव २०२५चे आयोजन करण्यात आले .

या महोत्सवात विभागीय कृषी प्रदर्शन व तज्ञांचे चर्चासत्र आयोजित करण्यात येणार असून नामांकित कंपन्यांचे खत, औषधे, आधूनिक यंत्र सामूग्री, सेंद्रीय व जैविक तंत्रज्ञान, शेती उपयोगी विविध अवजारे, केळी, कपाशी, टिशू कल्चर बि-बियाणे, पशू खाद्य, अपारंपारिक उर्जा, प्रक्रिया उद्योग, पॉली हाऊस, कृषि विमा, बँक, कृषि पर्यटन व कृषि संबंधित वैविध्यपूर्ण बाबींचा सहभाग असणार . मराठवाडा कृषी संस्कृती दर्शन, खाद्य संस्कृती, सण-उत्सव मांडणी, पूर्वीची समृध्द पर्यावरण पूरक गावे, त्यातील विज्ञान, पशूधन व गोवंश प्रदर्शन, त्यातून पशू आणि गोवंशातील प्रजातींसह गोठ्यांचे प्रात्यक्षिकांसह माहिती, पशूखाद्य, चाऱ्यांचे विविध प्रकार, डेअर उत्पादन, आधूनिक तंत्रज्ञान, दुग्ध व्यवस्थापनाबाबत माहिती व प्रात्यक्षिके दिली जाणार . दूर्मिळ वन औषधी व रान भाज्यांचे प्रदर्शनही आयोजित करण्यात येणार असून त्यातून आयूर्वेदिक शेती, बाजारपेठ याची माहिती, दुर्मिळ वन औषधींची मांडणी, उपयोग, प्रबोधन केले जाणार . तसेच मोफत आरोग्य व व्यसनमुक्ती शिबीर, शेतकरी वधू-वर परिचय मेळावा, कृषि व इतर क्षेत्रातील रोजगार या संदर्भात माहिती दिली जाणार .

७ मार्च रोजी सकाळी ९ वाजता कृषि दिंडी सोहळा, १० वाजता उद्घाटन सोहळा, १ वाजता विषमुक्त शेती सत्र, ३ वाजता पशू गोवंश सत्र तर ८ मार्च रोजी सकाळी ९ वाजता युवा कृषि नवचैतन्य अभियान, १२ वाजता शेतकरी वधू-वर परिचय मेळावा, ९ मार्च रोजी सकाळी ९ वाजता पर्यावरण प्रकृती जनजागृती अभियान, १२ वाजता स्वयंरोजगार चर्चासत्र व महिला बचतगट मेळावा तर १० मार्च रोजी सकाळी ९ वाजता माहिती तंत्रज्ञान जनजागृती अभियान, १२ वाजता सरपंच-ग्रामसेवक मांदियाळी, दुपारी ४ वाजता प.पु. गुरुमाऊली यांचे हितगुज, सायंकाळी ६ वाजता सांस्कृतिक कार्यक्रम होणार . मराठवाडा विभागातून मोठ्या संख्येने शेतकरी, कृषी अभ्यासक, व विद्यार्थी, कृषी सामाजिक संस्था, कृषी संशोधक उपस्थित राहतील. हा उपक्रम शेतकऱ्यांच्या हितासाठी आहे आणि प्रवेश मोफत आहे अशी माहिती आयोजक संदिप देशमुख यांनी दिली.

## मनपाद्वारे मोकाट जनावरे पकडण्याची मोहीम

### १४ मोकाट पशु, जनावरे मालकांना दंड : ४ जनावरे कोंडवाडा विभागात बंदीस्त

**परभणी,/प्रतिनिधी :** शहर महानगरपालिकामार्फत १० फ ब्रुवारीपासून शहरातील मोकाट जनावरे पकडण्याच्या मोहिम सुरु करण्यात आली असून आजपर्यंत १८ मोकाट जनावरे पकडण्यात येऊन कोंडवाडा विभागात जमा, बंदिस्त करण्यात आली .

पकडण्यात आलेल्या या १८ पैकी १४ मोकाट पशु, जनावरे मालकांना दंड आकारुन परत देण्यात आलेली . दंडाची एकुण रक्कम ११ हजार ९०० रुपये वसुल करण्यात आली . त्याचबरोबर पशुपालकांना यापुढे मोकाट जनावर रस्त्यावर फिरणार नाहीत किंवा सोडली जाणार नाहीत याची दक्षता घेण्याची सक्त ताकीद देण्यात आलेली . तर उर्वरित ४ जनावरे कोंडवाडा विभागात बंदीस्त . ही मोहीम यापुढे सातत्याने चालू राहणार .

वारंवार जनावरे रस्त्यावर सोडल्याचे आढळून आल्यास जनावर मालकांविरुध्द दंडात्मक कार्यवाही करण्यात येणार . तसेच जनावरांमुळे कोणताही अनुचित घटना घडल्यास त्याचीही जबाबदारी संबंधित मालकावर निश्चित करुन फौजदारी गुन्हा देखील महापालिकेमार्फत दाखल होऊ शकतो. त्यामुळे पशूपालकांनी पाळीव पशु, प्राणी रस्त्यावर मोकाटपणे सोडू नयेत, असे आवाहन महापालिका आयुक्त धैर्यशील जाधव यांनी केले .



## उपविभागीय अधिकाऱ्यांसह सातजण निलंबित

### कृषि विभागात घोटाळा : समृद्धी महामार्गात येणाऱ्या वृक्षांचे चुकीच्या पद्धतीने वाढीव मूल्यांकन केल्याचे प्रकरण

**परभणी,/प्रतिनिधी:** जिल्ह्यातून जाणाऱ्या समृद्धी द्रुतगती महामार्गाअंतर्गत येणाऱ्या वृक्ष, विहीर व घरांचे चुकीच्या पद्धतीने वाढीव मूल्यांकन केल्याप्रकरणी राज्य शासनाने परभणीचे उपविभागीय कृषी अधिकारी रवींद्र हरणे यांच्यासह ७ जणांना निलंबित केले .

समृद्धी महामार्गात येणाऱ्या वृक्षांचे चुकीच्या पद्धतीने वाढीव मूल्यांकन केल्याप्रकरणी उपविभागीय कृषी अधिकारी रवींद्र हरणे, सेलू तालुका कृषी अधिकारी शेरन ताजमोहम्मद पठाण, मंडळ कृषी अधिकारी रामप्रसाद जोगदंड, कृषी अधिकारी अशोक कदम, मंडळ कृषी अधिकारी राजहंस खरात, कृषी पर्यवेक्षक प्रकाश लोहार, कृषी पर्यवेक्षक दिगंबर फुलारी या सात जणांना निलंबित करण्यात आले .

जालना- परभणी व नांदेड या तीन जिल्ह्याला खऱ्या अर्थाने समृद्ध करणाऱ्या या जालना ते नांदेड द्रुतगती महामार्गाचे काम एमएसआरडीसीद्वारे केले जात . परभणी जिल्ह्यातील ४७ गावातून ९३.५२ किलोमीटर हा महामार्ग जाणार . या महामार्गासाठी जिल्ह्यातील ९३३ हेक्टर क्षेत्र जमीन संपादित करण्यात आली . या महामार्गामुळे मुंबई आणि नांदेड दरम्यानचा १२ तासाचा प्रवासही निम्म्यावर येणार . सध्या या महामार्गाचे काम सुरू झाले . परंतु दुसरीकडे या महामार्गावर येणाऱ्या वृक्ष, विहीर, शेततळे, घर व पाईपलाईन यासह आदींचे चुकीच्या पद्धतीने वाढीव मूल्यांकनाचा अहवाल उपविभागीय कृषी अधिकाऱ्यांसह सेलू तालुका कृषी अधिकारी कार्यालयाने जिल्हा प्रशासनाला सादर केला . या अहवालावर तत्कालीन जिल्हाधिकारी आंचल गोयल यांनी आक्षेप नोंदविला. त्यानंतर चुकीच्या पद्धतीने काम करून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी गोयल यांनी कार्यवाहीसाठी हा अहवाल राज्य शासनाकडे पाठवला .

## मोटारसायकल चारचाकीचा अपघात,एक युवक जखमी

कन्नड :- दि.२६ फेब्रुवारी - मोटारसायकल चारचाकीच्या अपघातात युवक जखमी झाल्याची घटना कनकावतीनगर येथे घडली आहे. पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार मोटारसायकल क्र.एम. एच.२० ई. यु.४९७६ वर युवक भूषण रावसाहेब पगारे वय २५ वर्ष रा.औराळा हा कन्नड वरून गावाकडे निघाला होता त्याच वेळी स्विफ्ट डिझायर चारचाकी क्रं. एम.एच.१२ एन.जे.६६१६ ही कन्नडच्या दिशेने येत होती कनकावतीनगर लगत असलेल्या पेट्रोल पंपासमोर मोटारसायकल व चारचाकी वाहनांचा अपघात झाला यात भूषण जखमी झाला,अपघात घडताच स्थानिक नागरिकांनी जखमीला खाजगी वाहनातून शहरातील खाजगी दवाखान्यात दाखल केले.घटनेची माहिती मिळताच बिट जमादार संजय आटोळे,बिट अंमलदार दिनेश खेडकर घटनास्थळी दाखल झाले होते.

## हौदात पडून चिमुकल्याची प्राणज्योत मालवली

कन्नड :- दि.२६ फेब्रुवारी - तालुक्यातील जैतापूर येथील चिमुकला खेळता खेळता पाण्याच्या हौदात पडल्याने त्याची प्राणज्योत मालवल्याची ह्रदयद्रावक घटना दि.२६ रोजी घडली आहे, आई,वडील कामानिमित्ताने बाहेर गेले असता चिमुकला साई राजेश शेजवळ वय साडेतीन वर्ष हा आपल्या काकू जवळ होता,काकू कामात व्यस्त असताना साई खेळत होता खेळता खेळता तो पाण्याच्या हौदात पडला बराच वेळ झाला साई दिसत नसल्याने त्याची शोधा शोध केली पण तो दिसला नाही काही वेळेनंतर पाण्याच्या हौदात साई दिसला त्यास तत्काळ कन्नड ग्रामीण रुग्णालयात आणले असता वैद्यकीय अधिकारी रुपाली पठारे,शाहजेब पटेल,यांनी तपासून मृत घोषित केले,

## नांदेडमधील फिजिक्सवाला (पीडब्ल्यू)च्या ३ विद्यार्थ्यांना मिळाले ९९ टक्क्यांहून अधिक गुण

नांदेड: फिजिक्सवाला (पीडब्ल्यू) या शिक्षण कंपनीने जेईई मेन सेशन १ २०२५ परीक्षेमधील निकालांची घोषणा केली आहे. या परीक्षेमध्ये चार राज्यीय टॉपर्सचा समावेश असून गुजरातमधील एका विद्यार्थ्याला १०० टक्के गुण मिळाले आहेत, तसेच ६१२ हून अधिक विद्यार्थ्यांना ९९.५ टक्क्यांहून अधिक गुण मिळाले आहेत, १३५९ हून अधिक विद्यार्थ्यांना ९९ टक्क्यांहून अधिक गुण मिळाले आहेत आणि ३५४८ हून अधिक विद्यार्थ्यांना ९८ टक्क्यांहून अधिक गुण मिळाले आहेत. ही आकडेवारी अजूनही वाढत आहे. नांदेड शहरातील फिजिक्सवालामधील ३ विद्यार्थ्यांना जेईई मेन सेशन १ २०२५ परीक्षेच्या निकालांमध्ये ९९ टक्क्यांहून अधिक गुण मिळाले आहेत. संस्कार कुलकर्णी (९९.६७ टक्के), नागेश जाधव (९९.६६ टक्के) आणि हरीओम मिश्रा (९९.२६ टक्के) हे शहरातील पीडब्ल्यूचे टॉप ३ विद्यार्थी होते.

## खजुराहो नृत्य महोत्सव २०२५ ने गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड

मुंबई : मध्य प्रदेशच्या संस्कृती विभागाने आयोजित केलेल्या खजुराहो नृत्य महोत्सव २०२५ ने सर्वात लांब भारतीय शास्त्रीय नृत्य मॅरेथॉन रिलेचा गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड प्रस्थापित करून ऐतिहासिक कामगिरी केली आहे. गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्सच्या अधिकृत न्यायाधीश हनाने स्पायर्स यांनी या विक्रमाची पुष्टी केली आणि मध्य प्रदेशचे माननीय मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांना प्रमाणपत्र सुपूर्द केले. मध्य प्रदेश सरकारच्या संस्कृती विभागाच्या नेतृत्वाखाली, संस्कृती विभागाचे प्रधान सचिव शिव शेखर शुक्ला यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जागतिक विक्रम नियोजन तज्ज्ञ निश्चल बारोट यांच्या महत्त्वपूर्ण योगदानामुळे हे यश शक्य झाले. भारतात गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचे अनेक प्रयत्न यशस्वीरित्या पार पाडणारे निश्चल बारोट यांनी या सांस्कृतिक उपक्रमाचे आयोजन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आणि हा कार्यक्रम गिनीज वर्ल्ड रेकॉर्डच्या सर्व मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करेल याची खात्री केली.

## एचडीएफसी लाइफ आणत आहे 'क्लिक टू अचीव्ह पार ॲडव्हाण्टेज'

मुंबई : एचडीएफसी लाइफ या भारतातील आघाडीच्या आयुर्विमा कंपनीने एचडीएफसी लाइफ क्लिक टू अचीव्ह पार ॲडव्हांटेज हे आपले नवीनतम उत्पादन सर्वांसमोर आणले आहे. व्यक्तीच्या आयुष्यातील विविध टप्प्यांशी निगडित उद्दिष्टे डोळ्यापुढे ठेवून हे पार्टिसिपेटिंग उत्पादन तयार करण्यात आले आहेत. व्यक्ती त्यांच्या वाढत्या महत्त्वाकांक्षा/उद्दिष्टांसाठी सातत्याने बचत करत असतात आणि त्यांचे प्राधान्य सुरुवातीच्या टप्प्यापासून रोखता (लघुकालीन गरजांसाठी), लवचिकता आणि भविष्यकाळासाठी आर्थिक सुरक्षितता यांना असते, असे निरीक्षण आहे.

## फॅशन बिझनेस समिट २०२५ मध्ये या क्षेत्रातील दिग्गजांच्या मार्गदर्शनाचा उद्योजकांना लाभ

मुंबई - ख्यातनाम फॅशन बिझनेस कोच हार्वी शाह यांनी आयोजित केलेल्या फॅशन बिझनेस समिट २०२५ ची सांगता मोठ्या दिमाखात मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथील कोर्टयार्ड बाय मॅरियट येथे झाली. २० आणि २१ फेब्रुवारी रोजी झालेल्या या दोन दिवसीय कार्यक्रमात फॅशन, उद्योजकता आणि पर्सनल डेव्हलपमेंट अशा क्षेत्रातील सर्वाधिक प्रभावशील व्यक्ती एकत्र आल्या होत्या. त्यामुळे उदयोन्मुख तसेच सुस्थापित फॅशन उद्योजकांना फार मोलाचे मार्गदर्शन लाभले. या परिषदेत उत्तमोत्तम वक्त्यांसह कार्मेसीच्या सह-संस्थापक तन्वी जोहरी, हीलिंग अँड मॅनिफेस्टेशन कोच गायत्री शिवराम आणि माइंडव्हॅलीच्या मुख्य विकास अधिकारी मारिशा लाखियानी, तसेच हार्वी शाह आदी मान्यवर उपस्थित होते. या उद्योगातील दिग्गजांनी आपली कौशल्ये आणि अनुभव मांडून उपस्थितांना शाश्वत फॅशन व्यवसाय तयार करणे आणि तो वाढवणे यासोबतच वैयक्तिक आणि व्यावसायिक अशा दोन्ही पातळीवर प्रगती कशी साधता येईल याबद्दल मार्गदर्शन केले.

## वेस्ट इंडिज मास्टर्सने ऑस्ट्रेलियाचा ७ गडी राखून पराभव

मुंबई - सोमवारी डीवाय पाटील स्पोर्ट्स स्टेडियमवर झालेल्या पहिल्या आंतरराष्ट्रीय मास्टर्स लीग (आयएमएल) च्या दुसऱ्या सामन्यात लेंडल सिमन्सच्या ४४ चेंडूत ९४ धावांच्या स्फोटक खेळीमुळे वेस्ट इंडिज मास्टर्सने ऑस्ट्रेलिया मास्टर्सचा ७ गडी राखून पराभव केला. सिमन्सच्या खेळीसमोर शेन वॉटसनचे ४८ चेंडूंचे शानदार शतक कमी पडले. संध्याकाळी नाणेफेक जिंकून वेस्ट इंडिजचा महान फलंदाज ब्रायन लाराने क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतल्यानंतर शेन वॉटसनने बॅटने जुन्या आठवणींना उजाळा दिला. आयएमएलमध्येही उच्च धावसंख्येच्या सामन्यांचा ट्रेंड कायम राहिला. स्टेडियममधील पाहुण्यांना शेन वॉटसनचे खास स्ट्रोक पाहण्याची संधी मिळाली. संपूर्ण डावात, असा एकही क्षण आला नाही जेव्हा ४३ वर्षीय वॉटसनने हार मानली असेल असे वाटले नाही कारण तो वेस्ट इंडिजच्या गोलंदाजांना लहान मुलासारखा खेळत होता. शेन वॉटसनने आपले अर्धशतक फक्त २७ चेंडूत पूर्ण केले आणि पुढील अर्धशतक पूर्ण करण्यासाठी २१ चेंडूंचा सामना केला. संपूर्ण प्रक्रियेत, वॉटसनने काही मोठ्या भागीदारींमध्येही भाग घेतला, ज्यामुळे एका मोठ्या लक्ष्यासाठी पाया रचला गेला.

## शेफ संजीव कपूर हार्वेस्टप्लस सोल्युशन्सच्या न्यूट्री पाठशाळेत सामील झाले

मुंबई - महाराष्ट्रातील एका गावातील एका गर्दीच्या वर्गात, मुले उत्सुकतेने त्यांच्या शिक्षकांभोवती जमतात, त्यांचा किलबिलाट हवेत घुमत असतो. पण आजचा धडा गणित किंवा विज्ञानाबद्दल नाही - तो आणखी मूलभूत गोष्टींबद्दल आहे: त्यांच्या प्लेट्सवरील अन्न. उत्साहाने, ते त्यांच्या न्यूट्री डब्बावरील लेबल्स स्कॅन करतात, लोह, जस्त आणि आवश्यक जीवनसत्त्वे तपासतात. त्यांना काय शोधायचे हे माहित आहे. त्यांना हे शिकायला मिळाले आहे की पोषण हे फक्त पोट भरण्याबद्दल नाही तर ते त्यांच्या भविष्याचे पोषण करण्याबद्दल आहे. ही न्यूट्री पाठशाळा आहे, जी हार्वेस्टप्लस सोल्युशन्स चा एक उपक्रम आहे, जी लोहयुक्त बाजरी आणि झिंक गहू यांसारखे जैव-फोर्टिफाइड पदार्थ समाविष्ट करून शालेय जेवण सुधारत आहे. गेल्या दोन वर्षांत २५ लाखांहून अधिक जेवण देऊन, एचपीएस बालपणातील कुपोषणाला मुळापासून दूर करत आहे.या चळवळीला शेफ संजीव कपूर यांच्या रूपात एक मजबूत समर्थक मिळाला आहे.

# हर हर महादेवाच्या जय घोषाने वेरुळ नगरी दुमदुमली

### लाखो भाविकांनी घेतले श्री घृष्णेश्वराचे दर्शन, पहाटे पासून लागल्या दर्शनासाठी रांगा

खुलताबाद प्रतिनिधी : देशभरात प्रसिद्ध असलेले वेरुळ येथील १२ वे ज्योतिर्लिंग श्री घृष्णेश्वर महादेवाच्या दर्शनासाठी महाशिवरात्री निमित्त देशभराहुन आलेल्या लाखो भाविकांनी बुधवारी दर्शन घेतले. तर जिल्ह्यातील भाविकांनी सकाळी पहाटे पासूनच दर्शन घेऊन हर हर महादेवाचा गजर केला.

देशभरातील सर्व ज्योतिर्लिंग महाशिवरात्रीच्या पावन मुहूर्तावर भाविकांनी फुलुन गेले होते. त्याच प्रमाणे मनोकामना पूर्ती करणारा श्री घृष्णेश्वर म्हणून ख्याती असलेले वेरुळातील शेवटचे आणि १२ वे ज्योतिर्लिंगाचे दर्शन देखील लाखोंच्या संखेने भाविकांनी मंदिर ट्रस्ट व पोलिस प्रशासनाच्या चोख पोलीस बन्दोबस्तात घेतले.

तर दुपारी ३ वाजेच्या सुमारास श्री घृष्णेश्वर महादेवाची पालखी वाजत-गाजत जवळच असलेल्या शिवालय तीर्थ कुंडावर नेवुन देवाची ब्रम्हवृन्दान्नी विधिवत पुजा करुण पंचामृत अभिषेख भाविकांच्या प्रमुख उपस्थितीत



करण्यात आला. यावेळी महाशिवरात्री निमित्त आलेल्या भाविकांनी सदरील अभिषेख हा याची देही याची डोळा अनुभवुन कृतकृत्य झाले.

स्वयंसेवी संस्था च्या वतीने पिण्याचे पाणी व फराळाचे वाटप

स्वयंसेवी संस्था च्या वतीने येणाऱ्या भाविकांसाठी पिण्याचे पाणी, उपवासाची खिचड़ी,केळी,पेंडखजूर वाटण्यात आले होते. यामुळे तासंतास रांगेत उभ्या असलेल्या भाविकांना दर्शन घेतल्यावर फराळ करुण तृप्त झाले.

रात्रभर शिवजागर


वेरूळ परिसरात विविध असलेले मठ, मंदिरे आणि आश्रमांमध्ये भाविक रात्रभर शिवजागर करत भगवान घृष्णेश्वर महादेवाच्या सानिध्यात भजन कीर्तन करत होते. यामुळे परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.

दर्शन रांगेत भाविकांत हाणामारी

घृष्णेश्वर मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त दर्शनासाठी गर्दी उसळली असताना भाविकांत जबर हाणामारी झाल्याचा प्रकार सकाळी घडला. भाविकांनी एकमेकांना लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते आ. अंबादास दानवे यांच्या, समक्ष हा प्रकार घडल्याचे सूत्रांनी सांगितले.

व्हीआयपी दर्शन रांगेतून विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते आ. अंबादास दानवे सहकुटुंब जात असताना सार्वजनिक रांगेत उभे असलेले काही भाविक बॅरिकेट्स ओलांडून दानवे यांच्यामागे गेले. त्यानंतर हा प्रकार घडला. तरुण भाविकांत हाणामारी सुरू झाल्याचे पाहून आ. दानवे माघारी फिरून काही वेळ बाहेर थांबले. पोलीस आणि संस्थानमध्ये समन्वय नसल्याने व नियोजनाचा अभाव असल्याची टीका यावेळी आ. दानवे यांनी केली. दिवसभरात आणखी गर्दी होणार असल्याने योग्य नियोजन करा, दुर्दैवी घटना होणार नाही, याची काळजी घ्या, अशी सूचना यावेळी प्रशासनाला आ. दानवे यांनी केली.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (५२) रक्षाबंधन

परमपूजनीय डॉक्टर हेडगेवार नेहमी म्हणायचे भारत मातेची परमवैभवी भव्य इमारत तेव्हाच बांधता येईल जेव्हा त्याचा पाया विस्तृत बलशाली व भक्कम बंधुभावावर आधारित असेल. आपले आजचे माननीय संघचालक आपल्या अनेक भाषणातून या देशातील मुसलमान व ख्रिश्चन बांधवांना बंधुभाव जोपासा असे आवाहन करत असतात. तुम्ही एके काळचे हिंदू आहात; पण तुमचे पूर्वज काही कारणाने धर्मांतरित झाले आहेत, हे लक्षात घ्या. तरच 'हिंदू मुस्लिम सीख ईसाई सब है भाई भाई' हा नारा खरा उतरेल. आज हिंदूंनी सुद्धा जागृत होण्याची गरज आहे. आज हिंदू हजारो जातीत, शेकडो पंथांमध्ये, विभागला गेला आहे. विभाजन माणसाला स्वार्थी करते. स्वार्थीपणाचा हा दोष दूर करायचा असेल, तर प्रत्येक हिंदूचे आत्मभान जागृत झाले पाहिजे. जातीपंथाच्या पलीकडे विचार करून मी फक्त आणि फक्त हिंदू आहे हीच माझी ओळख, अशी अनुभूती त्याने धारण केली पाहिजे. जातीपातीच्या भिंती तोडून; अस्पृश्यतेला गाडून; पंथभेद समाप्त करून; हिंदू युवक उभा राहिला पाहिजे. त्यासाठी

डॉक्टरजी संघात रक्षाबंधनाचा उत्सव साजरा करत असत. यात हिंदू बांधव एकमेकांना राखी बांधत असत. बंधुभाव हा धर्म आहे आणि बंधुभाव हीच मानवता आहे. बंधूभावामुळे एकराष्ट्रीयता निर्माण होईल. बंधुभावना म्हणजे प्रेम भावना; एकमेकांच्या सुखदु:खात सहभागी होण्याची भावना असते. ती सर्वांना घट्ट बांधून ठेवते.

हे विश्वचि माझे घर हे आपले राष्ट्रीय ध्येय आहे. विश्वबंधुत्वाचा पाया हिंदू बंधुत्व आहे. संत ज्ञानदेव माऊलींनी सुद्धा आता विश्वात्मक देवाला साद घातली आहे. क्रमशः

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती



**सोयगाव - श्री.शिव महापुराण कथा व रुद्राक्ष महोत्सव सोयगाव येथे चालू असताना सोमवार रोजी शहरातील समाजसेवक रवींद्र काळे यांच्या निवासस्थानी ह.भ.प.अनिलजी महाराज तुपे नाशिककर यांची भेट दिली असता छोट्या खानी त्यांचा सत्कार समारंभ ठेवण्यात आला होता.त्या प्रसंगी रवींद्र काळे,विजय अहिरे,जगन्नाथ दुत्तोंडे,सदानंद पाटील,योगेश बोखारे,शिवाजी चौधरी,राहुल मानकर,विष्णू आगे,समस्त गावातील मंडळी उपस्थित होती.**

# महाशिवरात्र निमित्ताने स्वयंभू महादेव मंदिर येथे भव्य आरोग्य निदान व उपचार शिबीर व महाप्रसाद वाटप

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २६ फेब्रुवारी : पैठण तालुक्यातील बिडकीन व परिसरातील सर्व महादेव मंदिरात अभिषेक व महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते सर्व मंदिर मध्ये हर हर महादेव, बम बम बोले, गजारामध्ये बालगोपाल महिला पुरुष यांनी मने भाव दर्शन घेतले, व विश्रामगृह येथील स्वयंभू मंदिर येथे आज दि २६ रोजी महाशिवरात्र निमित्ताने मंदिर मध्ये सकाळी सहा वाजेपासून भाविकांची दर्शनासाठी मोठी गर्दी दिसून येत होती सकाळी महाअभिषेक, महाआरतीचे आयोजन



बिडकीन बजरंग दल कार्यकर्त्यांनी केले होते, मंदिर मध्ये दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना फराळ, केळी, दूध ,महाप्रसाद म्हणून वाटप करण्यात आले आहे, तसेच सुमन हॉस्पिटल बिडकीन यांच्या सौजन्याने मंदिर येथे भव्य आरोग्य निदान व उपचार शिबिर आयोजित करण्यात आले होते या शिबिर साठी बिडकीन येथील सरपंच, उपसरपंच, तसेच विविध क्षेत्रातील पदाधिकारी व नागरिक भाविक उपस्थित होते या शिबिर साठी डॉ सुनील लगाने, डॉ अक्षय लगाने, डॉ सचिन मस्के, डॉ निलेश राठोड, डॉ राजेश रोडगे, डॉ गिरीश देशमुख, भूमीका खेडकर ,प्रतीक्षा वानखेडे, योगीता वाघ, यांनी या शिबीर प्रसंगी परिश्रम घेतले, या वेळी डॉ सुनील लघाने यांनी महात्मा फुले जन आरोग्य योजना, व महाराष्ट्र इमारत व बांधकाम कल्याणकारी मंडळ, व ई एस आय सी या मोफत आरोग्य योजने संदर्भात मार्गदर्शन केले , या शिबीर साठी सुमन हॉस्पिटल वाळूज, लगाने हॉस्पिटल बजाज नगर, लिलसन हॉस्पिटल बजाज नगर, यांनी सहकार्य केले, यावेळी संकेत राठी, अरुण गरड, बंडू गरड ,संजय करपे ,ज्ञानेश्वर निकम, यांनी परिश्रम घेतले, या शिबीर मध्ये (१७०) रुग्णांची तपासणी करून मोफत औषध देण्यात आले, या शिबीर साठी महाराष्ट्र इमारत बांधकाम कल्याणकारी मंडळाचे अधिकारी श्याम पाटील यांची उपस्थिती होती.

# सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांच्या हस्ते मोफत कम्युनिटी हेल्थ कॉल सेंटर चे उद्घाटन

छत्रपती संभाजीनगर : आरोग्य सहयोग (हेल्थकेअर सपोर्ट) २४/७ टोल फ्री कॉल सेंटरच्या माध्यमातून महाराष्ट्रातील लोकांना मोफत सल्ला, रेफरल, आपत्कालीन मदत आणि आरोग्य विषयी कमल नयन बजाज हॉस्पिटल तर्फे २६ फेब्रुवारी २०२५ रोजी एक महत्त्वाचा उपक्रम सुरू केला आहे.सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते या हेल्थ कॉल सेंटरचे उद्घाटन करण्यात करण्यात आले. छत्रपती संभाजीनगरचे मध्य चे आमदार प्रदीप जैस्वाल,माजी नगरसेवक विकास जैन या वेळी व्यासपीठावर होते.



कमल नयन बजाज हॉस्पिटल आपल्या समाज सेवेतील योगदान आणि आरोग्य सेवांची सुविधा अधिक लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी सदृढ प्रयत्न करत आहे.

आरोग्य सहयोग हे एमएमआरआय ट्रस्टच्या कमलनयन बजाज रुग्णालयाचा हा एक नवा उपक्रम असून, ही सेवा सकाळी ८ ते रात्री ८ या वेळेत उपलब्ध असेल. समुदाय आणि आरोग्य सेवा यांच्यातील अंतर भरुन काढण्यासाठी समर्पित ही हेल्पलाईन आहे. आरोग्य कॉल सेंटर नागरिकांना त्वरित वैद्यकीय सल्ला, टेलीकन्सल्टेशन आणि महत्त्वपूर्ण आरोग्यविषयक माहिती उपलब्ध करून देण्यात येणार असून विशेषतः ग्रामीण व वंचित भागांतील रुग्णांना दर्जेदार आरोग्यसेवा सहज आणि वेळीच मिळावी यासाठी आरोग्य सहयोग कार्यरत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या साठी गरजू रुग्णांनी मोफत हेल्थ कॉल क्रमांक ९६०७९९१७१९ वर फोन करून सदरील योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.या वेळी डॉ .अजय रोटे, डॉ. जॉर्ज फर्नांडिस डॉ. मिलिंद वैष्णव , डॉ. विकास जैन यांच्यासह रुग्णालयाचे कर्मचारी उपस्थित होते.

## स्वातंत्र्यवीर सावरकरांचा ५९ वा आत्मार्पण दिनाचा अभिवादन सोहळा संपन्न

छत्रपती संभाजीनगर - स्वातंत्र्यवीर सावरकर प्रेमी मित्र मंडळ छत्रपती संभाजीनगर आयोजित समर्थ नगर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर पुतळ्यास अभिवादन करण्यात आले.

यावेळी मंडळाचे अध्यक्ष भाऊ सुरडकर यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या देशभक्ती त्यांचे राष्ट्रप्रेम आज देशाला त्या प्रत्येक गोष्टीची गरज किती नितांत आहे हा विचार मांडला राष्ट्र आज आधुनिक युगाकडे चाललेले आहे ही सावरकरांची संकल्पना होती आपलं राष्ट्र हे बलवान असायला पाहिजे कोणत्याही संकटाला सामर्थ्यांनी तोंड देण्याची त्याची



क्षमता असायला पाहिजे असं त्यांचं मत होतं अंदमान येथे आज देशाचं जे नेहमीचा आभार बनलेला आहे याची संकल्पना स्वातंत्र्य सावरकरांची होती. सावरकर जसे क्रांतिकारक प्रकर राष्ट्रभक्त हिंदू संघटक तसेच ते लेखक कवी संपादक साहित्यिक देखील होते आज त्यांच्या आतपार पण दिनाच्या निमित्ताने स्वातंत्र्य सावरकर प्रेमी मित्र मंडळातर्फे गुरुवार दिनांक २७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी साडेसहा ते साडेआठ या दरम्यान सावरकरांचे गीतांचा कार्यक्रम श्रीराम मंदिर राज नगर गाद्या विहार रस्ता छत्रपती संभाजी नगर येथे आयोजित करण्यात आलेला आहे नागरिकांनी अधिकाधिक या सावरकर गीतांचा लाभ घ्यावा असे मंडळातर्फे आवाहन करण्यात आले आहे सावरकरांच्या पुतळ्यास अभिवादन करताना मंडळाचे अध्यक्ष भाऊ सुरडकर, उपाध्यक्ष सुभाष कुमावत, सचिव विजय जहागीरदार, कोषाध्यक्ष किरण सराफ, माजी महापौर नंदकुमार घोडेले,विश्व हिंदू परिषद प्रचार विभाग प्रमुख अनंत जोशी,आनंद तांदूळवाडीकर, शामराव देशपांडे, प्रशांत पुराणिक, उमेश देशपांडे, विनायक कुरुडकर शेखरपुर, प्रमोद सौंदे, संजय पांडे, मधुकर वैद्य, यांच्यासह अनेक सावरकर फक्त या आत्मार्पण सोहळ्यास उपस्थित होते.

## श्री निधी फायनाशिअल्सच्या अर्थ विषयक सुसंवाद कार्यक्रमाला उदंड प्रतिसाद

छत्रपती संभाजीनगर : श्री निधी फायनाशिअल्सच्या अर्थ विषयक सुसंवाद कार्यक्रमात सुरुवातीला डॉ. श्रीराम सावरीकर, कौस्तुभ पातुरकर, डॉ.रवी रमण, डॉ.पातूनकर, सौ.शामला भोगले यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमाचे व्याख्याते समीर कुलकर्णी, श्रेयस मुरुमकर, मयुर वैष्णव यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले गेले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री निधी फायनाशिअल्सचे संचालक राजेंद्र परोपकारी यांनी सांगितले मार्केट मध्ये चढ उतार नेहमीच होत असतो त्यामुळे तुम्ही गडबडु न जावू नका.२००८ साली



ग्लोबल फायनाशिअल्स मुळे असेच मार्केट ५०% गडगडले होते तरीही अनेक गुंतवणूकदारांनी sip आणि cost averaging च्या माध्यमातून त्यांनी फायदा करुन घेतला .त्यामुळे सध्या सेन्सेक्स कोसळलेला आहे त्याची काळजी करु नका.

व्याख्याते समीर कुलकर्णी म्हणाले इनव्हेस्टमेंट ही प्रत्येकांसाठी गरजेनुसार वेगवेगळी असते.गोल्ड इनव्हेस्टमेंट, फिक्स डिपॉझिट इनव्हेस्टमेंट, म्युच्युअल फंड, शेअर्स इनव्हेस्टमेंट, एखादे घर, शेती, प्लॉट मधिल इनव्हेस्टमेंट देखील लाभदायक ठरते. चांगल्या डव्हाजरकडून सल्ला घेवूनच इनव्हेस्टमेंट करणे आवश्यक आहे.

त्यानंतरचे व्याख्याते श्रेयस मुरुमकर म्हणाले आपणं प्रत्येकांनीच हेल्थ इन्शुरन्स बरोबरच वेल्थ इन्शुरन्स करणं गरजेचं आहे.भविष्यात काही घटना घडल्या तर त्याला सामोरे जाण्यासाठी अशा इन्शुरन्सची आवश्यकता आहे.

व्याख्याते मयुर वैष्णव म्हणाले जगाच्या अर्थ विश्वाचा अभ्यास करून डीएसपी म्युच्युअल फंडानी दोन म्युच्युअल फंड सर्वांसाठी आणलेले आहेत त्याची माहिती दिली. कार्यक्रमाच्या शेवटी सार्थक इव्हेंटचे संचालक ओंकार परोपकारी यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सौ.मीनल कोंडपल्ले, अभिजित टाकळकर, सौ.राधिका परोपकारी आणि सुधीर कोर्टीकर यांनी परिश्रम घेतले.

## एमजीएममध्ये मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन


छत्रपती संभाजीनगर, दि.२६ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिन गुरूवार, दिनांक २७ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या आईनस्टाईन सभागृहात उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्ताने साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखकाचा सन्मान तसेच प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे कवी संमेलन आयोजित करण्यात आले आहे.

या विशेष कार्यक्रमात ज्येष्ठ समीक्षक डॉ.सुधीर रसाळ यांचा सत्कार करण्यात येणार आहे. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या कविसंमेलनाचे उद्घाटन प्रसिद्ध हास्यकवी प्रा. डॉ.विष्णू सुरासे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित असणार आहेत.

यावेळी आयोजित करण्यात आलेल्या कवी संमेलनात एमजीएम विद्यापीठातील प्राध्यापक आणि विद्यार्थी यांचा सहभाग असणार आहे. या कार्यक्रमास सर्वांना खुला प्रवेश असून मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन कार्यक्रमाचे समन्वयक प्रा.डॉ.राम गायकवाड आणि प्रा.डॉ.मारोती गायकवाड यांनी केले आहे.

## दिग्दर्शक राजदत्त यांच्या हस्ते 'एप्रिल मे ९९'च्या पोस्टरचे अनावरण

छत्रपती संभाजीनगर : दिग्दर्शक-निर्माते राजेश मापुस्कर आणि मापुस्कर हे दोघे भाऊ एकत्र येऊन प्रेक्षकांसाठी एक खास भेट घेऊन आले आहेत. मापुस्कर ब्रदर्स इन असोसिएशन फिंगर प्रिंट फिल्म्स, नेक्सस अलायन्स , थिंक टँक आणि मॅगीज पिक्चर्स प्रस्तुत 'एप्रिल मे ९९' हा चित्रपट येत्या उन्हाळ्याच्या सुट्टीत म्हणजे, १६ मे २०२५ रोजी चित्रपटगृहात प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून नुकतेच या



चित्रपटाचे पोस्टर प्रदर्शित झाले आहे. चित्रपटाच्या पोस्टरचे अनावरण मराठी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ दिग्गज दिग्दर्शक राजदत्त यांच्या हस्ते करण्यात आले . निर्माते राजेश मापुस्कर म्हणतात, श्रीवर्धनमध्ये आमचा मापुस्कर कुटुंबाचा एक सिनेमा हॉल होता. तो सिनेमा हॉल आम्हा दोन भावांसाठी जणू एक चित्रपट शाळाच ठरला. तिथे राजदत्त जींचे चित्रपट पाहत आम्ही मोठे झालो आणि इतकेच नाही तर आम्ही त्यांच्या प्रत्येक चित्रपटाचे पोस्टर श्रीवर्धन आणि आजूबाजूच्या गावांमध्ये जाऊन चिकटवायचो. आज आम्ही राजदत्त यांच्या हस्ते रोहनच्या पहिल्या चित्रपटाचे 'एप्रिल मे ९९' चे पोस्टर रिलीज करत आहोत. यापेक्षा मोठा आनंद दुसरा कोणता असू शकतो? त्यांच्या शुभेच्छांमुळे आमच्या प्रवासाला एक वेगळे बळ मिळाले असून त्यांचे हे आशीर्वाद आम्हाला कायम प्रेरित करतील.

## अनिल कांबळे यांना जीवन गौरव पुरस्कार



बिडकीन दि २६ फेब्रुवारी श्री.सरस्वती भुवन प्रशाला बिडकीन येथील क्रीडा शिक्षक अनिल कांबळे यांना दया समर्पण फाउंडेशनचा जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. बजाजनगर येथे संपन्न झालेल्या विशेष कार्यक्रमात अनिल कांबळे यांच्या सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल प्रमुख अतिथी यांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. अनिल कांबळे यांना आतापर्यंत विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. आंबेडकरी चळवळीतील एक आक्रमक व तरुण तडफदार चेहरा म्हणून त्यांच्याकडे कडे पाहिले जाते. त्यांना जीवन गौरव पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल प्रशालेच्या वतीने मुख्याध्यापक धर्मेंद्र येवले उपमुख्याध्यापक युवराज पाडळे प्रभारी पर्यवेक्षक राजू शिंदे, ज्ञानेश्वर चाटूपळे, बाबासाहेब सोकटकर ,यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.अनिल कांबळे यांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

## अग्रलेख

# फिक्सर आवडे सर्वांना...

महाराष्ट्रातील महायुतीच्या सरकारमध्ये विशेष कार्यकारी अधिकारी आणि स्वीय सहायकांच्या नियुक्त्या करण्यावरून सुरू झालेल्या चर्चांना पूर्णविराम देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेली 'फिक्सर नेमू देणार नाही' ही भूमिका अत्यंत स्वागतार्ह आहे. ही भूमिका घेतल्याबद्दल फडणवीसांचे अभिनंदन. 'फिक्सर आवडे सर्वांना, दलाल भावे साऱ्यांना' अशी परिस्थिती असतानादेखील अशा प्रकारचा निर्णय घेणारे फडणवीस हे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री आहेत. त्यांच्या या निर्णयामुळे राज्याचा कारभार आणखी सुधारण्याची शक्यता निर्माण झाली आहे. महायुती सरकारमधील काही मंत्र्यांकडून काही विशिष्ट व्यक्तींची आपापल्या आस्थापनांवर ओएसडी किंवा पीए म्हणून नियुक्ती करण्यासंबंधीचे प्रस्ताव पाठविण्यात आले. त्यातील काही प्रस्ताव मुख्यमंत्र्यांनी रोखले किंवा फेटाळले. बहुतांशी नियुक्त्यांना त्यांनी मंजुरी दिली आहे. शासन-प्रशासनात ज्यांना 'फिक्सर' म्हणून ओळखले जाते, ज्यांच्या चौकशा सुरू आहेत, अशांच्या नियुक्त्या मुख्यमंत्र्यांनी केलेल्या नाहीत. त्यावरून त्यांच्या मंत्रिमंडळातील आपापल्या मंत्र्याने थोडा राग दरबारी आळवला खरा; पण त्यालाही मुख्यमंत्र्यांनी दम देऊन गप्प केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दीर्घकाळ राजकारणात आहेत. त्यांना शासन-प्रशासनाचा प्रदीर्घ अनुभव आहे. त्यामुळे त्यांना यातले बारकावे कळतात. कोण बदमाश आहे, हेही त्यांना चांगले ठाऊक आहे. मंत्रालयात, विशेषतः मंत्र्यांच्या आस्थापनांवर काम करणारे अनेक ओएसडी किंवा पीए-पीएस हे मुलखाचे बदनाम आहेत. खरे तर 'फिक्सर' हा शब्द त्यांच्यासाठी अंमळ मवाळच म्हटला पाहिजे. त्यांना अधिक योग्य विशेषण 'दलाल' हेच असले पाहिजे. गेल्या तीन-चार दशकांपासून अशा दलालांचेच मंत्रालयात साम्राज्य आहे. बदली, बढती, टेंडर, अकृषक जमिनीचा विषय, भूमी अधिग्रहण, विशेष बाब म्हणून काही कामांना मिळणाऱ्या मंजुरी, सप्लाय, पोषण आहार, खरेदी-विक्री किंवा असे कोणतेही काम घ्या, ते करून देणारी दलालांची पिलावळं ओएसडी आणि पीए-पीएस पदावर विराजमान आहे. सरकारे बदलली, मंत्री बदलले; पण अशा दलालांच्या खुर्च्या मंत्रालयात कायम आहेत. त्यांची दालने बदलली किंवा खाती बदलली एवढीच. हे वास्तव मुख्यमंत्र्यांनी ध्यानात घेतले आणि त्याबद्दल कठोर भूमिका घेतली, हे कौतुकास्पद आणि प्रशंसास्पद आहे.

अशा फिक्सरांची एक मोडस ऑपरेंडी म्हणजे काम करण्याची पद्धत असते. त्यात त्यांचे शासन-प्रशासनातील 'साहेब' बहुतेकदा सहभागी असतात किंवा त्यांची या कामांना मूक संमती असते. आपला हिस्सा मिळाला की, 'साहेब' कानाडोळा करतात, हे अशा फिक्सरांना माहिती असते. तेवढे काम ते निगुतीने करतात. सामान्य माणसांना मंत्रालयात जाणे अवघड असते, प्रवेश मिळालाच तर काम करून घेणे त्याहून अवघड. त्यामुळे दलालाचे नेटवर्क निर्माण झाले आणि वाढले. एखाद्या मंत्रालयबाह्य दलालाकडून अशा ओएसडी किंवा पीएकडे येतो. बोलणे होते, सौदा ठरतो. काही रक्कम अग्रिमात दिली किंवा पोहोचविली जाते. साहेबांना त्याची माहिती योग्य वेळी दिली जाते आणि त्यांना त्यांचा वाटाही मिळतो. त्या विषयाची कागदपत्रे या टेबलावरून त्या टेबलावर नेण्याचे आणि अंतिम मंजुरीसाठी स्वाक्षरी मिळविण्याचे महान कार्य हे 'विशेष' कार्यात निपुण असलेले मंत्रालयीन दलालच करीत असतात. फायनल सेटलमेंटच्या वेळी पुन्हा रक्कम मिळविण्याची व त्याच्या वाटपाची जबाबदारी त्यांचीच असते. यात ते भक्कम मलाई कमावतात. मंत्रालयात पीए-पीएस किंवा ओएसडी राहिलेले व बदनाम झालेले अधिकारी-कर्मचारी कमी नाहीत. अशातल्या काहींच्या चौकशा सुरू आहेत. खरे तर दीर्घ काळ मंत्रालयात पीए-पीएस, ओएसडी म्हणून काम केलेल्या प्रत्येकाचीच चौकशी लावली पाहिजे. त्यातले किमान ५० टक्के भ्रष्ट सापडतील. त्यांच्या मालमत्ता मुंबईत व गावाकडे आहेत. त्यांचे फार्म हाऊसेस आहेत. त्यांच्याकडे आलिशान गाड्यांचे ताफे आहेत. त्यांच्या घरी मोठ्या प्रमाणात सोने-जवाहिरात आहे. त्यांची मुले विदेशात शिकतात. त्यांचे पगार किती आणि त्यांचा खर्च किती, याचा ताळमेळ कुठेच जुळत नाही. त्यांचे लागेबांधे असलेले लोक महाराष्ट्रात सर्वदूर आहेत. एकदा नागपुरात शोधले तर किमान शंभर एक्सपर्ट दलाल असे सापडतील, की ते मंत्रालयातील कोणतेही काम करून आणू शकतात. त्यांचे मंत्रालयातील या पदासीन दलालांशी साटेलोटे असते. प्रत्यक्षात या दलालांकडे कोणतेही पद नसते. असलेच तर ते किरकोळीचे असते किंवा एखाद्या राजकीय पक्षाचे छूटभय्ये पदाधिकारी म्हणून ते वावरत असतात. प्रत्यक्षात ते व्यवसाय-नोकरी यातले काहीही करीत नाहीत. त्यांच्या उत्पन्नाचा अधिकृत स्रोत नाही. तरीही ते शोफर ड्रिवन आलिशान गाडीतून फिरतात. उंची सवयींचे गुलाम असतात. मंत्रालयातील पदासीन दलालांचे ते एजंट असतात. याशिवाय, काही मंत्र्यांनी गतकाळात आणि आताही असे एजंट जागोजागी पेरून ठेवलेले आहेत. तेही अशा कामांत तरबेज असतात. मंत्र्यांचे त्या गावी आगमन झाले की, त्यांची सारी बडदास्त ठेवण्यासाठी जो आगेपीछे करीत असतो, धडपडत असतो, तो त्याचा एजंट असतो, असे बिनधास्त समजावे म्हणतात. याचा अर्थ असा की, फिक्सर्स केवळ मंत्रालयात नाहीत. त्यांनी समस्त महाराष्ट्र व्यापलेला आहे. त्यांनी संपूर्ण व्यवस्था वेठीस धरलेली आहे. सरकारचे कोणतेही कार्यालय असो, तेथे दलाल आहे. तेथे साहेबांचा एजंट असतो. साहेबांचा खास माणूस म्हणून दलाली करणारे लोक आहेत. तेथे ब्लॅकमेलिंग व दलाली असा दुहेरी धंदा करणारे लोकही आहेत. काही तथाकथित पत्रकार किंवा मानवाधिकारवादी किंवा भ्रष्टाचारविरोधी संघटनेचे पदाधिकारी म्हणून वावरणारेही त्यात आहेत. या सर्वांनी मिळून भ्रष्टाचाराला संस्थात्मक व्यवस्थेचे अधिष्ठान दिलेले आहे. पैसा खर्च केल्याविना कोणतेही काम होत नाही. सिटी सर्व्हे किंवा रिअल इस्टेटच्या रजिस्ट्रार कार्यालयात दिवसाढवळ्या लाचखोरी होते. त्यांना त्यांच्या आकांचे संरक्षण असते. कितीही तक्रारी करा, त्यांच्यावर कारवाई होत नाही. भ्रष्टाचार रोखण्यासाठी नेमलेल्या यंत्रणांमध्ये भ्रष्टाचार आहे. आरटीओ, इरिगेशन, रेव्हेन्यू, पीडब्ल्यूडी यांच्याकडून नियमित हप्ते दिले जातात. पोलिसांकडून हप्ते घेणारेही महाभाग आहेत. व्हिजिलन्सची जबाबदारी असलेले लोक भ्रष्ट आहेत. एकूणात संपूर्ण व्यवस्था भ्रष्टाचार व दलालीने सडलेली आहे. ती सुधारण्याच्या दिशेने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पहिले पाऊल टाकले आहे. त्यामुळे त्यांना शासन-प्रशासनातील प्रत्येकाने साथ दिली पाहिजे, अशी अपेक्षा करणे स्वाभाविक आहे. प्रत्यक्षात तसे होण्याची शक्यता यासाठी कमी आहे की, भ्रष्टाचाराच्या माध्यमातून अतोनात पैसा कमावणे हे यापैकी बहुतेकांचे व्यसन आहे आणि त्यामुळे फडणवीस हे त्यांना त्यांचे शत्रू वाटू शकतात. यांत गाव तेथे प्रॉपर्टी असलेले अनेक अधिकारी आहेत. ज्या-ज्या गावात-शहरात त्यांची बदली होते, तेथे ते घर, शेतीवाडी, फार्म हाऊस, किरायाने द्यावयाच्या शोरूम्स अशी प्रॉपर्टी निर्माण करतात. त्यातून त्यांचे वेगळे उत्पन्न सुरू असते. येथे कुणाचेही नाव घेण्याचे कारण नसले, तरी असे अधिकारी अनेकांना परिचित आहेत. ते मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, ठाणे, छत्रपती संभाजी नगर, कोल्हापूर-सोलापूरसह चंद्रपूर-गडचिरोलीतही आहेत किंवा राहिलेले आहेत. या सर्वांनी सामान्य आणि गरिबांच्या नाकी नऊ आणलेले आहेत. मुख्यमंत्र्यांनी आपल्या सहकारी मंत्र्यांच्या स्टाफच्या संदर्भात अशी कठोर भूमिका घेतली असेल तर त्यांनी आता कुणाचीही मुर्वत न करता कारवाईचा रेटा पुढे नेला पाहिजे. यानिमित्ताने सगळ्या शासन-प्रशासन व्यवस्थेची अधिकाधिक स्वच्छता झाली पाहिजे. फिक्सर, सेटर, दलाल यांना ग्रामपंचायतीपासून मंत्रालयापर्यंत कुठेही थारा असता कामा नये. फडणवीस यांच्यात ती धमक आहे. त्यांचा दरारा आहे. त्यांनी आता महाराष्ट्राचे हेडमास्तर झाले पाहिजे. गुंडांना, गुन्हेगारांना त्यांनी जरब बसविली आहे. दलाल-फिक्सर हे तर व्हाईट कॉलर्ड गुन्हेगार आहेत. त्यांना एक दट्ट्या दिला तरी ते सरळ होतील. ज्याच्याबद्दल जरासाही संशय असेल, ज्याच्या विरोधात छोटीशीही तक्रार असेल, त्याची चौकशी लावली पाहिजे. मग तो अधिकारी मंत्रालयातला असो वा गडचिरोलीतल्या कुठल्या शासकीय कार्यालयातला. सरकारी व्यवस्था सुधारायची असेल आणि महायुती सरकारच्या योजनांचे, कार्याचे लाभ सामान्यांना, गरिबांना व्यवस्थित पोहोचवायचे असतील तर सर्व स्तरांतील अशा दलाल, फिक्सर्स, सेटर्सवर अंकुश आणलाच पाहिजे. काँग्रेसच्या काळापासूनची ही पिलावळं आहे आणि ती भक्कम माजलेली आहे. त्यांचे हात भ्रष्टाचाराने बरबटलेले आहेत. मुख्यमंत्र्यांनी सुरुवात केलीच आहे तर त्यांच्या मागे हात धुऊन लागावे किंवा त्यांना स्वतःहून स्वच्छ होण्यास भाग पाडावे. तसे झाले तर महाराष्ट्राच्याच नव्हे, तर देशाच्या इतिहासात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नाव सुवर्णाक्षरांनी लिहिले जाईल आणि त्यांना सामान्यांची, गरिबांची दुवा मिळेल. मुख्यमंत्र्यांना शुभेच्छा!

## चिंतन

गुरुदत्त दिनकर वाकदेकर

# भारत-अमेरिका : व्यापार धोरणाला नवे वळण

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यातील बहुचर्चित कूटनीतिक बैठक नुकतीच संपन्न झाली. या बैठकीत दोन्ही देशांमधील व्यापार, संरक्षण, स्थलांतर धोरण, जागतिक राजकारण आणि सामरिक भागीदारी यासंदर्भात चर्चा झाली. या चर्चेचा केंद्रबिंदू अमेरिकेच्या आर्थिक आणि सामरिक धोरणांचा प्रभाव भारतावर कसा पडेल, यावर होता. ट्रम्प यांनी 'अमेरिका फर्स्ट' धोरण कायम ठेवत अमेरिकेच्या व्यावसायिक फायद्यांवर भर दिला, तर भारताने आपल्या राष्ट्रीय हितांचे रक्षण करण्याचा प्रयत्न केला.

अमेरिका आणि भारत यांच्यात सध्या ४५ अब्ज डॉलर्सची व्यापार तूट आहे. ट्रम्प यांनी हे अंतर कमी करण्यासाठी भारताला एफ-३५ लढाऊ विमाने, तेल, वायू आणि लष्करी उपकरणे विकण्याचा प्रस्ताव दिला. मात्र, भारत सरकारने याबाबत कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही. भारताकडे आधीपासूनच रशियन एसयू-५७ फायटर जेटचा स्वस्त आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम पर्याय उपलब्ध आहे. विशेषतः रशिया हे विमान भारतातच उत्पादन करण्यास तयार आहे, तर अमेरिकेने त्याच्या तंत्रज्ञानाच्या हस्तांतरणास नकार दिला आहे. भारत 'मेक इन इंडिया' धोरणांतर्गत संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भर बनण्यावर भर देत असल्याने अमेरिकेकडून मोठ्या प्रमाणावर लष्करी उपकरणे आयात करणे भारताच्या संरक्षण धोरणाशी विसंगत ठरू शकते. भारत आणि अमेरिका यांच्यात सह-उत्पादन आणि तंत्रज्ञान हस्तांतरण यावर भर दिला जाऊ शकला असता, पण अमेरिका याबाबत इच्छुक दिसली नाही.

भारत आणि अमेरिकेच्या व्यापार संबंधांकडे पाहता, भारत अमेरिकेतून सुमारे २ लाख कोटी रुपयांच्या मालाची आयात करतो, तर ४ लाख कोटी रुपयांचा माल निर्यात करतो. त्यामुळे २ लाख कोटी रुपयांचा व्यापार नफा भारताच्या बाजूने आहे. ट्रम्प यांनी भारतीय वस्तूंवर अधिक शुल्क लादण्याचा इशारा दिला आणि भारताने अमेरिकन वस्तूंवरील कर कमी करण्यास सांगितले. मोदी सरकारने २०३० पर्यंत भारत-अमेरिका व्यापार दुप्पट करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. भारताने गेल्या काही वर्षांत व्यापार व्यवहारांसाठी डॉलरच्या वापरावर अवलंबित्व कमी करण्यासाठी रुपया-रशियन रुबल किंवा इतर चलनांमध्ये व्यवहार करण्याचा प्रयत्न केला आहे. अमेरिकेच्या दडपशाहीमुळे भारताच्या या धोरणावर काहीसा परिणाम होऊ शकतो. भारताने काही कृषी उत्पादनांवर (जसे की बदाम, अक्रोड आणि डाळी) अमेरिकन निर्यातदारांना काही सवलती दिल्या आहेत, पण अमेरिकेने अजूनही भारतीय कृषी उत्पादनांवर कठोर आयात धोरण ठेवले आहे. भारताने यावर दबाव आणणे अपेक्षित होते.

अमेरिकेत बेकायदेशीररीत्या राहत असलेल्या भारतीय नागरिकांचा प्रश्न चर्चेत आला. ट्रम्प प्रशासनाने यापूर्वी अनेक भारतीयांना परत पाठवले होते; काहींना तर हातकड्या आणि बेड्या घालून पाठवण्यात आले होते, यावर भारताने आक्षेप घेतला. मोदींनी स्पष्ट केले की, योग्य प्रक्रियेनुसार सत्यापन झाल्यास भारत त्यांना परत घेण्यास तयार आहे, परंतु त्यांच्या मानवी हक्कांचे संरक्षण व्हायला हवे. तसेच, एच-१बी व्हिसावर कोणताही स्पष्ट निर्णय झाला नाही; ज्यामुळे भारतीय आयटी व्यावसायिकांसाठी अनिश्चितता कायम आहे. अमेरिकन कंपन्या आणि सरकार भारताच्या डिजिटल डेटा आणि तंत्रज्ञान धोरणावर लक्ष ठेवून आहेत. भारताच्या डेटा संरक्षण कायद्यावर अमेरिकेने नाराजी व्यक्त केली आहे. कारण भारतीय नागरिकांचा डेटा भारतातच साठवण्याचा भारत सरकारचा प्रयत्न आहे.

मुंबईवरील २००८ च्या दहशतवादी हल्ल्याचा मुख्य आरोपी तहव्वूर राणा याला भारतात प्रत्यार्पित करण्याच्या अमेरिकेच्या निर्णयाबद्दल मोदींनी आभार मानले. तसेच, अमेरिका आणि भारत यांनी दहशतवादाविरोधात सहकार्य वाढविण्याचा निर्णय घेतला. भारत आणि अमेरिकेतील वाढती मैत्री 'हाऊडी मोदी' (ह्युस्टन) आणि 'नमस्ते ट्रम्प' (अहमदाबाद) या सार्वजनिक कार्यक्रमांमधूनही दिसून आली. अमेरिका आणि चीन यांच्यातील व्यापारयुद्ध पुन्हा वाढण्याची शक्यता चर्चेदरम्यान व्यक्त झाली. सध्या अमेरिका-चीन व्यापार संतुलनात चीनचा प्रभाव मोठा आहे आणि त्यामुळे अमेरिकेला २९५ अब्ज डॉलर्सचा तोटा सहन करावा लागत आहे. अमेरिका भारताला चीनविरोधी आघाडीत अधिक सक्रिय सहभागी होण्यास प्रवृत्त करत आहे. अमेरिका आणि भारत यांच्यातील नौदल सहकार्य (मलाबार एक्सरसाईज) आणि भारताच्या अंदमान-निकोबार बेटांचे धोरणात्मक महत्त्व या चर्चेत आले असते तर अधिक व्यापक चित्र स्पष्ट झाले असते. विशेषतः भारत आणि चीन यांच्यातील तणाव लडाखमधील संघर्षामुळे वाढला आहे. ट्रम्प यांनी या संघर्षाला 'दुर्दैवी' म्हटले आणि अमेरिका यात मदत करू शकते, असे सांगितले. भारत, अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलिया या देशांनी मिळून तयार केलेल्या क्वॉड युतीचा चीनच्या विस्तारवादी धोरणांवर प्रतिकार



करण्यासाठी उपयोग केला जात आहे.

भारत पूर्वी अमेरिकेकडून मोठ्या प्रमाणावर तेल आणि वायू खरेदी करत होता, परंतु रशिया-युक्रेन युद्धानंतर भारताने रशियन तेल स्वस्तात खरेदी करण्यास सुरुवात केली. ट्रम्प यांनी भारतावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला असला, तरी भारत आपली ऊर्जा गरजा स्वतःच्या राष्ट्रीय हितानुसार ठरवेल. इराणच्या चाबहार बंदर प्रकल्पावरील भारताची गुंतवणूकदेखील महत्त्वाची आहे. अमेरिका या प्रकल्पावर नाराज असली, तरी भारताने त्यात पुढे जाण्याचे ठरवले आहे. कारण तो मध्य आशियाशी भारताची थेट जोडणी साधतो.

तैवानच्या मुद्यावर भारताने सावध भूमिका घेतली आहे. अमेरिका भारताला अधिक उघडपणे तैवानच्या बाजूने बोलण्यास प्रवृत्त करत आहे, पण भारताने आपल्या धोरणात संतुलन ठेवले आहे. भविष्यात या मुद्यावर भारताला अधिक स्पष्ट भूमिका घ्यावी लागेल. अमेरिकेत भारतीय वंशाचे अनेक प्रभावी राजकारणी (कमला हॅरिस, विवेक रामास्वामी, बॉबी जिंदाल) आहेत. भारत-अमेरिका संबंध सुधारण्यात त्यांची भूमिका महत्त्वाची ठरू शकते, पण त्याबद्दल चर्चा झाली नाही. भारत-अमेरिका संबंध अनेक स्तरांवर विस्तारत आहेत; परंतु काही मुद्दे अजूनही चर्चेत आलेले नाहीत. विशेषतः संरक्षण उत्पादन, तंत्रज्ञान हस्तांतरण, डेटा सुरक्षा आणि कृषी व्यापार यावर अधिक ठोस निर्णय होण्याची गरज आहे. अमेरिकेने आपल्या व्यावसायिक हितांना जास्त महत्त्व दिले, तर भारतानेही आपल्या राष्ट्रीय हितांचे संरक्षण करण्याचा प्रयत्न केला. व्यापार, संरक्षण आणि सामरिक भागीदारी यासंदर्भात काही ठोस निर्णय झाले असले, तरी भारतीय अप्रवासी, एच-१बी व्हिसा आणि करप्रणालीसंदर्भात कोणतीही स्पष्टता मिळाली नाही. भविष्यात भारत-अमेरिका संबंध अधिक दृढ होतील, पण भारत आपली स्वायत्तता टिकवून ठेवत धोरणात्मक निर्णय घेत राहील.

९९८७७४६७७६

## वेध

गिरीश शेरेकर

# सोन्याची दरवाढ

भारतात पुरुषांपेक्षा महिलांसाठी सोने जिव्हाळ्याचा विषय आहे. सोन्याचे दागदागिने महिलांना हवेच असतात. आपल्याकडे आजही लग्नकार्यात पाहुणे मंडळी आवर्जून एक प्रश्न विचारतात, तो म्हणजे मुली व मुलीला किती तोळे सोने दिले. त्यावरून प्रतिष्ठेचे अंदाज बांधले जातात. निश्चित परताव्याची हमी असल्याने अनेकांकडून गुंतवणूक म्हणून सोने खरेदी केले जाते. बदलत्या आर्थिक व्यवस्थेत गुंतवणुकीचे अनेक पर्याय उपलब्ध असताना सोन्यावरचा विश्वास थोडासापण कमी झालेला नाही. विशेष म्हणजे सातत्याने दरवाढ होऊन सुद्धा सोने खरेदीत वाढ नोंदविली जात आहे. सोन्याचे दर वाढण्याची अनेक कारणे आहेत. इतिहासात पहिल्यांदाच मध्यवर्ती बँकांनी सलग तिसऱ्या वर्षी १००० टनांपेक्षा जास्त सोने खरेदी केले आहे. सोन्याची मागणी व दर १९४४ पासून सतत वाढत आहे. सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे चीन, अमेरिका आपल्या तिजोरीतील ठेवी विकून सोने खरेदी करत आहे. चीन आणि भारतातील सोन्याच्या साठ्याने आतापर्यंतचा उच्चांक गाठला आहे. याशिवाय तुर्की, पोलंड, नेदरलॅण्ड आणि पोर्तुगाल देखील त्यांचे सोन्याचे साठे वेगाने वाढवत आहेत. अमेरिकेतील कर्ज संकट आणि महागाईमुळे गुंतवणूकदार हे सोन्याकडे वळत आहेत. कोरोना महामारीनंतर अमेरिकेचे कर्ज १३ ट्रिलियन डॉलर्सने वाढले आहे तर अमेरिकन डॉलरचे मूल्य २५ टक्के कमी झाले आहे. या कारणास्तव गुंतवणूकदार सोन्याला सुरक्षित गुंतवणूक मानत असल्याने दरात दिवसेंदिवस वाढ होताना दिसत आहे. मागणी आणि पुरवठा या सूत्राचाही परिणाम दरवाढीवर झाला आहे.

लंडन बुलियन मार्केट सोन्याची किमत ठरवते. मोठमोठे खाणमालक, मोठे उद्योगपती या संघटनेत आहेत. दुसऱ्या बाजूला भारतीय रुपया अमेरिकन डॉलरच्या तुलनेत खाली आला आहे. भारतातील सोन्याचे भाव वाढण्यामागचे हे देखील एक कारण आहे. याशिवाय आयात शुल्क, युक्रेन व हमासची युद्धजन्य परिस्थिती आदी कारणांमुळे देखील भाव वधारले आहेत. जगाच्या तुलनेत भारताकडे सोन्याचे साठे अंत्यत कमी आहे. भारत दरवर्षी सरासरी ८०० टन सोने आयात करतो. स्वित्झर्लंड, दक्षिण आफ्रिका, दुबई इत्यादी देशांतून सोन्याची आयात केली जाते. भारतात १९४४ साली एक तोळा सोन्याची किमत फक्त ४४ रुपये होती. १९९५ मध्ये ४ हजार ६८० होती. २००५ मध्ये ७ हजार, २०१० साली १८ हजार ५००, २०१५ मध्ये २६ हजार ३४३, २०१९ मध्ये ३५ हजार २२०, २०२१ मध्ये ४८ हजार ७२१ आणि २०२५ मध्ये एक तोळा सोन्याची किमत ८५ हजार ५८० आहे. गेल्या पाच वर्षात सोन्याचे भाव दुपटीने वाढले आहे. वर नोंदविलेली कारणेच त्यासाठी कारणीभूत आहेत. दरवाढ होत असली तरी क्षमतेनुसार सर्वांचीच सोने खरेदी सुरू असल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होते. यातील मोजकेच खरेदीदार हे लग्नकार्यातील आवश्यकता म्हणून तर उर्वरित गुंतवणूक म्हणूनच सोने खरेदी करतात.

जागतिकस्तरावर सोन्याच्या साठ्यावरून एखाद्या देशाच्या आर्थिक ताकदीचा अंदाज बांधला जातो. अमेरिकेकडे सर्वाधिक सुवर्णसाठा असल्याने त्याची आर्थिक ताकद सर्वाधिक मानली जाते. जगात अस्थिरता निर्माण झाल्यावर सोन्याकडे महत्त्वाचे साधन म्हणून पाहिले जाते. सोने केवळ अमूल्य धातू नसून, आंतरराष्ट्रीय व्यापार आणि आर्थिक स्थिरतेसाठी महत्त्वाचा घटक आहे. १८ व्या शतकापासून सोने हे जागतिक अर्थव्यवस्थेचा अविभाज्य भाग राहिले आहे. अनेक देशांनी त्यांचे चलन सोन्याच्या साठ्याशी निगडित ठेवले होते. २० व्या शतकामध्ये तर अनेक देशांनी त्यांचे चलन सोन्याच्या मूल्याशी निगडित ठेवले होते. या प्रकारास 'गोल्ड स्टॅण्डर्ड' म्हणतात. एखाद्या देशावर आर्थिक संकट आल्यास आंतरराष्ट्रीय व्यापारात सोन्याचा साठा उपयोगी पडतो. कर्ज मिळवण्यासाठी सोन्याचा उपयोग होतो. जगभरात २.४४ लाख मेट्रिक टन सोने उपलब्ध आहे. यापैकी १ लाख ८७ हजार मेट्रिक टन सोन्याचे उत्पादन झाले असून ५७ हजार मेट्रिक टन सोन्याचे अद्याप उत्खनन व्हायचे आहे. चीन, ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकेतील खाणींमध्ये सर्वाधिक सोने आढळून आले आहे. सोन्याचा सर्वाधिक साठा असलेले एकूण २० देश आहे. त्यात अमेरिका पहिल्या स्थानी आहे. त्या खालोखाल जर्मनी, इटली, फ्रान्स, रशिया, चीन, जपान अनुक्रमे आपल्या स्थानावर आहे. भारत ८४०.७६ टनासह आठव्या स्थानावर आहे. भविष्यात भारतासह इतर देशांच्या साठ्यातही वाढ होणारच असून प्रतिष्ठा म्हणून साठ्याची स्पर्धा होणार आहे. एका अंदाजानुसार सोने पुढच्या काळात १ लाखापर्यंत पोहोचण्याची शक्यता वर्तविली जात आहे. ही शक्यता लक्षात घेऊनच आताच्या सोने खरेदीकडे पाहिले जात आहे.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

दिलीप जोशी

# मांडूक्योपनिषद - ओंकार स्वरूपाचे दर्शन!

दशोपनिषदातील सर्वांत लहान कलेवर असलेला सर्वांत महान उपनिषद म्हणजे मांडूक्य उपनिषद आहे. हे उपनिषद अथर्ववेदांतर्गत असून या उपनिषदाचे केवळ बारा मंत्र आहेत. खरं म्हणजे ते उपनिषदात आहेत म्हणून मंत्र; प्रत्यक्षात ती बारा वाक्येच आहेत. गद्यात असलेला हा उपनिषद आहे. आद्य शंकराचार्यांचे गुरू श्रीश्री गोविंदपादाचार्य आणि त्यांचे गुरू श्रीश्री गौडपादाचार्य यांनी या बारा मंत्रांवर २१५ श्लोकांची प्रथम कारीका लिहिली. यावरून या उपनिषदाचे महत्त्व लक्षात येईल. ज्यांना मोक्ष पाहिजे त्यांनी हा उपनिषद अभ्यासावा. 'मुक्तै मांडुक्य एव अलम्' मुक्तीसाठी मांडूक्य उपनिषद एकमेव आहे, असे विद्वान म्हणतात. या उपनिषदाचे कर्ते ऋषी मांडूक्य ऋषी आहेत.

याबाबत विविध मतप्रवाह आहेत. त्यातील एका मतानुसार एकदा पृथ्वीवर प्रचंड दुष्काळ पडला तेव्हा महर्षी वशिष्ठांनी वृष्टिसूक्त लिहिले आणि त्या सूक्ताने ते ईश्वराची आराधना करू लागले. एक दिवस आराधनेनंतर त्यांना जमिनीतून आवाज येऊ लागला. त्यांच्या लक्षात आले की, हा आवाज मंडूक म्हणजे बेडकाचा आहे. बेडूक शीतकाल समाधीत म्हणजे उन्हाळ्यात स्वतःला गाडून घेतो आणि पाऊस येण्याची वेळ आली की, तो विशिष्ट आवाज करतो. महर्षी वशिष्ठांना तो शुभसंकेत आणि अनुष्ठानाला अनुमोदन वाटले. त्यांनी त्या मंडुकाला आशीर्वाद दिला कील तुझ्या कुळात किंवा तुझ्या नामाचा द्रष्टा ऋषी जन्माला येईल. त्यातून मांडूक्य ऋषींचा जन्म झाला, ज्यांनी मांडूक्य उपनिषदाचे निर्माण केले.

दुसरा प्रघात असा की, बेडूक उड्या मारत दोन-चार उड्यातच स्थान गाठतो. या उपनिषदात केवळ १२ मंत्रात विश्वाचे आर्त प्रकट केले आहे. मंडुकासम विषय प्रतिपादित केला. याला मंडूक न्याय म्हणतात. म्हणून मांडूक्य उपनिषद.

अजून एक प्रवाह असाही आहे की, बेडूक पाण्यात अंडी घालतो. त्यातून माशासारखी पिले (टॅड पोल्स) पाण्यात असतात, ज्यांना माशासारखी शेपूट आणि तुरा असतो. पुढे ते आपली शेपटी आणि डोक्यावरचा तुरा काढून टाकतात आणि मग बेडूक रूपात उभयचर बनतात. शास्त्रात संन्यास धर्म शेंडी काढून, अहंकारादी उपाध्या टाकून मंडुकासारखे स्वतःला समाधीत गाडून घेण्याची तयारी ठेवण्याची वृत्ती हा उपनिषद सांगतो म्हणूनही हा मांडूक्य उपनिषद. ऋषी मांडूक्य याचे कर्ते ऋषी हे आपण लक्षात घेऊ.

या उपनिषदात ओंकाराचे विराट स्वरूप विशद केले आहे. या उपनिषदाची सुरुवातच ओंकार या आदिबीज शब्दब्रह्माने केली आहे.

ॐ इत्येतदक्षरमिदं सर्वं तस्योपव्याख्यानं
भूतं भवद्भविष्यदिति सर्वमोङ्कार एव ।
यच्चान्यत् त्रिकालातीतं तदप्योङ्कार एव ॥

ॐ नावाचे अक्षर जगातील सर्वांत आद्य असून ते भूत-भविष्य-वर्तमानाच्या पलीकडले आहे. ते त्रिकालत्रयातीत आहे. संत ज्ञानेश्वर माउलींनी-

अकार चरण युगुल, उकार उदर विशाल ।
मकार महामंडल, मस्तकाकारे ।
हे तिन्ही एकवटले, तेथ शब्दब्रह्म कवळले ।
ते मियां गुरुकृपा नमिले, आदिबीज ।

ओंकाराला शब्दब्रह्म, आदिबीज आणि परमात्म्याची अक्षर मूर्ती म्हटले आहे.

सर्वं ह्येतद्ब्रह्मायमात्मा ब्रह्म सोऽयमात्मा चतुष्पात् ॥

हे ओंकारच ब्रह्म आहे. आत्मा आणि परमात्माही हेच ब्रह्म आहे. तो चतुष्पाद म्हणजे चार पायांचा आहे.

जाग्रतस्थानो बहिष्प्रज्ञः सप्ताङ्ग एकोनविंशतिमुखः
स्थूलभुग्वैश्वानरः प्रथमः पादः ॥

जागृती अवस्थेत त्याची चेतना बाह्य बाबींकडे झुकलेली असते. त्याला सात अंग, एकोणवीस मुखे आणि स्थूल विषय वास्तूंचा अनुभव असलेला आहे. त्याचा पहिला पाय वैश्वानर आहे. हाच वैश्वानर ओंकारातील अ कार आहे.

स्वप्नस्थानोऽन्तःप्रज्ञः सप्ताङ्ग
एकोनविंशतिमुखः प्रविविक्तभुक् तैजसों द्वितीयः पादः ॥

या आत्म्याची दुसरी अवस्था स्वप्नावस्था आहे, ज्याची चेतना अंतर्मुख आहे. विषय सूक्ष्म असून तेजस नावाचा दुसरा पाय आहे. हा तेजस म्हणजे ओंकारातील उ कार होय.

यस्मिन् सुप्तः न कञ्चन कामं कामयते
न कञ्चन स्वप्नं पश्यति तत् सुषुप्तम् ।
सुषुप्तस्थानः एकीभूतः प्रज्ञानघनः
एवाऽऽनन्दमयो ह्यानन्दभुक् चेतोमुखः प्राज्ञस्तृतीयः पादः ॥

आत्म्याची तिसरी अवस्था सुषुप्ती आहे. इथे चेतना घनिभूत, आनंदमयी आहे. प्राज्ञ हा तिसरा पाय असून प्राज्ञ हा ओंकाराचा म कार आहे.

एष सर्वेष्वरः एष सर्वज्ञः एषोऽन्तर्याम्येष
योनिः सर्वस्य प्रभवाप्ययौ हि भूतानाम् ।
नान्तः प्रज्ञं न बहिष्प्रज्ञं न उभयतः प्रज्ञं न प्रज्ञानघनं न प्रज्ञं नाप्रज्ञम् ।
अदृष्टम् अव्यवहार्यमग्राह्यमलक्षणं
अचिन्त्यमव्यपदेश्यमेकात्म प्रत्ययसारं प्रपञ्चोपशमं
शान्तं शिवमद्वैतम् चतुर्थं मन्यन्ते स आत्मा स विज्ञेयः ॥

आत्म्याची चौथी अवस्था म्हणजे तुरिया अवस्था, ज्यात चेतना ना आत आहे ना बाहेर, जी जाणता आहे ना नेणता. जिची इंद्रियाद्वारे अनुभूती नाही. प्रपंचरहित शांत, शिव, अद्वैत हाच त्याचा चौथा पाय.

सोऽयम-आत्मा अध्यक्षर-ओंकारो धीमत्रं
पद मात्रा मात्राश्च पद अकार उकारो मकर इति वे चार

हा ओंकार जागृती, स्वप्न, सुषुप्ती म्हणजे अ, उ, म असला तरी तो शुद्ध चेतन आहे. या सर्व अवस्थांच्या पलीकडली अवस्था म्हणजे चौथी तुरिया अवस्था होय. या अवस्थेची अनुभूती घेता आली पाहिजे.

खरं सांगायचं तर मांडूक्य उपनिषद हे करा! हे करू नका ! हे काहीही सांगत नाही तर हे उपनिषद फक्त परब्रह्माचे स्वरूप सांगते. दृवरूप ज्ञानावरूनच आपल्याला त्याच्यापर्यंत पोहोचण्याचा मार्ग सोपान आहे. तसे सर्वच उपनिषदात ओंकार माहात्म्य सांगितले, पण मांडूक्य उपनिषद परमेश्वराचे ओंकार स्वरूप सांगून ओंकारच परमात्म्याचे मूळ नाव आहे, ओंकारच मोक्ष मार्ग आहे, असे प्रतिपादन करतात. अ उ म या तीन अक्षरातच सर्व संसार सामावला असून ॐ म्हणजेच ब्रह्मांड आहे. ॐ चे विस्तारीकरण म्हणजेच ब्रह्मांड असल्याचे मांडूक्य उपनिषद सांगतो.

सर्व उपनिषदांपैकी हा उपनिषद असा आहे की, ज्यावर सर्वांत प्रथम मांडूक्य कारीका हे भाष्य आदिशंकराचार्यांचे प्रगुरू म्हणजे गुरूंचे गुरू गौडपादाचार्यांनी लिहिले. असा हा महत्त्वाचा उपनिषद आहे. 'अणुपासोनी ब्रह्मांडा एवढा' म्हणजे मंत्र अणूप्रमाणे केवळ १२ आहेत; पण विचार ब्रह्मांडाएवढा प्रचंड आहे .म्हणून हा उपनिषद मोक्षदायी आहे म्हणून तो अभ्यासावा.

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### कॉपी बहाद्दरांना शिक्षा हवी

सध्या दहावी-बारावीच्या परीक्षा सुरु आहेत. या परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पडाव्यात म्हणून, प्रशासन विशेष मोहीम राबवीत आहे. बैठी आणि भरारी पथके नेमली आहेत, पण ही मोहीम चक्क मोडीत काढून कॉपी बहाद्दर बिनधास्तपणे कॉफी करताना आढळून येत आहेत. २१ तारखेला दहावीच्या मराठी पेपरला मोठ्या प्रमाणात कॉपी झाल्याचे वृत्त आहे. संभाजी नगर जिल्ह्यातील फुलंब्री तालुक्यातील एका उच्च माध्यमिक विद्यालयात बारावीच्या गणित विषयाला सामूहिक कॉपीचा प्रकार उघडकीस आला आहे. जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीणा यांना हा प्रकार समजल्यावर त्यांनी कारवाईला सुरुवात केल्याचे कळते. परीक्षा केंद्रातील पथकच अशा निंद्य प्रकाराला खतपाणी घालीत असल्याचे आढळून आले आहे. असे प्रकार कमी अधिक प्रमाणात जिथे सुरू असतील त्या ठिकाणी प्रशासनाने अधिक लक्ष घालावे. अशा शाळा-महाविद्यालयांवर नुसता गुन्हा दाखल न करता कॉपी करणाऱ्यांवर व त्याला खतपाणी घालणा यांवर कडक कारवाई करावी, तरच इतरांवर जरब बसेल.

म्हातारी मेल्याचं दुःख नाही; पण काळ सोकावतो आहे, म्हणून यातून कोणाचीही सुटका होऊ नये, कारण ही शिक्षण क्षेत्राला लागलेली एक कीड आहे.

**अरुणकुमार धुमाळ/ ९८९०९०२९२३**

●● ●●

### शिवपूजेत कापूर आणि भस्माचे महत्त्व

आज महाशिवरात्र आहे. भगवान शिव रात्रीच्या एका प्रहरी विश्रांती घेतात. त्या प्रहराला, म्हणजे शंकराच्या विश्रांती घेण्याच्या काळाला 'महाशि वरात्री' असे म्हणतात. महाशिवरात्रीच्या दिवशी भगवान शिवाची पूजा विशेष विधीने केली जाते. या पूजेत भस्म आणि कापूर यांना महत्त्वाचे स्थान आहे.

भस्म आणि कापूर यामध्ये लयाशी संबंधित शक्ती अधिक प्रमाणात कार्यरत असते. भगवान शिव हे लयाचे देवता असल्यामुळे त्यांच्या उपासनेत या दोन्ही घटकांचा उपयोग केला जातो. शिवपिंडी किंवा शिवमूर्तीवर भस्माचे तीन आडवे पट्टे लावले जातात. यामुळे वायू आणि आकाश या स्तरांवरील निर्गुण शिवतत्त्व लवकर आकृष्ट होते. भस्माचे पट्टे लावल्यामुळे मूर्ती किंवा पिंडी यामध्ये जागृत झालेले शिवतत्त्व वातावरणात लवकर मिसळून सर्वत्र पसरते. शिवपिंडीला भस्म लावल्यामुळे पिंडीतील शक्तीचा लाभ भाविकांना होतो. तसेच, शिवतत्त्व वातावरणात पसरल्याने संपूर्ण परिसर सात्त्विक आणि पवित्र बनते. त्यामुळे महाशिव त्रीच्या दिवशी शिवपूजेत भस्म आणि कापूर यांचा वापर करणे अत्यंत महत्त्वाचे मानले जाते.

**वर्षा आवदे/ नागपूर**

●●●●

### पांढरपेशा दरोडेखोरांवर लगाम हवी!

विमान आस्थापनाने वाढवलेले अव्वाच्या सव्वा भाडे असे दर्शवते की, महाकुंभ आयोजित केला तो फक्त यांच्या फायद्यासाठी. महाकुंभाच्या काळात, मकर संक्रांतीच्या दिवसांमध्ये जेवढे जास्त दान करू त्याचा जास्तीत जास्त लाभ आपल्या स्वतःच्या उन्नतीसाठी होतो. हा आध्यात्मिक भाग तर दूरच परंतु या संधीचा कसा फायदा उचलून स्वतःची व्यावहारिक प्रगती करता येईल या स्वार्थी विचाराने ग्रस्त या आस्थापनांनी देशातून कुठल्याही भागातून प्रयागराजला जाणाऱ्या विमानाचे तिकीट दुप्पट, तिप्पट प्रमाणात वाढवले आहे. विदेशात जाणे कमी खर्चाचे परंतु भारतातल्या भारतात कुंभमेळ्याला जाणे मात्र खर्चीक करून ठेवलेले आहे. रेल्वेचे आरक्षण पूर्ण झाल्यामुळे भाविकांना विमानाने जावे लागत आहे. परंतु त्यांच्या या अडचणीचा गैरफायदा घेणारे, प्रेताच्या टाळूवरचे लोणी खाणारे नव्हेत का, अशी संधिसाधू वृत्ती महाकुंभासारख्या पर्वासाठी असणे चुकीचे नाही का, याचे चिंतन अशा आस्थापनाने नक्की करावे. सरकारने दखल घेतल्यानंतरसुद्धा त्यांनी प्रवासाचे भाडे कमी करणे उचित समजले नाही, अशा आस्थापनांचा देशाला काय उपयोग? त्यांच्यावर कारवाई संबंधित मंत्रालयाकडून होणे अपेक्षित आहे. हिंदूंच्या पर्वकाळात त्यांना ठगवणारी ही आस्थापने हिंदूद्रोही आहेत असे वाटले.

**डॉ. भारती अनिल हेडाऊ/ ९४२१७७३९९९**

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# काळेश्वर देवस्थान विष्णुपूरी येथे महाशिवरात्री निमित्त भाविक भक्तांची दर्शनासाठी अलोट गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. २६ फेब्रुवारी**

श्री काळेश्वर मंदिर देवस्थान विष्णुपुरी येथे महाशिवरात्री निमित्त पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी हर हर महादेव या जयघोषात दर्शनासाठी अलोट गर्दी झालेली पहावयास मिळाली. महाशिवरात्री निमित्त दि. २६ फेब्रुवारी रोजी शासकीय सुट्टी आसल्याने शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी यांनी ही दर्शनासाठी गर्दी केली होती.



श्री काळेश्वर मंदिर देवस्थान विष्णुपुरी येथे महाशिवरात्री निमित्त मध्ये रात्रीला श्री क्षेत्र काळेश्वर मंदिर देवस्थानचे अध्यक्ष माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर व ट्रस्टच्या वतीने महाभिषेक करण्यात आला.त्या नंतर सर्व भाविक भक्तांन दर्शनासाठी मंदिर खुले करण्यात आले. दि. २६ फेब्रुवारी रोजी पहाटे पासुनच काळेश्वर दर्शनासाठी मोठ्या रांगा लावून भावीकानी दर्शन घेतले तर यावेळी लवकर दर्शनासाठी मंदीर ट्रस्टीने विशेष पासची सोय करण्यात आली होती. तेव्हा पैसे भरून वृध्द व जेष्ठ नागरिक यांना या पासचा लाभ घेता आल्याने लवकर देवदर्शन झाले. विशेष पासच्या माध्यमातून देवस्थान ट्रस्टीला हजारो रूपयाचे उत्पन्न झाल्याचे दिसून येते. कोरोना काळापासुन श्री क्षेत्र काळेश्वर येथे दर्शनासाठी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. यादरम्यान काळेश्वर दर्शनासाठी नांदेड जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, माजी आ. ओमप्रकाश पोकर्णा, जिल्हा परिषदेचे राजकुमार मुक्कावार, नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्यासह राजकीय, सामाजिक नेते मंडळीनी महाशिवरात्री निमित्त दर्शन घेतले. महाशिवरात्री निमित्त धार्मिक सोळ्यात आलेल्या शाळकरी व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी अकाश पाळणे, घसरगुंडी, पाण्यात बोटीतुन फिरण्याचा आनंद घेतला. तर भाविकांनी परीसरात होत आसलेल्या भजन व किर्तनाचा बोध घेतला. यावेळी विष्णुपुरी नगरीचे सरपंच संध्याताई हंबर्डे, उपसरपंच अर्चना हंबर्डे, शहाजी हंबर्डे, नर्सिंग हंबर्डे यांची उपस्थिती होती. यादरम्यान दर्शनासाठी भावीक भक्तांची गैरसोय होऊ नये म्हणून ट्रस्टचे सचिव शंकर हंबर्डे, कोषाध्यक्ष उत्तम हंबर्डे, मोहनराव हंबर्डे, रावसाहेब हंबर्डे, धारोजी हंबर्डे, गणेश धनमणे, बालाजी हंबर्डे यासह माजी सरपंच राजु हंबर्डे यांनी परीश्रम घेतले. दि. २७ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ ते १० यावेळात शैलेश महाराज कामठेकर यांचे काल्याचे किर्तन व महाप्रसादाचे आयोजन केले आहे. यावेळी धार्मिक सोळ्यात आडीअडचण येऊ नये यासाठी ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी १५, कर्मचारी ७१ ट्राफीक शाखेचे अधिकारी ३ कर्मचारी ७ यासह एसआरपीएफचे जेवन व महीला पोलीस कर्मचारी यांचा ही चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# पोलीस व महसुलची अवैध रेती उपसा विरोधात कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २६ फेब्रुवारी**

पोलीस व महुसल यांनी संयुक्त कारवाई करत रेती उपसासाठी वापरण्यात येणारे इंजीन व अन्य साहित्य असा एकूण २४ लाखांचा मुद्देमाल जप्त केला. हि कारवाई आज दि. २६ फेब्रुवारी रोजी करण्यात आली.

जिल्हा पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांच्या फ्लश आउट ऑपरेशन अंतर्गत जिल्ह्यामध्ये वाळु माफिया विरूध्द कारवाई सुरू असून आज दि. २६ फेब्रुवारी रोजी नांदेड ग्रामीण व लिंबगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विष्णुपूरी, थुगाव, कल्लाळ या भागातील नदीपात्रातुन अवैध रेती उपसा करण्यासाठी वापरण्यात येणारे ६ इंजीन व अन्य साहित्य असा एकुण २४ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.




ही कारवाई जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, जिल्हा पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक, स.पो.नि. पंढरी बोधनकर, पो.कॉ. घुरनर, सोनकांबळे, नायब तहसिलदार स्वप्नील दिघलवाड, काशीनाथ डांगे, मंडळ निरीक्षक कुणाल जगताप, राजेंद्र शिंदे, तलाठी संजय खेडकर, विजय रणवीरकर, माधव भिसे, उमाकांत भांगे, संताजी देवापुरकर, गिरी, मनोज सप्रे, विद्राळे, मनोज जाधव यांच्या पथकाने केली.

## संक्षिप्त वृत्त

### राम तरटे यांना संविधान जागर पुरस्कार

**नांदेड-**येथील पत्रकार तथा ग्रामीण कथाकार राम तरटे यांना संविधान जागर पुरस्कार जाहिर झाला आहे. येत्या ४ मार्च रोजी मान्यवरांच्या हस्ते नांदेड येथे त्यांना सन्मानित करण्यात येणार आहे. बुद्धीस्ट रिसर्च फाऊंडेशन नांदेडच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या भारतीय संविधान अमृत महोत्सवानिमित्त नांदेड जिल्ह्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांना संविधान जागर पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. गत दिड दशकापासून वृत्तपत्र क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी केल्याबद्दल पत्रकार राम तरटे यांना संविधान जागर- २०२५ हा पुरस्कार जाहिर करण्यात आला आहे. कुसूम सभागृहात दि. ४ मार्च रोजी पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होणार असून मान्यवरांच्या हस्ते सत्कारमूर्तींना गौरविण्यात येणार आहे.



### रमेश गंगासागरे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजरत्न पूरस्कार

**भोकर-**संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांची जयंती तेलंगानातील आदिलाबाद येथे २३ फेब्रुवारी रोजी उत्साहात साजरी करण्यात आली. जयंती मंडळाच्या वतीने तेलंगणा व महाराष्ट्र राज्यात सामाजिक कार्यात योगदान देणाऱ्या तेलंगानातील मान्यवरासह नांदेड जिल्ह्यातील पत्रकारांचा तेलंगणाचे माजी मंत्री जोगू रामन्नाजी यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यात महाराष्ट्र मधून नांदेड येथील गुरु रविदास समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष चंद्रप्रकाश देगलूरकर, भोकर येथिल पत्रकार रमेश जी. गंगासागरे, सोनटक्के यांचा समावेश आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष मधु बावलकर तर प्रमुख अतिथी म्हणून तेलंगणाचे माजी मंत्री जोगू रामन्नाजी यांची उपस्थिती होती. गंगासागरे यांना पूरस्कार मिळाल्याबद्यल सर्व मित्रपरिवारांनी त्यांचे अभिनंदन केले.



### कौशल्याबाई अखबारवाले यांचे निधन

**नांदेड-**शहरातील अबचलनगर येथील ज्येष्ठ नागरिक कौशल्याबाई चरणसिंग अखबारवाले (वय ७५) यांचे ह्रदयविकारामुळे दि.२५ रोजी सायंकाळी ६ वा. निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर आज दि.२६ रोजी नगिनाघाट स्मशनभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, नातू, पणतू असा परिवार आहे. स.राजासिंग अखबारवाले यांच्या त्या वहिनी होत.



### मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे निर्देश

**नांदेड-**महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान जेष्ठ कवी वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांनी दिले आहे. मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले आहेत. आपल्या मातृभाषेचा गौरव म्हणून वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिन मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्याच्या सूचना शासनाने दिल्या आहेत. मराठी भाषेचा गौरव दिन साजरा करताना मराठी भाषेचा प्रचार, प्रसार व जतन व संवर्धन व्हावे हा उद्देश आहे. याची अंमलबजावणी संपूर्ण जिल्ह्यात विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून केली जाणार आहे. २७ फेब्रुवारी रोजी सर्व कार्यालयात मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्यात यावे. आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास व जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा, असेही निर्देश जिल्हा प्रशासनाने दिले आहेत.

# व्यापाऱ्याला लुटणाऱ्यांना अटक ; १४ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २६ फेब्रुवारी**

ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील धनेगाव वळण रस्त्यावर मुंबई येथील व्यापाऱ्याला लुटल्याची घटना घडली होती. या घटनेतील आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दि.२५ फेब्रुवारी रोजी अर्धापूर वळण रस्त्यावर पकडले. त्यांच्याकडून एक चारचाकी वाहन व अन्य साहित्य असा एकूण १४ लाख ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दि. ७ फेब्रुवारी रोजी धनेगाव वळण रस्त्यावर मुंबई येथील हार्दीककुमार मोदी यांची गाडी अडवूण गाडी व रक्कम लुटण्यात आली होती. या गुन्ह्यातील आरोपी नागपूर मार्गे नांदेडकडे रिनॉल्ट ट्रिबर कारने येत असल्याची माहिती मिळाल्यावरुन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक आनंद बिच्चेवार व पथकाने या कारला दि.२५ फेब्रुवारी रोजी दुपारी दोनच्या सुमारास अर्धापूर वळण रस्त्यावर थांबविले. यावेळी कारमध्ये असलेल्या महंमद असगर हानिफ खान रा.कुर्ला मुंबई, मुस्तफा युनूस खान रा.शिवाजीनगर मुंबई, प्रज्वल लालजी भोसले रा.लोंढे ता.चाळीसगाव यांना ताब्यात घेतले असता त्यांच्याकडे गुन्ह्यासंबंधाने विचारपूस केल्यानंतर गुन्हा केल्याची कबुली त्यांनी दिली. या कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने त्यांच्याकडून नगदी ९ लाख २० हजार रुपये व रेनॉल्ट कंपनीची पाच लाख किंमतीची कार असा एकूण १४ लाख ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या गुन्ह्याविषयी पोलिसांनी अधिक चौकशी केली असता या गुन्ह्यात राजकरण यादव उत्तरप्रदेश, बैलअण्णा रा.केरळ, प्रदीप पुरुषन इजवा रा.केरळ, फेरोजभाई रा.मुंबई, राजू उर्फ बचखंडा हे देखील सोबत असल्याचे त्यांनी सांगितले.

हि कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक आनंद बिच्चेवार, पोलीस उपनिरीक्षक साईनाथ पुयड, पोलीस हवालदार मलदौडे, जिंकलवाड, पवार, डोंगरे, बडगू, कदम, धुमाळ, कदम, सोनसळे, देवकत्ते यांच्या पथकाने केली.

# महाशिवरात्रीचे औचित्य साधून शिव महारुद्राभिषेक

**तभा वृत्तसेवा**
**बाऱ्हाळी,दि. २६ फेब्रुवारी**

येथील नगरेश्वर मंदिरात शिवजयंती निमित्त महाशिवरात्रीचे औचित्य साधून सर्वच जातीच्या शिवभक्तांच्या हस्ते ८५ जोडप्यांच्या हस्ते सामूहिक शिव महारूद्राभिषेक करण्यात आले. सामाजिक समरसतेचे यंदाचे हे १८ वे वर्षे होते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या अठरा पगड मूठभर मावळ्यांच्या साक्षीने स्वराज्य स्थापन करण्यासाठी रायरेश्वराच्या शिव पिंडीवर आपली करंगळी कापून रक्ताभिषेक केला होता. तोच आदर्श समोर ठेऊन अठरा वर्षी पूर्वी सूनिल पा.जाधव यांनी सामाजिक समरसतेचा उपक्रम सुरू केले होते. नगरेश्वर महादेव मंदिरात शिवजयंती निमित्त महाशिवरात्री चे औचित्य साधून समाजातील अठरा पगड जातिच्या शिवभक्ताच्या हस्ते लाँटरी पध्दतीने पाच जोडपी हे मुख्य शिवपिंडीचे तर बाकीचे सभामंडपात बसून घरून आनलेल्या शिव पिंडीचे सामूहिक विधिवत मंत्रोपचारात महारूद्राभिषेक करण्यात आला. ऐका भक्तांच्या हस्ते छ.शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यात सर्वच जातीचे भक्त ऐकत्र मंदिरात बसले होते .बहुधा हा राज्यातील ऐकमेव सामाजिक समरसतेचा उपक्रम असेल.

प्रसिद्ध ह.भ.प. अनिरुद्ध महाराज जोशी यांनी संपूर्ण अभिषेकाचे पौरोहित्य केले याप्रसंगी तब्बल ८५ जोडप्यांनी उपस्थिती लावली. सामाजिक समरसतेचा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शिव अमरनाथ महाभिषेक समिती व छ.शिवाजी महाराज जयंती समीतीच्या सदस्यांनी परीश्रम घेतले.

# जनसामान्यांची कामे करण्यासाठी भाजपा कटिबद्ध : भाजपा संघटनमंत्री संजय कौडगे

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २६ फेब्रुवारी**

भाजपा हा जनसामान्यांची कामे करणारा पक्ष आहे. भाजपाचा प्रत्येक कार्यकर्ता सर्वसामान्यांची कामे करत आलेला आहे व इथून पुढेही करणार, तरूणांना संधी देऊन हा देश भविष्यकाळामध्ये तरूणांच्या हाती देण्याचे भाजपाचे स्वप्न आहे, असे प्रतिपादन भाजपा संघटनमंत्री संजय कौडगे यांनी केले.

आजपर्यंत माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी नांदेड जिल्ह्याचा विकास केला आहे व इथून पुढेदेखील पालकंत्र्यांमार्फत आम्ही विकास करत राहू. पालकमंत्री अतुल सावे यांच्या वाढदिवसानिमित्त शशीकांत क्षीरसागर यांनी सामाजिक जाणिवेतून शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम भाजपा युवा मोर्चा महानगरचे शशीकांत क्षीरसागर यांनी आयोजित केला होता. त्यावेळी कौडगे व राजूरकर बोलत होते. यावेळी शिवसेनेचे डॉ. अंकुश देवसरकर, भाजपा प्रवक्ते संतोष पांडागळे, मा. नगरसेवक किशन कल्याणकर, मा. नगरसेवक दीपक पाटील, सूर्यकांत कदम, शिवाजी धर्माधिकारी, अरूण पोफळे, दिलीप सावंत, मुनवर शेख, शहाजी क्षीरसागर, शंतनु हाके, वैभव मठपती यांच्यासह जयभवानीनगर येथील नागरिक, तरूण मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



नांदेड- चोरी झालेले २४ लाख ८१ हजार ५०० रुपायांचे १५७ अॅन्ड्राईन मोबाईल पोलीसांनी हस्तगत केले असून जिल्हा पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांच्या हस्ते मुळ मालकांना वाटप करण्यात आले.

# मनुस्मृती दहनामूळे लोकशाही स्वातंत्र्य आबाधित : जगदिश ओहोळ

**तभा वृत्तसेवा**
**भोकर,दि. २६ फेब्रुवारी**

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी चातुरवर्ण व्यवस्थेवर आधारित मनुस्मृती ग्रंथाचे दहन केल्यामुळे सर्वांना लोकशाही,स्वातंत्र्य मिळाले अन्यथा येथील बहुजन,दलित पिडीत अस्पृश्य समाज गुलामीतच अडकून राहिला असता असे प्रतिपादन जग बदलणारा बाप माणूस या पुस्तकाचे लेखक प्रसिद्ध व्याख्याते जगदिश ओहोळ यांनी केले.

दि.२३ फेब्रुवारी रोजी मोजे नागापूर ता.भोकर येथे तेरावी बौद्ध धम्म परिषद संपन्न झाली. या परिषदेच्या अध्यक्षस्थानी भोकर कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती बालाजी शानमवाड हे होते. प्रथम भगवान बुद्ध, संत गाडगेबाबा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. धम्म परिषदेचे स्वागताध्यक्ष एल. ए. हिरे यांनी सर्व मान्यवरांचे पुष्पहाराने स्वागत केले.


यावेळी बोलताना जगदिश ओहोळ म्हणाले, पिढ्यान पिढ्यापासून अस्पृश्य समाजाला माणसा प्रमाणे जगता येत नव्हते मनुस्मृतीने घालून दिलेल्या व्यवस्थेमुळे नीच वागणूक मिळत असे याचे चटके जागतिक कीर्तीचे विद्वान असलेल्या डॉ. बाबासाहेबांनाही विद्यार्थी दसेपासून बसले! डॉ. आंबेडकरांनी विषमतावादी कायदा असलेली मनुसमृतीच शस्त्रबुद्धे नावाच्या ब्राह्मणाच्या हातून महाड येथे जाळली तेंव्हापासून लोकशाहीचा उदय झाला त्याकाळी कसल्याही सोयी सुविधा नसताना २२वर्षाचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर उच्च शिक्षणासाठी बाहेर देशात लंडनला जातात कोलंबिया विद्यापीठात जाऊन आठ वर्षाचा शिक्षणाचा कोर्स तीन वर्षात पूर्ण केल्यानंतर पुन्हा मायदेशी येऊन आपल्या देशातील जातीय विषमता नष्ट करण्यासाठी अनेक वर्षे संघर्ष करतात. अखेर विषमतेवर आधारलेला धर्म झुगारून मानवतेचा संदेश देणारा बौद्ध धम्म त्यांनी स्वीकारला बाबासाहेबांनी लिहिलेले भारताचे संविधान समता, स्वातंत्र्य बंधुत्व लोकशाहीवर आधारित आहे.असे सांगून ओहोळ म्हणाले छत्रपती संभाजी राजाची हत्या मनुस्मृती प्रमाणे करण्यात आली संभाजी राजे बुद्ध विचाराचे होते म्हणून त्यांनी बुद्धभूषण ग्रंथ लिहिला महाराजांच्या हत्येनंतर शिवशाही संपून पेशवाई अस्तित्वात आली समाजा समाजात वीष पेरणारे विचार तमाम ओबीसी बहुजनांसाठीच नव्हे तर सर्व लोकांसाठी घातक आहेत हे घातक विचार गाडून टाकण्याचे काम डॉ.आंबेडकरांनी केले अन्यथा तुम्हा आम्हा सर्वांना गुलामीचे जीवन जगावे लागले असते असे सांगून ओहोळ म्हणाले. गुलाम वंचित घटकांना नरकातून बाहेर काढण्यासाठी बाबासाहेबांनी बुद्ध धम्माचा स्वीकार केला बुद्ध हा कुणाचा अवतार नाही विचार आहे. संत गाडगेबाबा रूढी परंपरा, अंधश्रद्धा, विषमतावादी व्यवस्थेच्या विरोधात होते. जग बदलणाऱ्या बाप माणसाचे वर्णन अण्णाभाऊंनी आपल्या साहित्यातून केले. बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकराचे विचारच समाजाला दिशा देणारे आहेत. त्या विचाराचा जागर धम्म परिषदेतून झाला पाहिजे असेही ओहोळ म्हणाले.

आयोजक दत्ता व्यवाहरे यांनी धम्म परिषद घेण्यामागची भुमिका आपल्या प्रास्ताविकातून विषद केली. यावेळी माजी सभापती गोविंद बाबा गौड, प्रा. आम्रपाली व्यवहारे, स्वागताध्यक्ष एल.ए.हिरे यांनीही विचार मांडले अध्यक्षीय समारोप बालाजी शानमवाड यांनी केला. व्यासपीठावर मा.पो.पा.गंगाधर शानमवाड, पत्रकार बि.एस.सरोदे, बौद्ध महासभेचे अध्यक्ष सुरेश जोंधळे, सचिव उत्तम एडके, दत्ता डोंगरे, डी.जे.सोनकांबळे, शाहिर बाबुराव गाडेकर, गोविंद कसबे, संजय सोनकांबळे, सुजाता पाटील आदीसह उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ.मनोज गीमेकर यांनी केले तर आभार अविनाश कसबे यांनी मानले. सभेनंतर सुप्रसिद्ध गायिका निशा धोंगडे चंद्रपूर आणि प्रसिद्ध गायक रविराज भद्रे यांच्या बुद्ध भीम गीताचा बहारदार कार्यक्रम झाला.

# शेतकऱ्यांनी तातडीने ग्रीस्टॅक योजनेत फार्मर आयडी तयार करून घ्यावी : तहसीलदार यादव

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. २६ फेब्रुवारी**

भारतीय शेतीक्षेत्रात एक महत्त्वपूर्ण क्रांती घडत आहे. केंद्र सरकारने शेतकऱ्यांसाठी ग्रीस्टॅक योजने अंतर्गत 'फार्मर आयडी' अर्थात 'शेतकरी ओळखपत्र' या डिजिटल ओळखपत्राची योजना आणली आहे. जी आधारकार्डप्रमाणे प्रत्येक शेतकऱ्याला एक विशिष्ट ओळख देणार आहे. या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत देशभरातील शेतकऱ्यांना ३ टप्प्यांमध्ये डिजिटल ओळखपत्र वितरित करण्याचे नियोजन आहे. केंद्र व राज्याच्या कृषी योजनांचा लाभ घेण्यासाठी 'फार्मर आयडी' आता बंधनकारक करण्यात आला आहे. माहूर तालुक्यात या योजनेला चांगला प्रतिसाद मिळत असला तरी अनेक शेतकऱ्यांनी अद्यापही फार्मर आयडी काढलेला नाही. त्यामुळे स्वतः चा ओळख क्रमांक तयार होण्याकरिता नोंदणी करण्यासाठी २८ फेब्रुवारी पर्यंत सर्व शेतकऱ्यांनी आधार क्रमांकाप्रमाणेच स्वतःचा 'शेतकरी ओळख क्रमांक' काढून घ्यावा, तसेच ई-पिक पाहणी अंतर्गत प्रलंबित शेतकऱ्यांनी आपली ई-पिक पाहणी नोंदणी पूर्ण करून घ्यावी! असे आवाहन महसूल विभागाच्यावतीने तहसीलदार किशोर यादव यांनी केले आहे.



फार्मर आयडी अर्थात शेतकरी ओळखपत्र शेतकऱ्यांच्या अडचणींवर ठरणार 'रामबाण' उपाय ठरणार असून, त्यामुळे शेतकऱ्यांना हे मोठे फायदे मिळणार आहेत. फार्मर आयडी निर्माण झाल्यानंतर शेतकऱ्यांना आधुनिक कृषी क्रांतीचे शिलेदार करण्याचे शासनाचे ध्येय आहे. त्यामुळे सध्या 'ग्रीस्टॅक' संकल्पना वेगाने पुढे नेली जात आहे. या प्रकल्पात मुख्यत्वे ३ पायाभूत माहिती संच निर्माण केले जात आहेत. यात शेतकऱ्याचा माहिती संच व हंगामी पिकांचा माहिती संचाचा समावेश आहे. ऍग्रीस्टॅक योजनेसाठी दि.२८ रोजी सिंदखेड, ०३ मार्च रोजी माहूर, ०४ रोजी वाई बाजार तसेच ०५ मार्च रोजी वानोळा येथे कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रीस्टॅक योजने अंतर्गत शेतकरी ओळख क्रमांक नोंदणी, नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्र येथे सुरू आहे. प्रत्येक शेतकऱ्यास ग्रीस्टॅक फार्मर आयडी अर्थात शेतकरी ओळख क्रमांक काढणे अनिवार्य आहे. यापुढील काळात शेतकऱ्यांना पी. एम. किसान योजना, पीक विमा, नैसर्गीक आपत्ती अनुदान, पिक कर्ज व इतर शासकीय योजनाचा लाभ घेण्यासाठी ही नोंदणी आवश्यक आहे. नोंदणी न केल्यास शेतकऱ्यांना कुठल्याही शासकीस योजनांचा लाभ मिळणार नाही. शेतकरी ओळख क्रमांक काढण्यासाठी आधार कार्ड आणि मोबाईल क्रमांक तसेच शेतीचा गट क्रमांक माहीत असणे आवश्यक आहे. आपल्या नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्र, महा ई-सेवा केंद्र येथे संपर्क करून आपली नोंदणी शेतकऱ्यांना स्वतः हजर राहून करावी लागणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी सर्व कामे बाजूला ठेवून ऑनलाईन नोंदणीच्या ठिकाणी वरील कागदपत्रे घेऊन स्वतः ई-पीक पाहणी तसेच ऍग्री स्टॅक आयडी योजनेची नोंदणी करून घ्यावी! असे आवाहन माहूरचे तहसीलदार किशोर यादव यांनी केले आहे.

# राज्यस्तरीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत खेळाडूंनी घेतली प्रियंका इंगळेची भेट

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. २६ फेब्रुवारी**

नांदेड येथील राज्यस्तरीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा गुरु गोविंदसिंगजी स्टेडीयमवर स्पर्धा संपन्न झाल्या. या कालावधीमध्ये पारडी येथील चुमुकल्या खेळाडुनी खो - खो विश्व विजेता इंडिया टीमची कर्णधार प्रियंका इंगळे यांची भेट घेतली.

१४ वर्षाखालील खेळाडू खो-खो मुलींच्या संघा मार्फत भारतीय कर्णधार प्रियंका इंगळे यांचे भव्य स्वागत करण्यात आले. हि भेट घडून आणण्यासाठी नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, नायगाव तहसीलदार गायकवाडबाई, लोहा तहसीलदार विठ्ठल परळीकर यांचे सहकार्य लाभले. खो-खो मुलीच्या संघात कर्णधार आरती पवार,



शुभश्री पवार, वेदिका मोरवले, संगीता मटके, प्राची डिकळे, राधिका मोरवले, भगवती कदम, रागिणी डिकळे, अक्षरा पांचाळ, दिव्या गायकवाड, आरती पवार, तन्वी क्षीरसागर, लक्ष्मी डिकळे व क्रिडा संघाचे मार्गदर्शक मुख्याध्यापक माधव किसवे यावेळी उपस्थित होते.या खेळाडु विद्यार्थ्यांचे नांदेड जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी डॉ. सविता बिरगे बाई, गटशिक्षणाधिकारी सतिश व्यवहारे, शिक्षण विस्तार अधिकारी बी.जी.फसमले, केंद्रप्रमुख अविनाश कावलगावकर, डि.आर. शिंदे, बापूराव राठोड, जे.ए कदम, इंगोले एस .एस. मरखेलकर रमेश, देशमुख जी. एल . कदम, आर. जी .फारुख शेख, बालाघाटे डी.पी., शा. व्य. समितीचे अध्यक्ष विठ्ठल डिकळे, गोविंद डिकळे, सचिन गायकवाड, शरद पवार, व्यंकट डिकळे, बळीराम पवार, संभाजी पवार, पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष शिवराज पवार यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## प्रधानमंत्री किसान सन्मान निधी; १९ वा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यात जमा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ फेब्रुवारी -**

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम किसान) योजनेअंतर्गत जिल्ह्यातील २ लाख ३७ हजार ५२१ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ४७ कोटी ५० लक्ष रुपये जमा करण्यात आले आहे. ही योजना २०१९ पासून शेतकरी कुटुंबांना निश्चित उत्पन्न देण्यासाठी सुरू करण्यात आली असून, शेतकऱ्यांना दरवर्षी ६ हजार रुपये (दर चार महिन्यांनी २ हजार रुपये) थेट बँक खात्यात (ऊइढ) मिळतात. २४ फेब्रुवारी २०२५ रोजी बिहारमधील भागलपूर येथून पंतप्रधानांच्या हस्ते १९ व्या हप्त्याचे ऑनलाईन वितरण करण्यात आले. जिल्ह्यातील कृषि विज्ञान केंद्र, तुळजापूर येथे जिल्हास्तरीय थेट प्रक्षेपणाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास पुरस्कार प्राप्त प्रगतशील शेतकरी,जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी खंडेराव सराफ, कृषि विज्ञान केंद्राचे समन्वयक सचिन सूर्यवंशी, उपविभागीय कृषि अधिकारी महादेव आसलकर, तालुका कृषि अधिकारी एस.पी. जाधव (धाराशिव), महेश देवकते (तुळजापूर) व कृषि विभागातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. आधार लिंक,ई-केवायसी व लँड सिडिंग प्रक्रिया पूर्ण असलेल्या शेतकऱ्यांनाच हप्ता मिळाला आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### मुंबई पोलीसात निवड; शेतकरी पुत्राचा सत्कार

**परंडा, दि.२६ फेब्रुवारी -**

परंडा तालुक्यातील भोत्रा ग्रामस्थच्या वतीने मुंबई पोलीसपदी निवड झालेले शेतकरी पुत्र प्रविण बाबुराव पवार भोत्रा व अभिषेक जाधव, विनायक नेटके, आब्बास अलजुफ्री, प्रज्ञा ढेरे व वडील बाबुराव पवार व आई शालन पवार व राहुल पवार यांचा भव्य सत्कार करण्यात आला. कार्यक्रम प्रमुख पाहुणे परंडा नायब तहसिलदार माढेकर व महसूल मंडळ अधिकारी पवार, सागर कचे, प्रा. विकास काळे, प्रा. धनंजय आडगळे, मुख्याध्यापक प्रा. कालीदास चव्हाण, सुनिल पवार, राजकुमार देशमुख, अमोल गोडगे, अजिनाथ शेळके, अतुल गोफणे, अरुण गोफणे, शंकर पवार, यल्लाप्पा काळे, नेर्लेकर, मोहन डिकुळे, शामराव काळे, सुभाष जाधव, शिवदास काळे, सुनिल सल्ले, राहुल कोकाटे, कृष्णा घुले, विजयराज घुले, अरविंद गोडगे, आबासाहेब शेलार यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

### शेतकऱ्यांसाठी अर्थसहाय्य योजना; २८ पर्यंत मुदत

**धाराशिव, दि.२६ फेब्रुवारी -**

खरीप २०२३ हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना ५ हजार रुपयांची प्रति हेक्टर (कमाल २ हेक्टरपर्यंत) अर्थसहाय्य देण्यात येणार आहे.या योजनेसाठी पात्रतेसाठी निकष पुढीलप्रमाणे आहे.ज्यांनी ई-पिक पाहणी केलेली नाही, पण ७/१२ उताऱ्यावर पिकाची नोंद आहे. वनपट्टेधारक, वैयक्तिक व सामाईक खातेदार शेतकरी यांनी आपले नाव www.scagridbt.mahait.org पोर्टलवर किंवा संबंधित कृषि सहाय्यकांकडून तपासून घ्यावे. अधिक माहितीसाठी तालुका कृषि अधिकारी, मंडळ कृषि अधिकारी किंवा कृषि सहाय्यकांशी संपर्क साधावा, असे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, धाराशिव यांनी कळविले आहे.



### महाशिवरात्रीनिमित्त भाविकांना फराळाचे वाटप

**तुळजापूर, दि.२६ फेब्रुवारी -**

येथील रयत सेवाभावी संस्थेच्या वतीने महाशिवरात्रीचे औचित्य साधून तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविक भक्तांना उपवासा निमित्त फराळीचे वाटप करण्यात आले. यावेळी भाविक भक्तांसोबत शहरातील नागरिकांनी याचा लाभ घेतला. शिवसेना (शिंदे गट) ओबीसी विभागाचे तालुकाध्यक्ष देविदास राठोड, पत्रकार संघाचे अध्यक्ष सचिन ताकमोघे, रयत सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष उमेश जाधव, उपाध्यक्षा भाग्यश्री जाधव, सचिव सचिन गायकवाड, रंजना मनोज जगताप, अंजू अमोल जगताप, रमेश जाधव, शंकर जाधव आदींची उपस्थिती होती.

### शिव-बसव-राणा जन्मोत्सव समिती अध्यक्षपदी पुदाले

**नळदुर्ग, दि.२६ फेब्रुवारी -**



नळदुर्ग येथे सालाबादाप्रमाणे याहीवर्षी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा बसवेश्वर महाराज व वीर महाराणा प्रतापसिंह महाराज यांची एकत्रित जयंती साजरी करण्यात आहे. यासाठी जन्मोत्सव समितीची नवीन कार्यकारीणीची निवड करण्यात आली आहे. ती पुढीलप्रमाणे आहे. समितीच्या अध्यक्षपदी संतोष पुदाले तर उपाध्यक्ष म्हणुन प्रमोद कुलकर्णी, वैभव पाटील तसेच कोषाध्यक्ष शिवय्या स्वामी, नवल जाधव, सचिव शिवाजी गायकवाड, सहसचिव राहुल जाधव, सांस्कृतिक प्रमुख नेताजी महाबोले, अमित शेंडगे, प्रविण चव्हाण यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

### मातंग समाजासाठी थेट कर्ज योजना

**धाराशिव, दि.२६ फेब्रुवारी -**



मातंग समाज व त्याच्या १२ पोटजातींकरिता साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास म हामंडळामार्फत थेट कर्ज योजना राबविण्यात येत आहे.मागील शासन निर्णयानुसार योजनेअंतर्गत २५ हजार रुपयेपर्यंत कर्ज मर्यादा होती,मात्र नवीन शासन निर्णयानुसार ती १ लक्ष रुपयांपर्यंत वाढविण्यात आली आहे. लाभार्थी हा मांग, मातंग, मादीग, मिनी मादीग, दानखणी मांग, मांग महाशी, मदारी, राधेमांग, मांग गारुडी, मांग गारोडो तसेच शासन निर्णय (दि.२२ मे २०१२) अंतर्गत मादगी व मादिगा या जातीच्या व्यक्तीला या योजनेचा लाभ घेता येईल. ही योजना ग्रामीण भागातील गरजू लाभार्थ्यांसाठी मोठी संधी असून, इच्छुकांनी अर्ज निश्चित मुदतीत दाखल करावेत, असे आवाहन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापकांनी केले आहे.

# तुळजाभवानीच्या शिखराला मिळणार सोन्याची झळाळी

**सिमेंटचे नवे आवरण हटणार, शिखराचे प्राचीन रूप सहा महिन्यात पुन्हा साकारणार...मंदिर समितीचे विश्वस्त तथा आ.राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ फेब्रुवारी -**

पुरातत्व खात्याने केलेल्या तुळजाभवानी मंदिराच्या स्ट्रक्चरल ऑडिटचा अहवाल प्राप्त झाला आहे. कुलस्वामिनी तुळजाभवानी देवी मंदिराचे प्राचीन शिखर चुना आणि जुन्या विटांपासून तयार करण्यात आलेले आहे. त्यावर नंतरच्या काळात अडीच फूट जाडीचे नवे सिमेंट काँक्रीटचे व दगडांचे आवरण दिल्यामुळे वजन वाढले आहे. परिणामी मंदिराचे शिखर ज्या तुळईवर उभे आहे त्याच्या चार पैकी दोन दगडी शिळांना तडे गेले असल्याचा निष्कर्ष पुरातत्व विभागाने नमूद केला आहे. त्यामुळे संपूर्ण शिखर उकलून पुन्हा उभारले जाणार आहे. प्राचीन काळी ज्या प्रकारचे शिखर होते तसे मूळ शिखर साकारून त्याला सोन्याने मढविण्यात येणार असल्याची माहिती तुळजाभवानी मंदिर समितीचे विश्वस्त तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

पुरातत्व खात्याने सादर केलेल्या स्ट्रक्चरल ऑडिटच्या अहवालानुसार तुळजाभवानी देवी मंदिराच्या मूळ इमारतीवर सिमेंट काँक्रीट आणि दगडांचा अतिरिक्त बोजा पडला आहे. चुना आणि विटांपासून साकारण्यात आलेल्या प्राचीन शिखरावर अडीच फूट जाडीचे नवे सिमेंट काँक्रीटचे आवरण आहे. त्यामुळे जगदंबेच्या गाभाऱ्यातील तुळईच्या चार पैकी २ दगडी शिळांना तडे गेले आहेत असे स्पष्ट निरीक्षण नोंदवण्यात आले असल्याने मंदिराच्या सुरक्षेच्या दृष्टीने हे सर्व काढून पुरातन पद्धतीने परंतु पुन्हा नव्याने करणे आवश्यक आहे हे पुरातत्व विभागाचेच मत असल्यामुळे याबाबत कोणीही गैरसमज निर्माण करू नयेत असे आवाहन आ.पाटील यांनी केले आहे.

पुरातत्व खात्याने संरचनात्मक लेखापरिक्षण अहवालच्या (स्ट्रक्चरल ऑडिट) आधारे जे निष्कर्ष काढले आहेत ते खालीलप्रमाणे आहेत. यामध्ये त्यांनी मंदिर बांधकाम हे दगडामध्ये असले तरी मुळ मंदिराच्या बांधकामध्ये वारंवार बदल करण्यात आल्याचे दिसून येत असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे मंदिरामध्ये मोठ्या प्रमाणात संरचनात्मक बदल झालेला आहे. सध्या मंदिरामध्ये शिखराचा अतिरिक्त भार।झाला।असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे शिखराची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तसेच तुळजाभवानी मातेचे मंदिर हे भूकंप क्षेत्र ४ च्या आणि किल्लारीच्या भूकंप प्लांट झोनच्या ८० कि.मी.च्या आत असल्याने मंदिराच्या गर्भगृहाचे व शिखराचे काम करणे आवश्यक असल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे. एकंदरीत संरचनात्मक लेखापरिक्षण अहवाल बघता मुख्य मंदिराच्या गर्भगृहाचे व शिखराचे काम करणे आवश्यक असून पुढील योग्य कार्यवाहीस्तव हा अहवाल सविनय सादर करीत असल्याचा सुस्पष्ट निष्कर्षही पुरातत्व खात्याने काढला असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

मंदिर समितीच्या स्वउत्पन्नातुन मंदिर जीर्णोद्धाराचे काम हाती घेण्यात आले आहे. गाभाऱ्यातील टाईल्स हटवून मूळ रूपातील दगडी गाभारा भविकांसमोर मांडण्यात येणार आहे. टाईल्स हटवण्याचे काम सुरू असताना गाभाऱ्यातील दगडी शिळांना तडे गेल्याचे निदर्शनास आले. या कामाच्या निमित्ताने ही बाब लक्षात आल्यामुळे भविष्यातील दुर्घटना टाळता आली आहे. त्यावर शास्त्रीय आणि अचूक पद्धतीने काम करण्यासाठी पुरातत्त्व खात्याच्या माध्यमातून स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची शिफारस केली होती. राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनीही आपण केलेल्या शिफारशीनुसार तात्काळ कारवाईचे निर्देश पुरातत्व विभागाला दिले होते. तोच अहवाल आता प्राप्त झाला असून मंदिराच्या शिखरावर सिमेंट काँक्रीटच्या अतिरिक्त वजनामुळे गाभाऱ्यातील शिळांना तडे गेल्याचा निष्कर्ष अहवालामुळे स्पष्ट झाले असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

श्री तुळजाभवानी मंदिर शेकडो वर्ष जुने आहे. मंदिरामध्ये असलेले दगडी खांब, भिंती, मंदिराचे छत तसेच मंदिराचे शिखर आणि कळस या सर्व भागांची तपासणी शास्त्रोक्त पद्धतीने भारतीय पुरातत्व विभागाच्या अधिकाऱ्यांकडून करण्यात आली. पुढील अनेक पिढ्यांना या मंदिरामधील प्राचीनता, मूळ कलाकुसर पाहता यावी आणि मूळ रूपातील कुलस्वामिनी तुळजाभवानी देवी आणि मंदिराचे समाधानकारक दर्शन मिळावे यासाठीच पुरातत्त्व विभागाच्या माध्यमातून श्री तुळजाभवानी मंदिराचे प्राचीन रूप जतन करण्याचा प्रयत्न आहे. मंदिराची मूळ रचना कशा पद्धतीची आहे ? याची वस्तुनिष्ठ माहिती पुरातत्व खात्याने सादर केलेल्या अहवालाच्या निमित्ताने समोर आली आहे. आता त्याचा आधार घेऊन श्री तुळजाभवानी मंदिराचे प्राचीन स्वरूप जपण्यासाठी सर्वसमावेशक काम सुरू करणे गरजेचे आहे. भविष्यकाळातही तुळजाभवानी देवीचे मंदिर चिरंतन राहावे यासाठी पुरातत्त्व विभागाच्या माध्यमातून श्री तुळजाभवानी मंदिराचे मूळ रूप जतन करण्याचा आपला प्रयत्न आहे. मंदिराच्या पावित्र्याला आणि मूळ पुरातन स्वरूपाला कोणताही धक्का न लावता हे काम केले जाणार असल्याचेही आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

तुळजाभवानी मातेचे शिखर सोन्याने मढविण्यात येणार आहे. सुवर्ण मंदिर, अक्षरधाम मंदिर, तिरुपती मंदिर, शिर्डीचे साई मंदिर आदी मंदिरांची शिखरे सोन्याने मढलेली आहेत. त्याच धरतीवर हा निर्णय घेण्यात येणार आहे. त्यासाठी भाविक, स्थानिक व्यापारी आणि पुजारी बांधव आशा सर्वांचे सहकार्य महत्त्वाचे असणार आहे. याबाबत कोणाला काही सुचवावे वाटत असेल अथवा काही शंका असतील तर त्यांनी मंदिर समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी यांच्याकडे लिखित स्वरूपात आपले म्हणणे सादर करावे असे आवाहनही आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे.

### सहा महिन्यांच्या आत शिखर पूर्ण होणार

साडेतीन शक्तिपीठांपैकी एक पूर्ण पीठ असलेल्या कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेच्या मंदिराचे शिखर सहा महिन्यांच्या आत पूर्ण होईल असा विश्वास पुरातत्व विभागाने व्यक्त केला आहे. सध्याच्या अहवालावरून मंदिराच्या भिंती काढण्याची आवश्यकता भासत नाही. मात्र काम करताना त्याकडे बारकाईने लक्ष ठेवले जाईल आणि आवश्यकता भासल्यासच भिंती काढल्या जातील असेही पुरातत्व विभागाने म्हटले असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

## मोबाईलच्या अतिवापराने तरुण वाचनापासून कोसो दूर : डॉ.दबडे

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२६ फेब्रुवारी -**



कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे व काळाच्या ओघात दिवसेंदिवस साहित्य नष्ट होत आहे त्यामुळे तरुण पिढी वाचनापासुन दुर गेली असुन मोबाईलच्या आहारी गेली आहे, असे मत डॉ. तुळशिराम दबडे यांनी व्यक्त केले.

नळदुर्ग येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय येथे आयोजित इंग्रजी विषयाच्या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद चे दि. २४ व २५ फेब्रुवारी रोजी आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन अणदुर महाविद्यालयाच्या माजी प्राचार्या डॉ.अनिता मुदकन्ना यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. विजय सावंत हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून कार्यालयीन अधिक्षक धनंजय पाटील हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उपस्थित पाहुण्यांचा परिचय राष्ट्रीय परिषदेचे समन्वयक डॉ.टी.एल.दबडे यांनी करून दिला. या इंग्रजी विषयाच्या राष्ट्रीय परिषदेमध्ये इंग्रजी विषयाच्या ९१ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. सहभागी विद्यार्थ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.



या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राचार्य डॉ.सुभाष राठोड कार्यालयीन अधिक्षक धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील इंग्रजी विभागातील प्रा.आशिष हंगरगेकर, प्रा.दादासाहेब जाधव, प्रा.बाबा सूर्यवंशी, प्रा.गजानन चिंचडवड, प्रा.झरीना पठाण यांनी परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. आशिष हंगरगेकर यांनी केले तर आभार प्रा दादासाहेब जाधव यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## हरभऱ्याची गंज अज्ञाताने पेटवली: शेतकऱ्याचे नुकसान



**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.२६ फेब्रुवारी -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील शेतकऱ्याच्या शेतातील सहा एकर वरील हरभऱ्याची गंज अज्ञात इसमाने पेटवून दिल्याने शेतकऱ्याचे ३ लाखाचे नुकसान झाल्याने अज्ञात इसमाविरूध्द ढोकी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तेर येथील शेतकरी चरणसिंग विजयसिंग राजपूत यांच्या गट नंबर ४१० मध्ये सहा एकर वरील हरभऱ्याची गंज लावली होती. ही गंज मंगळवारी (दि.२४) रात्री पावणे नऊ वाजण्याच्या सुमारास अज्ञात इसमाने पेटवून दिली. त्यामुळे शेतकऱ्याचे तीन लाख रूपयांचे नुकसान झाले. शेतकरी चरणसिंग राजपूत यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ढोकी पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास स.पो.नि.विलास हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली बीट अंमलदार प्रदीप मुरळीकर करीत आहेत

## आर.पी.औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ फेब्रुवारी -**



डॉ.वेदप्रकाश पाटील शैक्षणिक संकुल, गडपाटी धाराशिव येथील आर. पी. औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय आणि धाराशिव जिल्हा आपत्ती व्यवस्थापन केंद्र तसेच राष्ट्रीय आपत्ती प्रतिक्रिया दल यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत नैसर्गिक, रासायनिक, जैविक, किरणोत्सारी तसेच मानवनिर्मित आपत्तींसंदर्भात सखोल मार्गदर्शन आणि प्रत्यक्ष प्रात्यक्षिके घेण्यात आली.

कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शेख गाझी यांनी औद्योगिकीकरणामुळे निर्माण होणाऱ्या विविध आपत्ती आणि त्यावरील उपाययोजनांबाबत विद्यार्थ्यांना संक्षिप्त माहिती दिली.

राष्ट्रीय आपत्ती प्रतिक्रिया दलाचे प्रमुख अधिकारी पंकज चौधरी यांनी विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाच्या महत्त्वपूर्ण तत्त्वांची सविस्तर माहिती दिली.

त्यांनी भोपाळ गॅस दुर्घटना आणि वैझाग येथे घडलेल्या वायू दुर्घटनेचे उदाहरण देत अशा आपत्ती कशा टाळता येऊ शकतात, यावर प्रकाश टाकला. तसेच, आपत्तीजनक परिस्थितीत वेळेप्रसंगी घेतली जाणारी त्वरित कृती, मनुष्यहानी टाळण्यासाठीच्या उपाययोजना आणि प्रत्यक्ष बचाव कार्याची प्रात्यक्षिके करून दाखवली.

विद्यार्थ्यांनी कार्यशाळेस उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा.राम लोमटे, प्रा.मुजकिर पठाण आणि महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विशेष सहकार्य लाभले.

## महाशिवरात्री : फळे आणि फराळाचे वाटप



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२६ फेब्रुवारी -**

महाशिवरात्री निमित्त जिजामाता नगर परिसरातील नागरिकांना विनोद गंगणे यांच्या वतीने फळे आणि फराळ साहित्याचे वाटप करण्यात आले. महाशिवरात्रीच्या उपवासनिमित्त नागरिकांना साबुदाणा, भगर, खरबूज, कलिंगड व रताळे असे फराळचे साहित्य वाटप केले.

यावेळी माजी नगरध्यक्ष सचिन रोचकरी, रुग्ण कल्याण समितीचे सदस्य आनंद कंदले, विशाल छत्रे, लखन पेंदे, शांताराम पेंदे, संतोष इंगळे व सहकारी उपस्थित होते.

## स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२६ फेब्रुवारी -**

स्वातंत्र्यवीर सावरकर विचार मंच यांच्यावतीने सावरकर चौकामध्ये पुण्यतिथी साजरी करण्यात आली. जेष्ठ पत्रकार अंबादास पोपळे यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्प हार अर्पण करण्यात आला. त्यानंतर सावरकर विचारमंचचे सर्व पदाधिकारी आणि सदस्यांनी सावरकरांच्या प्रतिमेस अभिवादन केले. यावेळी महेश कुलकर्णी, उमेश गवते, महेश गरड, सुहास साळुंके, बाळासाहेब शामराज, सचिन अमृतराव, शिवाजी डावकरे उपस्थित होते.

## राष्ट्रीय महामार्ग क्र.६५ च्या कामांना गती : खा.ओमप्रकाश राजेनिंबाळकर

**महामार्गाच्या अपूर्ण कामांची आमदार प्रवीण स्वामी यांच्या नेतृत्वाखाली पाहणी...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ फेब्रुवारी -**



सोलापूर-उमरगा राष्ट्रीय महामार्ग क्र. ६५ च्या कामाला वारंवार सूचना देऊनही विलंब होत असल्याने गतवर्षी शिवसेना स्टाईल आंदोलन करत टोल बंद आंदोलन करण्यात आले होते. त्यानंतर काही प्रमाणात कामाला गती मिळाली, मात्र अद्याप काही भागांतील काम अपूर्ण असल्याने आमदार प्रवीण स्वामी यांच्या नेतृत्वाखाली महामार्गाची पाहणी करण्यात आली. या दौऱ्यात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक श्री.जवादे, उपविभागीय अधिकारी गणेश पवार, उपविभागीय पोलीस अधिकारी आणि संबंधित प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

अणदूर ते उमरगा दरम्यानच्या अपूर्ण कामांची पाहणीसह तपासणी करण्यात आली. अणदूर गावात नैसर्गिक पाण्याच्या प्रवाहाला अडथळा निर्माण झाल्याने काही घरांमध्ये पाणी शिरत असल्याचे निदर्शनास आले. त्यावर तत्काळ उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले. महामार्गावरील महत्त्वाच्या कामांच्या मुदती निश्चित करत पुढील कार्यवाहीबाबत निर्णय घेण्यात आला.

अणदूर उड्डाणपूल व नळदुर्ग बायपास -५ मार्चपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश, येणेगूर व मुरूम मोड उड्डाणपूल -३१ मार्चपर्यंत वाहतुकीसाठी खुला करण्याचे निर्देश, आष्टा मोड उड्डाणपूल -३१ डिसेंबरपूर्वी पूर्ण करण्याच्या सूचना, भोसगा व जकेकुर येथे पादचारी पूल-उभारणीसाठी सुचना करण्यात आल्या आहेत.

डाळिंब, उमरगा चौरस्ता आणि तुरोरी येथे उड्डाणपूल पूर्ण झाल्याने वाहतूक सुरळीत झाली असून अपघातांचे प्रमाण कमी झाले आहे. आलियाबाद शिवारातील शेतकऱ्यांचा शेतरस्ता पूर्णतः बंद झाल्याने त्यासाठी पर्यायी मार्ग देण्याची मागणी करण्यात आली. तसेच, भू-संपादन व मावेजा प्रकरणे निकाली काढण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीचे आदेश देण्यात आले. हा पाहणी दौरा आणि सातत्याने करण्यात येणारा पाठपुरावा यामुळे महामार्गाच्या कामांना गती मिळाली असून, ठरवलेल्या मुदतीत कामे पूर्ण न झाल्यास अधिक तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## लहुजी शक्ती सेना कार्यकारणी जाहीर

**उमरगा, दि.२६ फेब्रुवारी -**

मातंग समाज महाअधिवेशनासंदर्भात व लहुजी शक्ती सेना कार्यकारणी जाहीर करण्यात आले. यावेळी महिला आघाडी प्रदेशाध्यक्षा मायाताई लोंढे, मराठवाडा उपाध्यक्ष राजाभाऊ शिंदे, महिला आघाडी जिल्हाध्यक्षा सारिका कांबळे, जिल्हा संघटक भाग्यश्री सूर्यवंशी, उमरगा तालुका अध्यक्ष विजय तोरडकर, महिला तालुकाध्यक्षा अलकाताई कांबळे, तालुका कार्याध्यक्षा गिण्यानबाई कांबळे यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले. युवक तालुका अध्यक्षपदी विशाल गायकवाड, उपाध्यक्षपदी गजानन एडके, लोहारा तालुका संपर्कप्रमुख पदी अर्जुन थोरात, उमरगा शहराध्यक्षपदी विआदींचीके, सचिवपदी मंगेश सुरवसे, विद्यार्थी महिला आघाडी तालुका अध्यक्षपदी सुप्रिया शिंदे,उपाध्यक्ष निकिता चिमुकले, सचिव जोगेश्वरी शिंदे आदींची नियुक्ती करण्यात आली. कार्यक्रमाचे संयोजक लहुजी शक्ती सेना उमरगा तालुका अध्यक्ष विजय तोरडकर होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केशव सरवदे यांनी केले.



# निम्न तेरणा प्रकल्पाची उंची वाढवण्यासाठी करण्यात येणारे भूसंपादन होवू देणार नाही

**शेतकऱ्यांसोबत तीव्र विरोध करणार... सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांचा प्रसिद्धी पत्रकाद्वारे इशारा**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ फेब्रुवारी -**

माकणी ता. लोहारा येथील निम्न तेरणा प्रकल्पाची उंची वाढविण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत या संदर्भात मंत्रालय मुंबई येथे १२ फेब्रुवारी रोजी जलसंपदा मंत्री विखे पाटील यांच्या दालनात बैठक झाली. या बैठकीदरम्यान अतिरिक्त भूसंपादन न करता सुरुवातीला उंची वाढवण्या संदर्भात चाचपणी करण्यात आली आहे. निम्न तेरणा प्रकल्पात पाणी साठवण क्षमते पैकी जवळपास ३० टक्के गाळ साचला असल्याने प्रकल्पाची पाणी क्षमता कमी झाली आहे.

सदरील प्रकल्पाची पाणी क्षमता १३० दशलक्ष घनमीटर इतकी आहे. नाशिकच्या मेरी या संस्थेने केलेल्या गाळ सर्वेक्षणातून प्रकल्पात जवळपास ३० टक्के गाळ साठला असल्याचा अहवाल यापूर्वी दिला आहे.

निम्न तेरणा प्रकल्पाची निर्मिती सन १९८९ रोजी करण्यात आली. प्रकल्पाची निर्मिती करताना देखील धरणासाठी भूसंपादित करण्यात आलेली जमीन ही काळी असल्याने गाळ साठण्याची भीती व्यक्त करण्यात आली होती.

मात्र तत्कालीन पाटबंधारे मंत्र्यांनी त्याला जुमानता धरणाची निर्मिती केली. काळी जमीन असल्यामुळे अल्पावधीतच धरणात ३० टक्के गाळसाठा झाला आहे त्याचा परिणाम पाणी क्षमतेवर झाला आहे.

धरणाची उंची वाढवायची म्हटलं तर जमीन संपादित करावी लागणार आहे कारण आत्ता धरण १००% पूर्ण भरले तरी संपादित न केलेल्या काही शेतकऱ्यांच्या जमिनीत पाणी येत असल्याच्या अनेक तक्रारी शेतकरी करत आहेत. जमीन संपादित न करता उंची वाढवली तर स्वाभाविकपणानं शेतकऱ्याच्या शेतात पाणी साठणार आहे. यापूर्वीच या धरणासाठी भातागळी, माकणी,कानेगाव, मसलगा, नागूर , कमालपूर, उजनी, मातोळा, वांगजी, लोहटा या परिसरातील शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी दिल्या आहेत.

या भागातील शेतकऱ्याकडे आता अतिशय अल्प अशा जमिनी शिल्लक राहिलेल्या आहेत उंची वाढवायची ठरली तर त्याही जमिनी जातील अनेक शेतकऱ्यांना भूमिहीन व्हावे लागेल त्यामुळे उंची वाढविण्याला विरोध करणार असल्याचे सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांनी प्रसिद्धी पत्रकार द्वारे जाहीर केली आहे.

या धरणातूनच औसा, निलंगा उमरगा या शहराला पाणीपुरवठा होतो तर लवकरच लोहारा शहराला पाणीपुरवठा केला जाणार आहे.

> लवकरच धरण उंची विरोधी कृती समितीची स्थापना करण्यात येणार असून. पुढील आठवड्यात शेतकऱ्यांना सोबत घेऊन एक शिष्टमंडळ नेऊन जलसंपदा मंत्र्यांची मंत्रालयामध्ये भेट घेऊन सर्व वस्तुस्थिती त्यांना अवगत करणार आहोत प्रक्रिया नाही थांबल्यास खूप मोठे आंदोलन उभे केले जाईल.
> **-अनिल जगताप, सामाजिक कार्यकर्ते**



तसेच या परिसरातील जवळपास ६८ खेड्यांना विविध पाणीपुरवठा योजनेच्या माध्यमातून पाणीपुरवठा केला जातो मात्र एका सत्ताधारी आमदाराने बेलकुंड येथून उपसा सिंचन योजना राबवून धरणातील पाणी नेण्याचे नियोजन केले आहे. त्यासाठी उंची वाढवण्याचा घाट घातला जात आहे.उंची वाढवण्यासाठी जर भूसंपादन करण्यात येणार असेल तर त्याला या भागातील शेतकऱ्यांचा कडकडीत विरोध राहणार आहे. यापूर्वीही सन २०११ मध्ये निम्न तेरणा प्रकल्प माकणी धरणातून पाणी आरक्षण करून शिंदाळा टेंभी तालुका औसा येथील नियोजित भेल महाजनको या प्रकल्पासाठी पाणी आरक्षित करून वीस दशलक्ष घनमीटर पाणी नेण्याचा प्रयत्न केला होता मात्र सर्व पक्षांना सोबत घेऊन आंदोलन करून तो प्रयत्नही आपण हाणून पाडला आहे.

## तेरणा पब्लिक स्कूलमध्ये महाशिवरात्रीनिमित्त कार्यक्रम



**तेरणा पब्लिक स्कूलमध्ये (सीबीएसई) वर्षभर राबविले जातात विविध उपक्रम**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ फेब्रुवारी -**

शहरातील तेरणा पब्लिक स्कूलमध्ये (सीबीएसई) महाशिवरात्रीनिमित्त बुधवारी दि. २६ फेब्रुवारी रोजी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी संस्थेचे सचिव रत्नदीप वाकुरे व सुनिता वाकुरे या दांपत्याच्या हस्ते महादेवाच्या पिंडीचे पूजन करण्यात आले. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी शंकर-पार्वतीची वेशभूषा करून पालखीची मिरवणूक काढली.

धाराशिव शहरातील तेरणा पब्लिक स्कूलमध्ये (सीबीएसई) वर्षभर विविध उपक्रम राबविले जातात. बुधवारी दि. २६ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रीनिमित्त शाळेत मातीपासून महादेवाची पिंड बणविण्यात आली होती. या महादेवाच्या पिंडीचे विधीवत पूजन संस्थेचे सचिव रत्नदीप वाकुरे व सुनिता वाकुरे या दांपत्याच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्राचार्य विलास मोरे, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. प्रारंभी शाळेतील विद्यार्थ्यांनी पालखी मिरवणूक काढली. पालखीमध्ये शंकर-पार्वती यांची वेशभूषा केलेल्या विद्यार्थ्यांनी सर्वांचे लक्ष वेधले. यावेळी विद्यार्थ्यांची भाषणे झाली. विद्यार्थ्यांनी नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली.



तेरणा पब्लिक स्कूलच्या कॅम्पसमध्ये महादेवाचे भव्य मंदिर असून महाशिवरात्रीनिमित्त मंदिरात भजनाचा कार्यक्रम झाला. महादेवाच्या दर्शनासाठी दिवसभर शाळेतील शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थ्यांनी गर्दी केली होती.

## वागदरी शिवारात शॉर्टसर्किटमुळे आग; ६ शेतकऱ्यांचे शेतीचे मोठे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२६ फेब्रुवारी -**

तुळजापूर तालुक्यातील मौजे वागदरी शिवारात एका शेतकऱ्याच्या शेतातील विद्यूत वाहक तारेवर झालेल्या शॉर्टसर्कीटमुळे ठिणगी पडून लाग लागली . या आगीचे रुपांतर वनव्यात झाले आणि बघता बघता आगीचा वनवा भडकून शेजारील सहा शेतकऱ्यांच्या शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने कसलीही जिवीतहानी झाली नाही. पण मोठया प्रमाणात वित्तहानी झाली आहे.

याबाबत वृत्त असे की दि.२४ फेब्रुवारी २२५ रोजी दुपारी १.३ वा. सुमारास वागदरी शिवारातील गट नंबर ६४ व ६५ मधील शेतकरी नागनाथ चव्हाण यांच्या शेतात विद्यूत वाहक तारेवर झालेल्या शॉटसर्किट होऊन ठिणगी पडली. शेतातील गवताला आग लागली. उन्हाच्या तीव्रतेमुळे व अधुन मधून येणाऱ्या वाऱ्याच्या झुळकेमुळे त्या आगीचे वनव्यात रूपांतर झाले .आगीचा भडका उडाला व आग सर्वत्र पसरून जवळपास दहा एकर शेत जमिनीवरील जनावराचा चारा (गवत)जळून गेले तर गट नंबर ७५ मधिल गुरूनाथ सोमा वाघमारे यांच्या शेतात जनावरासाठी चारा म्हणून बनीम रचून ठेवलेला २५०० पेंढ्या ज्वारीचा कडबा, गोटयावरील ३० पत्रे, शेती उपयोगी अवजारे, ताडपत्री, वगेरे जळुन अंदाजे एक लाख पन्नास हजार रुपयाचे नुकसान झाले. याच गटातील राजकुमार सोमनाथ वाघमारे यांचा सोयाबीनचा दोन ट्रॉली चारा व एक सायकल असे अदाजे पंधरा हजार रुपये च नुकसान झाले. गट नंबर ७४ मधील कुंडलिक जगन्नाथ वाघमारे यांच्या शेतातील सोयाबीनचा चारा व शेती उपयोगी साहित्य तर याच गटातील बाबासाहेब कुंडलिक वाघमारे यांचे दहा पत्रे,१५०० ज्यारीच्या कडब्याच्या पेंढया, सोयाबिनचा दोन ट्रॉली चारा, शेती उपयोगी अवजारे जळून मोठे नुकसान झाले . गट नंबर ६७ मधील श्रीधर भाऊराव बिराजदार यांच्या शेतातील काढणीस आलेले तुरीचे पिक व शेती अवजारे जळून अंदाजे १५ रुपयाचे नुकसान झाले. गट नंबर ७३ मधील मोहन सोमवंशी, प्रमोद सामवंशी व नितीन सोमवंशी यांचा सोयाबिनचा चारा व शेती उपयोगी अवजारे जळून मोठे नुकसान झाले आहे. या घटनेचा ग्राम महसुल अधिकारी धनंजय मैंदर्गी यांनी पंचनामा केला.

## कळंबमध्ये अनैतिक देहव्यापारावर पोलिसांचा छापा

**महिलांची सुटका, तिघांवर गुन्हा दाखल... कळंब पोलिसांनी छापा टाकून मोठी कारवाई**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ फेब्रुवारी -**

शहरातील हिमालय बार आणि लॉज येथे अनैतिक देह व्यापार सुरू असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर कळंब पोलिसांनी छापा टाकून मोठी कारवाई केली. या कारवाईत चार महिलांची सुटका करण्यात आली असून, तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई दि. २५ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी ३.३० वाजता करण्यात आली. आरोपींमध्ये विजय परशुराम कदम (वय ४७, रा. शिक्षक कॉलनी, कळंब), प्रशांत विठ्ठल काळे (वय ४४, रा. मंगरूळ, ता. कळंब), आणि सलाउद्दीन दगडू शेख (वय ३८, रा. चोंदे गल्ली, कळंब) यांचा समावेश आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या तिघांनी संगणमत करून स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी चार महिलांना वाणिज्यिक हेतूने लॉजमध्ये ठेवले होते आणि त्यांना देहव्यापार करण्यास भाग पाडत होते.पोलिसांनी केलेल्या छाप्यात संबंधित महिलांची सुटका करण्यात आली. याप्रकरणी आरोपींवर भारतीय दंड संहितेच्या कलम १४३, १४४ सह अनैतिक मानवी वाहतूक आणि व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ च्या कलम ३, ४, ५ व ६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास कळंब पोलीस करत आहेत.

या कारवाईमुळे शहरात एकच खळबळ उडाली असून, अनैतिक देह व्यापार चालवणाऱ्या लॉज आणि बार चालकांविरोधात पोलिसांनी कठोर पावले उचलण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## विद्यार्थिनीचा राज्यपाल, मुख्यमंत्री यांच्या हस्ते राज्यभावनात होणार सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ फेब्रुवारी -**

उमरगा तालुक्यातील श्री सिद्धेश्वर विद्यालयाचे एकूण बारा विद्यार्थिनी महाराष्ट्र राज्य स्काऊट आणि गाईड मुंबई यांच्यामार्फत राज्य पुरस्कार परीक्षा दि. १४ डिसेंबर ते १७ डिसेंबर विभागीय कार्यालय लातूर येथे आयोजित करण्यात आले होते. या परीक्षेत एकूण बारा विद्यार्थी सहभागी झाले असून, सर्व विद्यार्थी उच्चतम गुणसंपदात करुन उत्तीर्ण झाले आहेत. ग्रामीण भागातील मुलींच्या आर्थिक परिस्थितीमुळे सदर परीक्षेत बसणे शक्य नव्हते.



स्काऊट गाईड युनिफॉर्म विना परीक्षेला बसता येत नव्हते. स्काऊट गाईड विभाग प्रमुख मनोजकुमार गुरव यांच्या पुढाकारातून सौभाग्यवती पद्मजादेवी विठ्ठलराव बदोले त्यांच्या वाढदिवसानिमित्त आणि संस्थेचे माजी अध्यक्ष कै.गोपाळराव पाटील यांच्या स्मरणात त्यांच्या चिरंजीव राजाराम गोपाळराव पाटील यांच्याकडून लोकवर्गणी मिळवून सदर विद्यार्थी परीक्षेत बसले होते. त्याचेच फलनिष्पत्ती म्हणून आज सर्व विद्यार्थी सदर परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत प्रणिती तोनशाळे, शशिकला माशाळे, ऋतुजा मांडवे, आफरीन सय्यद, कायनाथ जमादार, शर्वरी रुपनवरे, आकांक्षा यमगर, रागिनी लवटे, श्रुती भोसले, प्राजक्ता जाळे संजना कांबळे, क्रांती बजरंग पाटील, या सर्व विद्यार्थिनी उत्तीर्ण झाले आहेत. सदर राज्य पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांना भविष्यात रेल्वे नोकरीमध्ये पाच टक्के आरक्षण असून, एसएससी बोर्ड परीक्षेत एक टक्का अतिरिक्त गुण मिळणार आहेत. सदर सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष विठ्ठलराव पटणे, सेक्रेटरी विठ्ठलराव बदोले, मुख्याध्यापक माशाळे, जिल्हा संघटक आयुक्त विक्रांत देशपांडे, स्काऊट गाईड विभाग प्रमुख मनोजकुमार गुरव, सोमनाथ चनपटणे, ज्योती आमले यांच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

## विद्यार्थ्यांनीचा सन्मान

**जळकोट, दि.२६ फेब्रुवारी -**

तुळजापूर तालुक्यातील वागदरी येथील शिव-बसव-राणा-काशिबा महाराज जन्मोत्सव समितीच्यावतीने शिवजयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या शिवसप्ताहात सामान्य ज्ञान चाचणी स्पर्धेत शहापूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थिनींनी घवघवीत यश संपादन केले. या सप्ताहात विविध उपक्रम राबविण्यात आले. या उपक्रमांमध्ये नाविण्यपूर्ण उपक्रम घेण्यात आला. विद्यार्थ्यांसाठी सामान्य ज्ञान चाचणी स्पर्धा परीक्षा आयोजित करण्यात आली होती. गुणानूक्रमे पारितोषिक मिळवणा-या विद्यार्थिनीचें व मार्गदर्शक कोळी, शाळेतील सर्व शिक्षकांचे मुख्याध्यापकानी कौतुक करुन अभिनंदन केले आहे.

## मुंबई पोलीस निवड झाल्याबद्दल परंडा येथे सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२६ फेब्रुवारी -**

परंडा तालुक्यातील भोत्रा गावाचे शेतकरी पुत्र प्रविण बाबुराव पवार भोत्रा यांनी प्रतिकुल परस्थिती मध्ये जिद्द चिकाटी मेहनतीच्या जोरावर मुंबई पोलीस निवड फेब्रुवारी २०२५ मध्ये महाराष्ट्रात १५ वा क्रमांक पटकावत यश संपादन करून

आई वडिलांचे स्वप्न पूर्ण केले प्रविण पवार हा माढा तालुक्यातील केवड येथील आश्रम शाळेत ५ वी १२ वी शिक्षण पूर्ण करून नंतर बार्शी येथील शिवाजी महाविद्यालय मध्ये शिक्षण पूर्ण केले नंतर परंडा येथील क्रांती करीयर ॲकॅडमीचे संचालक प्रा. विकास काळे व फिजिकल विभागाचे शिक्षक धनंजय आडगळे यांच्या माध्यमातून सराव अभ्यास तयारी करत पोलीस भरतीची तयारी केली विशेष म्हणजे मुंबई सारख्या शहरात वयाच्या २३ व्या वर्षी व पहिल्या च पोलीस भरती मध्ये शानदार कामगिरी करत यश संपादन केले. प्रविणचे विशेष कौतुक करीत



मुंबई पोलीस निवड झाल्याबद्दल महाराष्ट्र ग्रामीण बॅक शाखा परंडा व धाराशिव (उस्मानाबाद) जनता सहकारी बँक शाखा परंडाच्या वतीने प्रविण बाबुराव पवार भोत्रा यांचा सत्कार करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी जनता बॅक शाखा अधिकारी मुंडे व बॅक कर्मचारी देशमाने, वाघमोडे, ॲडव्होकेट हरीचंद्र सुर्यवंशी व तसेच महाराष्ट्र ग्रामीण बॅक शाखा अधिकारी शेळके व बॅक अधिकारी मस्तुद व मजुर सहकारी संस्थेचे चेअरमन सुनिल भाऊ पवार भोजेकर) व शंकर पवार, बाबुराव पवार, सोपान पवार व दोन्ही बॅकमधील कर्मचारी उपस्थित होते.

## तुळजाभवानीच्या गाभाऱ्यासंदर्भात काशी धर्मपीठचे प्रमुख पद्मश्री गणेश्वर शास्त्री द्रवीड यांची भेट

**तुळजापूर, दि.२६ फेब्रुवारी -**

श्री तुळजाभवानी मातेच्या गर्भगृह व मंदिर पाडण्यासंदर्भात काशी धर्मपीठाचे प्रमुख पद्मश्री गणेश्वर शास्त्री द्रवीड व छत्रपती संभाजीराजे यांची भोपे पुजारी मंडळांनी भेट घेऊन धार्मिक विधी व धर्मशास्त्रानुसार उपाययोजनेबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी भेटलेल्या भोपे पुजारी मंडळाच्या शिष्टमंडळात अध्यक्ष अमरराजे कदम, धिरज पाटील, विकास मलबा व विनोद सोंजी उपस्थित होते.



राज्यातील पुरातन संवर्धन विभागाला हाताशी धरून हवा तसा प्रायव्हेट कंपनीकडून अहवाल तयार करण्याचा हेतू काय असा प्रश्न भोपे पुजा-यांनी उपस्थित केला.लाखो देविभक्तांची श्रद्धा व भावनेशी मंदिर संस्थान खेळत आहे का? असा प्रश्न ही उपस्थित होत आहे. हे जुने मंदिर पाडून नवे मंदिर नेमके कुणाच्या सल्ल्याने होत आहे. प्रत्येक जण एकमेकांवरती चालढकल करत असल्याचे दिसून येत आहे. भोपे पुजारी मंडळाची मंदिर विस्तारास विरोध नाही पण पुर्ण मंदिर नव्याने करण्यास विरोध असल्याचे दिसून येत आहे. देशभरातील धर्मशास्त्री तसेच पुरातन अभ्यासकांशी अजून चर्चा करूनच भोपे पुजारी मंडळ आपले लेखी म्हणणे देणार आहे, अशी माहिती भोपे पुजारी मंडळाचे अध्यक्ष अमरराजे कदम यांनी दिली.

## महादेव मंदिरात श्री महादेवाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२६ फेब्रुवारी -**

नळदुर्ग येथे दि. २६ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रीचा उत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी शहरातील विविध महादेव मंदिरात श्री महादेवाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी पहाटेपासुनच गर्दी केली होती. सर्वच महादेव मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्याबरोबरच मंदिराना फुलांनी सजविण्यात आले होते. महाशिवरात्रीचा मुख्य कार्यक्रम श्रीक्षेत्र रामतीर्थ तेथे हजारो भाविकांच्या उपस्थितीत पार पडला. याठिकाणी ५०१ भक्तांच्या हस्ते महादेवाला संगीतमय महारुद्राभिषेक करण्यात आला.

सालाबादाप्रमाणे याहीवर्षी नळदुर्ग शहरात महाशिवरात्रीचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शहरातील प्राचिन व वर्षातुन एकदाच महाशिवरात्रीरोजी उघडणाऱ्या पुराणिक यांच्या वाड्यातील व भुगर्भात असणाऱ्या श्री महादेवाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. याठिकाणी भविकांची दर्शनासाठी लांबच लांब रांग लागली होती. याठिकाणी भाविकांना नागनाथ कदम यांच्याकडुन दुध वाटप करण्यात आले.



व्यासनगर येथील उत्तरेश्वर महादेव मंदिरात श्री महादेवाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. याठिकाणी मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. त्याचबरोबर मंदिराला फुलांनी सजविण्यात आले होते.फुलांची सजावट सुरेश गायकवाड यांच्याकडुन करण्यात आली होती तर भाळे कुटुंबियांकडुन विद्युत रोषणाई करण्यात आली होती त्याचबरोबर याठिकाणी राहुल बताले यांच्याकडुन भाविकांना दुधाचे वाटप करण्यात आले होते. तर हर्षल डुकरे व विशाल डुकरे यांच्याकडुन केळी व दीपक रगबले यांच्याकडुन पेरूचे वाटप करण्यात आले. शहरातील अष्टलिंगेश्वर महादेव मंदिरातही श्री महादेवाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

महाशिवरात्रीचा मुख्य कार्यक्रम नळदुर्ग येथील श्रीक्षेत्र रामतीर्थ येथे महंत श्री विष्णु शर्मा महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहात व हजारो भाविकांच्या उपस्थितीत पार पडला.

याठिकाणी मंदिर परीसरात श्री महादेवाची भव्य उत्सव मुर्ती प्रतिष्ठापना करण्यात आली होती. या मुर्तीसमोर ५०१ भक्तांच्या हस्ते श्री महादेवावर संगीतमय रुद्राभिषेक करण्यात आला.श्रीक्षेत्र रामतीर्थ येथील महादेव मंदिरात श्री महादेवाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. याठिकाणी भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. हा कायक्रम यशस्वी होण्यासाठी महंत श्री विष्णु शर्मा महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली रामभक्तांनी परीश्रम घेतले.

# औंढा नागनाथ नगरीत हर हर महादेवचा गजर





**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, २६ फेब्रुवारी**
श्रीक्षेत्र औंढा नागनाथ येथील बारापैकी ज्योतिर्लिंगांपैकी आठवे ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभू नागनाथाचा मंदिर परिसर महाशिवरात्र निमित्ताने भाविकांच्या गर्दीने गजबजून गेला. राज्यासह परराज्यातील हजारो भाविकांनी हर हर महादेव, 'बम बम भोले', 'श्री नागनाथ महाराज की जय'च्या घोषाने दर्शन घेतले. सकाळपासूनच भाविकांच्या दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या.

हिंगोली जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अभिनव गोयल, उपविभागीय अधिकारी विकास माने, आमदार संतोष बांगर सपत्नीक यांच्या हस्ते मंगळवारी मध्यरात्रीनंतर प्रभू नागनाथास दुग्धाभिषेक करून महापूजा केली. पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, उपविभागीय पोलिस अधिकारी सुरेश दळवी यांनीही नागनाथाची महापूजा केली. महापूजेनंतर मध्यरात्रीनंतर दोनच्या सुमारास भाविकांच्या दर्शनासाठी मंदिर खुले करण्यात आले. नागनाथ मंदिर फुलांनी सजविण्यात आले तसेच नागनाथ मंदिरावर विद्युत रोषणाई देखील करण्यात आली. नागनाथ नागनाथाचे दर्शन घेण्यासाठी मध्यरात्रीपासूनच भाविकांच्या रांगा लागल्या होत्या हर हर महादेव बम बम बोले चा गजर करत भाविकांनी नागनाथ प्रभू चे दर्शन घेतले. मुख्यपुजारी श्रीपाद भोपी, पद्याक्ष पाठक, तुळजादास भोपी, जीवन ऋषी, नारायण भोपी, बंडू पंडित, आबागुरू बल्लाळ, गौरव पुराणिक, कल्याण पुराणिकयांनी महापूजेची आवर्तने म्हटली.

देवस्थानचे अध्यक्ष तथा तहसीलदार हरीश गाडे, देवस्थानचे अधीक्षक वैजनाथ पवार, पोलीस निरीक्षक जी एस राहिरे, सपोनी अरुण दराडे, नायब तहसीलदार वैजनाथ भालेराव, व्यवस्थापक सुरेंद्र डफळ, तलाठी गजानन गुंजकर, नितीश कुलकर्णी कृष्णा पाटील नागेश माने बबन सोनुने, मुकेश पाडोळे, जगदीश दिंडे, सुरेखा शिंदे, नंदा चोडेकर, शोभा जोशी, देवा देशमुख,गणेश जगताप यांनी नागनाथ मंदिरामध्ये दिवसभर तळ ठोकून होते. पोलीस निरीक्षक जी एस राहिरे यांनी नागनाथ मंदिरामध्ये कडक बंदोबस्त ठेवला होता.

नागनाथ मंदिरामध्ये महाशिवरात्र निमित्ताने लाखो भाविकांनी रांगेमध्ये दर्शन घेतले. हर हर महादेव...! बम बम भोले...! जयघोषाने नागनाथ मंदिर परिसर भक्तीमय झाला होता. महाशिवरात्रीनिमित्त मंदिर परिसरामध्ये चोख पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

# आदर्श महाविद्यालयात भव्य रक्तदान शिबीर संपन्न

## स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ फेब्रुवारी**
येथील आदर्श महाविद्यालयात दिनांक २५ फेब्रुवारी रोजी स्वा.सावरकर यांच्या ६० व्या पुण्यतिथी निमित्ताने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र शासनाने निर्देश दिल्या प्रमाणे प्राचार्य डॉ. विलास आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली या दिवशी मरणोत्तर नेत्रदान बाबतीत जनजागृती करण्यात आले.

यावेळी जिल्हा सामान्य रुग्णालयाचे डॉ. विनोद सरोदे, डॉ. संकेत तोष्णीवाल, सौ. खिल्लारे, यांनी मार्गदर्शन. मरणोत्तर नेत्रदान केल्यास दोन व्यक्तीना आपण द्रुष्टी देउ शकतो तसेच आपले निधन झाल्यानंतर आपले आवयव दान केल्यास अनेकांना जीवनदान मिळते असे डॉ विनोद सरोदे यांनी सांगितले. तर प्राचार्य डॉ विलास आघाव बोलताना म्हणाले कि द्रुष्टी आहे तर स्रुष्टी आहे. म्हणून आपण आपले डोळे इतरांना दान देऊन त्याला या स्रुष्टी चे दर्शन घडवू शकतो. विद्यार्थ्यांना व त्यांच्या नातेवाईकांनी जास्तीत जास्त संख्येने मरणोत्तर नेत्रदान करावे असे अवाहन त्यांनी केले. यासाठी प्रयत्न करण्यात करावे. याच दिवशी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या रक्तपेढी मध्ये ३५ रक्त बँगेचे संकलन करण्यात आले यावेळी श्री सोनटक्के, श्री ठाकूर, श्री सचिन यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते. यासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. सचिन हाटकर, डॉ. तुकाराम हापगुंडे, प्रा. सुरेश व-हाड, डॉ. महेश मंगनाळे, श्री ज्ञानेश्वर मुडे, शुभम हेंबाडे यांनी परिश्रम घेतले.

# महाशिवरात्रीनिमित्त मंदिरांमध्ये भाविकांची गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**हिगोली, २६ फेब्रुवारी**



महाशिवरात्री निमित्त येथील प्राचीन जलेश्वर मंदिरासह शहरातील विविध महादेव मंदिरांमध्ये सकाळपासूनच दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केल्याचे दिसत होते.

येथील प्राचीन जलेश्वर मंदिरात सकाळी महापूजा आणि महाआरतीनंतर भाविकांसाठी मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात आले. यावेळी महिला, पुरूष, तरूण-तरूणी यांच्यासह बच्चे कंपनी दर्शनासाठी गर्दी करीत होते. मंदिर परिसरातील महादेवाला महिला बेल, फुल तसेच आरती करीत प्रसादाचे वाटप करतांना दिसत होत्या. मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. दि २७ रोजी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

येथील राणीसती मंदिरात जागृत महादेवाला सुप्रसिध्द कंत्राटदार राम कयाल यांनी सहकुटुंब महाभिषेक केला. या मंदिरातही भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

येथील खटकाळी हनुमान मंदिर परिसरातही महादेव मंदिरात महिलांनी महादेवाला बेल, पुष्प अर्पण करून मनोभावे पूजा केली. तसेच खडेश्वर बाबा मंदिरातही महादेव मंदिरात भाविकांनी दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. रिसाला बाजार येथील बगडीया यांच्या निवासस्थान परिसरातील नर्मदेश्वर मंदिरात फुलांची सुंदर आरास करून मंदिर सजविण्यात आले होते. बगडीया परिवाराच्यावतीने महापूजा, महाआरती झाल्यानंतर मोठ्या संख्येने परिसरातील नागरिकांनी दर्शनाचा लाभ घेतला. जिजामाता नगर भागातील महादेव मंदिरात भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. यावेळी महाप्रसादाचे वाटपही करण्यात आले. महाशिवरात्रीनिमित्त शहरात भक्तीमय वातावरण दिसत होते.



**हिंगोली- शहरातील जलेश्वर तलावाच्या काठावर वसलेले अतिप्राचीन जलेश्वर महादेव मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त मोठ्या संख्येने महिला, पुरूष तसेच युवक-युवतींनी महादेवाला बेल, पुष्प वाहून पूजा, आरती केली. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### ललीत गांधी यांचा २८ फेब्रुवारीला दौरा

हिंगोली- जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी हे हिंगोली दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या दौरा कार्यक्रमाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे. शुक्रवार, दि. २८ फेब्रुवारी, २०२५ रोजी परभणी येथून वाहनाने निघून रात्री १० वाजता हिंगोली येथे आगमन व मुक्काम. शनिवार, दि. १ मार्च, २०२५ रोजी सकाळी ७ वाजता हिंगोली येथील पुसेगाव, सेनगाव, राम गल्ली, जिजामातानगर येथील जैन मंदिरास सदिच्छा भेट. १०.३० वाजता ओमप्रकाश देवडा पीपल्स को-ऑप बँक यांच्या तिरुपतीनगर येथील नवीन इमारत उद्घाटन समारोहास उपस्थिती व मार्गदर्शन . दुपारी १.३० वाजता हिंगोली जिल्हधिकारी यांच्यासोबत बैठक, २.३० वाजता जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाच्या जिल्हा कार्यालयाचे उद्घाटन, ३.३० वाजता कळमनुरी जि. हिंगोली येथे सकल जैन समाजातर्फे सन्मान समारोह कार्यक्रमास उपस्थिती व नंतर वाशिमकडे प्रयाण.

### औंढ्यात भाविकांना खिचडीचे वाटप



औंढा नागनाथ- महाशिवरात्र निमित्ताने देशातील बारा ज्योतिर्लिंगापैकी आठव्या स्थानावर असलेल्या नागनाथ प्रभू च्या दर्शनासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून शिवभक्त मोठ्या प्रमाणात औंढा नगरीत दाखल झाले आहेत. हर हर महादेव...! बम बम भोले चा जय गजर करत औंढा नगरीमध्ये दिंड्या पालख्या अनवाणी पायाने शिवभक्त नागनाथ प्रभूच्या दर्शनासाठी आले. महाशिवरात्र असल्याने अनेक शिवभक्तांना उपवास असतो. याच पार्श्वभूमीवर औंढा नागनाथ पोलीस ठाण्याचे जमादार संदीप टाक यांनी साबुदाणा खिचडीचे वाटप केले. प्रथमतः जमादार संदीप टाक व पत्नी शुभांगी टाक यांनी नागनाथ प्रभूचे दर्शन घेऊन महापूजा केली. त्यानंतर शिवभक्तांना साबुदाणा खिचडीचे वाटप केले. दीड क्विंटलची साबुदाणा खिचडी तयार करण्यात आली होती.यावेळी जमादार संदीप टाक, शुभांगी टाक, मुलगा कृष्णा टाक, शौर्य टाक, पोकॉ माधव सूर्यवंशी, गजानन गिरी, रावसाहेब देशमुख, राहुल मोगले आदींची यावेळी उपस्थिती होती.

### तीन ठिकाणी जुगार अड्ड्यांवर छापा

हिंगोली- पोलिस विभागाच्यावतीने अवैधधंद्याविरोधात मोहीम उघडण्यात आली असून जिल्ह्यात तीन ठिकाणी पथकांनी जुगार अड्ड्यांवर छापे मारले. घटनास्थळावरून ८५ हजार ६०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून आरोपीतांविरूध्द जुगार कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# जयंत पाटील यांची ओमप्रकाश देवडा बँकेस सदीच्छा भेट



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ फेब्रुवारी**
राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी ओमप्रकाश देवडा पीपल्स बँकेच्या नवनिर्मित मुख्य कार्यालयाला दि २५ रोजी सदीच्छा भेट दिली.

यावेळी भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे, माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर, माजी आ. रामराव वडकुते, सुरेशअप्पा सराफ, रमेशचंद्र बगडिया, जगजीतराज खुराणा, प्रसन्न बडेरा, बँकेचे अध्यक्ष प्रकाशचंद सोनी, उपाध्यक्ष सुनील देवडा तसेच संचालक मंडळांनी जयंत पाटील यांचा सत्कार केला.

यावेळी बँकेचे अध्यक्ष प्रकाशचंद सोनी आणि उपाध्यक्ष सुनील देवडा यांनी जयंत पाटील यांना बँकेबद्दल माहीती दिली. तसेच १ मार्च रोजी होणाऱ्या नवनिर्मित मुख्य कार्यालय ओमभवनच्या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे निमंत्रणही दिले. याप्रसंगी विठ्ठलदास मुंदडा, शशीकांत दोडल, ज्ञानेश्वर मामडे, राजेश अग्रवाल, संजय देवडा, आशिष काबरा, गजानन देशमुख, एम एम बुद्रुक, अजित बज, राजु मुदीराज, सुधीर जालनापुरे, शशीकांत कंदी, सुधीर मुळे, ज्ञानदेव घुगे, श्रीराम माळोदे आदींची उपस्थिती होती.

# बैलगाडी रस्ता खुला करण्याची गोळेगाव ग्रामस्थांची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ फेब्रुवारी**
औंढा नागनाथ तालुक्यातील मौजे गोळेगाव येथील गट क्रमांक ७३ मधील शेतकऱ्यांच्या शेतातुन जाणारा बैलगाडी रस्ता तात्काळ खुला करण्यात यावा, अशी मागणी तहसीलदार हरीश गाडे यांच्याकडे गोळेगाव येथील शेतकऱ्यांनी निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात म्हटले की, गोळेगाव येथील गट क्रमांक ७३ मध्ये जाणारा बैलगाडी रस्ता दीपक मुळे, प्रकाश थिटे, विठ्ठल डुकरे, मारुती कपाटे , हरिभाऊ कपाटे यांच्यापासून गायरानाकडे जाणारा शेतकऱ्याचा बैलगाडी रस्ता, दीपक नामदेव मुळे व बाबासाहेब नामदेव मुळे यांनी अचानक बंद केल्यामुळे या शिवारातील शेतकरी खूप अडचणी सापडलेले आहे. सध्या शेतातील पीक काढणीला आले असून मळणी यंत्र, काढणी यंत्र व पीक घरी नेण्यासाठी रस्ता उपलब्ध नसल्यामुळे पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. तसेच काही शेतकरी शेतात राहत असल्यामुळे त्यांच्या मुलांना दहावी व बारावीच्या परीक्षेला व शाळेत येण्या-जाण्यासाठी रस्ता नसल्यामुळे मुलांचे शैक्षणिक नुकसान होऊन त्यांच्या भवितव्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच दवाखान्यात जाण्याचा रस्ता बंद झाल्यामुळे गंभीर आजाराच्या रुग्णांना औंढा, हिंगोली येथील रुग्णालयात नेण्यासाठी खुप अडचणी येत आहेत. बऱ्याच शेतकऱ्यांच्या उपजीविका या शेत जमिनीवर अवलंबून आहेत. त्यामुळे सदरील गोळेगाव येथील बंद करण्यात आलेला बैलगाडी रस्ता तात्काळ खुला करावा,अशा मागणीचे निवेदन गोळेगांव येथील शेतकऱ्यांनी औंढा तहसिलदारांना दिले आहे. निवेदनावर सामाजिक कार्यकर्ते अरुण देशमुख, सिताराम कपाटे,मारोती कपाटे, हरिभाऊ कपाटे, सिताराम कपाटे, बळीराम कपाटे, गोपीनाथ कपाटे ,चंदनलाल जयस्वाल ,विश्वनाथ क-हाळे ,किसन पोले, पंजाब हाके, श्रीरंग साबळे, बालाजी गि-हे ,प्रकाश येळणे ,केशव जवादे राघोजी धनवे विठ्ठल डुकरे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# माहे फेब्रुवारीच्या वेतन देयकासोबत जिल्हासांख्यिकीचे दुसरे प्रमाणपत्र जोड

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ फेब्रुवारी**
शासनाने कर्मचारी सर्वकष माहितीकोष-२०२४ अद्यावत करण्याचे निर्देश दिले आहेत. हिंगोली जिल्ह्यातील सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी ऑनलाईन आज्ञावलीमध्ये त्यांच्या कार्यालयाची माहिती अद्यावत केली आहे. त्यानंतर शासन परिपत्रान्वये नमूद वेळापत्रकानुसार दि. ३ डिसेंबर, २०२४ ते २८ फेब्रुवारी, २०२५ या कालावधीत ऑनलाईन आज्ञावलीमध्ये अद्यावत केलेल्या माहितीमधील त्रुटींचे निराकरण करुन माहिती बरोबर असल्याबाबतचे प्रमाणपत्र-२ जिल्हा सांख्यिकी कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावे.

ऑनलाईन आज्ञावलीमध्ये इनव्हॅलीट डाटा या टॅबमध्ये रिमार्कच्या स्तंभात दर्शविलेली त्रुटी दुरुस्त केल्यानंतर ऑनलाईन आज्ञावलीत होम पेजवर उपलब्ध असलेल्या डीडीओ डिक्लेरेशनची प्रत आहरण व संवितरण अधिकारी यांचे नाव, सही व शिक्क्यासहीत जिल्हा सांख्यिकी कार्यालयास सादर करावे. ऑनलाईन आज्ञावलीत आलेल्या त्रुटीची दुरुस्ती करण्यात अडचण येत असल्यास किंवा माहिती बरोबर असल्यास तसे जिल्हा सांख्यिकी कार्यालयास लेखी स्वरुपात कळवावे. जेणेकरुन त्रुटींची दुरुस्ती करण्यास सोपे होईल.

जिल्हा सांख्यिकी कार्यालयाकडून दुसरे प्रमाणपत्र प्राप्त करुन माहे फेब्रुवारी, २०२५ (पेड इन मार्च, २०२५) च्या वेतन देयकासोबत जोडण्यात यावे अन्यथा माहे फेब्रुवारी, २०२५ ची वेतन देयके कोषागार कार्यालयाद्वारे स्वीकारण्यात येणार नाहीत याची सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन उपसंचालक, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, हिंगोली व जिल्हा कोषागार अधिकारी यांनी केले आहे.

# समाजसुधारक संत गाडगे महाराज यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ फेब्रुवारी**
वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगणारे थोर समाजसुधारक, कीर्तनकार, अंधश्रद्धा निर्मूलन, जातीभेद विरोधी आवाज उठविणारे समाजसुधारक गाडगे महाराज यांची जयंती वसमत येथील सुप्रसिद्ध गंगाप्रसादजी अग्रवाल सर्वोदय कार्यालयात दि. २३ फेब्रुवारी रविवारी पार पडली.

महाराष्ट्र सर्वोदय मंडळ, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य, गंगाप्रसादजी अग्रवाल सर्वोदय कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने समाजसुधारक गाडगे महाराज यांची जयंती पार पडली. अध्यक्षस्थानी नशाबंदी मंडळाच्या जिल्हाध्यक्षा शुभदा सरोदे होत्या. समर्पित सामाजिक कार्यकर्ते विशाल अग्रवाल म्हणाले, खेड्यापाड्यात शिक्षणाची गंगा पोहोचली पाहिजे याचा, कृतीशील पाठपुरावा करणारे समाजसुधारक विचारवंत गाडगेबाबा राहिले. स्वच्छतेबद्दल कृती कार्यक्रम राबविणारे गाडगेबाबा हे आधुनिक काळातील महान मानवतावादी कर्मयोगी क्रांतिकारक समाजसुधारक होते. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या सत्याग्रह, ब्रिटिशांविरोधी लढा, जातीभेद निर्मूलन, व्यसनमूक्ती-नशामूक्ती, चलेजाव आंदोलन याबाबत आपल्या कीर्तनातून समाजप्रबोधन करणारे ते महान समाजसुधारक होते असे सामाजिक कार्यकर्ते विशाल अग्रवाल शेवटी म्हणाले. प्रारंभी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. यावेळी राधाकिशन हंचाटे, गौतम दातार, गंगाधर उबारे यांची उपस्थिती होती. नशाबंदी मंडळाच्या व्यसनमुक्ती दूत-मृण्मयी अग्रवाल यांनी संयोजन केले. समाजसुधारक गाडगेबाबा यांच्या कार्याचा वारसा जपण्यासाठी व्यसनमुक्ती-स्वच्छता अभियानाचा संकल्प घेण्यात आला.